शनिवार
१७ जानेवारी १९८१

# माणूस

किंमत
एक रुपया

# केसरी, महाराष्ट्र टाइम्स आणि शेतकरी आंदोलन

**म**हाराष्ट्रात शेतकऱ्यांचे ऊसआंदोलन सुरू झाल्यापासून या आंदोलनावर व या आंदोलनाचे नेते श्री. शरद जोशी यांच्यावर सातत्याने टीकेची धार चालवणारी दोन वृत्तपत्रे म्हणजे पुण्याचा केसरी आणि मुंबईचा महाराष्ट्र टाइम्स. हे श्रीमंत शेतकऱ्यांचे आंदोलन आहे हा केसरीच्या टीकेचा एकूण सूर राहत आलेला आहे व तो येथील जुनाट व रशियाछाप डाव्या विचारसरणीशी तसा सुसंगत म्हटला पाहिजे. हे श्रीमंत शेतकऱ्यांचे आंदोलन आहे हे गृहीत धरले तरी ते स्वागतार्ह आहे असेच खरे म्हणजे मार्क्स-लेनिन डोळसपणे वाचणारा कुठलाही माणूस म्हणेल. सरंजामी युगातले आर्थिक–सामाजिक संबंध मोडून भांडवलशाही संबंध खेड्यांपर्यंत पोचले, शेतीचे एका व्यवसायात रूपांतर झाले, ग्रामीण भागाचे औद्योगीकरण होऊ लागले तर कुठला डोळस मार्क्स–लेनिनवादी याला विरोध करील ? पण आपल्याकडे तो होतो आहे. चरणसिंगांच्या मागे फक्त श्रीमंत जाट शेतकरीच उभा आहे म्हणून त्यांची हेटाळणी करणारे हेच डावे आणि जनता सरकारला खिंडीत गाठून पाडणारे व चरणसिंगांना पाठिंबा देऊन सत्तेवर आणणारे हेच डावे ! रशियात ‘कुलक’ होता म्हणून आपल्याकडेही तो असलाच पाहिजे अशा समजुतीने ग्रामीण भागाची वर्गवारी करणारे हे डावे ! त्यांच्या सुरात सूर मिसळून ‘केसरी’नेही हे आंदोलन श्रीमंत शेतकऱ्यांचे ठरवून टाकले व शरद पवारांप्रमाणेच शरद जोशींवरही सतत टीकास्त्र सोडले. शहादे येथे पार पडलेल्या जनता पक्षाच्या अधिवेशनात एस्. एम्. जोशी, डॉ. काळदाते यांनी शरद जोशी यांच्या विचारांशी मिळते-जुळते विचार प्रदर्शित केले. केसरी याबद्दल या मंडळींवर केवढा घसरला ! ‘गंगा गये गंगादास, जमना गये जमनादास’ अशी त्यांनी [illegible] या पुढाऱ्यांना इशारा दिला की, ‘तालवार शेतकरी महाराष्ट्राच्या या डाव्या पुढाऱ्यांना वापरून फेकून देतील!’ (केसरी, ७ जानेवारी अग्रलेख) गेल्या शतकाच्या अखेरीस पुण्यात पहिली कापडगिरणी निघाली. अग्रलेख लिहून या गिरणीचे तेव्हा केसरीने स्वागत केले होते. गिरणीचा मालक कोण हा प्रश्न त्यांनी त्या वेळी उपस्थित केला नव्हता. ही प्रक्रिया आता ग्रामीण भारतात शेतकरी आंदोलनामुळे समजा सुरू होत असली, तर तिचे टिळक-दृष्टीने म्हणा किंवा अगदी मार्क्स–लेनिनवादी दृष्टीनेही म्हणा, स्वागतच व्हायला हवे; पण सध्याच्या केसरीला हे मान्य नाही. त्याला मुंबईचे रजनी पटेल चालू शकतात; पण खेडेगावातल्या पाटलाने मोटारसायकल बाळगली तर हा केसरी गुरगुरणार– ‘छोट्या शेतकऱ्यांच्या जमिनी कोण विकत घेते ? आपल्या जमिनीवर शेतमजुरांना कमी पैशात कोण राबवून घेतात ?’ जणू ज्या कापडगिरणीचे टिळकांनी स्वागत केले ती तेव्हापासूनच कामगारांना किमान वेतन वगैरे देत होती ! तेव्हाचा केसरीही जो घास एकदम घेत नव्हता, घेऊ शकत नव्हता, तो एका दमात घेण्याची आजच्या केसरीला घाई सुटलेली आहे. ही घाई कौतुकास्पद असली तरी टिळक विचारात –मार्क्सवाद – लेनिनवादातही न बसणारी आहे. डांगे–रजनी पटेलवादात बसत असल्यास कुणास ठाऊक !

¤

महाराष्ट्र टाइम्सकार मात्र कुठलाच ‘पुस्तकी वाद’ वगैरे मानीत नसले तरी त्यांचा ‘पवारवाद’ सर्वश्रुत आहे. त्यामुळे शरद पवार आणि शरद जोशी यांच्यातील अंतर

वाढत गेले तसतसे महाराष्ट्र टाइम्सही शरद जोशी यांच्यावर अधिकाधिक धसरू लागला. शरद जोशीच्या उपोषणाची टवाळी करण्यापर्यंतही ही पातळी खाली गेली. अर्थात यात नवीन काही नव्हते. असली अश्लाघ्य व वैयक्तिक टीका या वृत्तपत्राने अनेकदा, अनेकांवर यापूर्वीही, कारण नसताना केलेली आहे. पण ७ जानेवारी(८१) चा अग्रलेख याला अपवाद आहे, हेही कबूल केले पाहिजे. राजकीय पक्षांचे एकूण महत्त्व या अग्रलेखात सांगितले गेले आहे व रॉयवाद मानणाऱ्या व्यक्तीकडून हे महत्त्व सांगितले जावे याला विशेषच अर्थ आहे. मानवेन्द्रनाथ रॉय यांनी असलेला पक्ष विसर्जित करून प्रबोधनाच्या कार्याला शेवटी शेवटी वाहून घेतले; आणि इकडे म. टाइम्सचे रॉयवादी संपादक तर शरद जोशी हे आपले शेतकरी आंदोलन राजकीय पक्षापासून अलग ठेवतात म्हणून त्यांच्यावर तुटून पडलेले आहेत ! 'राजकीय पक्षच नकोत ही अराजकवादी आणि फासिस्ट प्रवृत्ती झाली' असे म. टा. कार म्हणतात. शरद जोशी यांनी राजकीय पक्षच नकोत अशी भूमिका घेतल्याचे आजवर कुठे प्रसिद्ध तरी झालेले नाही. राजकीय पक्षांनी आजवर शेतकऱ्यांची लुबाडणूक केली आहे, त्यामुळे सगळेच राजकीय पक्ष शेतकरी आंदोलनापासून लांब ठेवले पाहिजेत, अशी शरद जोशी यांची सध्या भूमिका दिसते व यात काही अराजकवाद, फॅसिझम वगैरे आहे असे वाटत नाही. राजकीय पक्ष हे राज्यकारभारासाठी लागतात हे खरे आहे; पण प्रश्न ग्रामीण भागाच्या उत्थापनाचा आहे. दीर्घकालीन महत्त्वाचा आहे. या दृष्टीने राजकीय पक्ष निरुपयोगी असतात हा आजवरचा आपला अनुभव आहे व त्याला वैचारिक आधारही पुष्कळ आहेत. रॉय यांचा आधार तर आहेच; पण गांधी, जयप्रकाश, विनोबा, गोळवलकर गुरुजी या सगळ्यांच्या विचारदर्शनात हा विचार वेगवेगळ्या पद्धतीने येऊन गेलेला आहे. या सगळ्यांना अराजकवादी व फॅसिस्ट समजायचे असेल तर मात्र गोष्ट वेगळी. 'फॅसिझम'वर रॉय यांनीच लिहिलेले पुस्तक पुन्हा एकदा नजरेखालून घालणे अशा वेळी उपयुक्त ठरेल. ग्रामीण भागाचे, म्हणजेच तीनचतुर्थांश भारताचे दारिद्र्य घालवण्याच्या मूलभूत कार्यात शरद जोशींचे शेतकरी आंदोलन कितपत यशस्वी ठरते, न ठरते, हा भाग अलाहिदा; पण अशा मूलभूत परिवर्तनाच्या कार्यात शक्ती व वेळ खर्च करण्यात राजकीय पक्षांना रस नसतो, त्यांचे मुख्य उद्दिष्ट सत्ता संपादन करणे व ती टिकवणे हे असते, त्यासाठी त्या त्या वेळी जो विषय, जो प्रश्न जनमानसाची पकड घेऊ शकेल असे त्यांना वाटते तो ते उचलून धरीत असतात, हेही दृष्टिआड करून कसे चालेल ? म्हणून शरद जोशी अशा पक्षांकडे व त्यांच्या नेतृत्वाकडे मार्गदर्शनाच्या अपेक्षेने गेले नाहीत. उलट त्यांनी राजकीय पक्षांनाच धारेवर धरले. यात चूक तर काहीच नाही; उलट अशी एक शेतकऱ्यांची स्वायत्त शक्ती देशात उभी राहत असेल तर तिचे स्वागतच करायला हवे. जी संघटना, जी संस्था राजकीय पक्षांचे शेपूट बनते ती कधीच वाढत नाही. असा शेपूटवाद शरद जोशींनी नाकारला आहे आणि यामुळेच राजकीय पक्ष त्यांच्यावर उखडून आहेत. लोकशाहीत राज्यकारभारासाठी, सत्ता राबवण्यासाठी राजकीय पक्ष हवेत ही गोष्ट खरी; पण पक्ष म्हटला की काही शिस्त, निष्ठा हवी. एखादे पद मिळते म्हणून पक्षबदल करणारे, समांतर पक्ष चालवणारे, हव्या त्या आघाड्या बनवणारे, दिल्लीत एक–मुंबईत दुसरेच बोलणारे नेते पक्षपद्धतीच्या ऱ्हासाला जितके कारणीभूत आहेत, तितके काही कालपरवा उदयाला आलेले शेतकरी आंदोलन निश्चितच नाही. विश्वासार्ह पक्ष जनतेला हवे आहेत; पण अविश्वासार्ह नेते विश्वासार्ह पक्ष कधी तरी उभा करू शकतील काय ? शेतकरी आंदोलनाचा जेव्हा जन्मही झाला नव्हता तेव्हा फॅसिझम देशात डोकावून


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : विसावे

अंक : तेहतिसावा

१७ जानेवारी १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

गेला. त्या वेळी या फॅसिझमच्या विरोधात उभ्या असलेल्या जे. पी. च्या चळवळीलाही म. टाइम्सने गांधीच्या चळवळीचे दाखले दे-देऊन असाच नकारात्मक हितोपदेश केला होता. कुठल्याही नवीन चळवळीचे आणि म. टाइम्सचे असे विरोधी नाते आहे. शरद पवारांची दिंडी हाच काय तो अपवाद घडला. शरद जोशींनी शरद पवारांशी थोडेफार जमवून घेतले असते तर ? महानोरांसारखा राजकवी नाही तरी गेला बाजार, निदान एखादा खास वार्ताहर तरी नासिक आंदोलनाच्या वाट्याला आला असता. नव्हता हा भाग्ययोग शरद जोशींच्या कुंडलीत ! त्यामुळे 'शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर लोक व राजकीय पक्ष यांचे लक्ष केन्द्रित करण्याचे श्रेय श्री. शरद जोशी यांनाच द्यावे लागेल'. एवढ्या म. टा. च्या सर्टिफिकेटवरच त्यांनी समाधान मानून स्वस्थ राहावे, एस. एम. जोशी, डॉ. काळदाते वगैरे मंडळींना खुशाल म्हणू द्यात की, 'स्वातंत्र्यलढ्यात १९३० च्या मिठाच्या सत्याग्रहाला जे स्थान आहे, तशाच प्रकारचे महत्त्वाचे स्थान शेतमालाला किफायतशीर भाव हवा या आंदोलनाला द्यावे लागेल. हे आंदोलन केवळ एवढा प्रश्न सोडवून संपणारे नाही; त्यावरून ग्रामीण जनतेच्या समग्र परिवर्तनाची आणि पुनर्निर्माणाची प्रक्रिया सुरू होऊ शकते.' (केसरी दि. ११ जानेवारी ८१–एस. एम. जोशी यांचा लेख.) पण म. टा. कारांच्या दृष्टीने हे आंदोलन म्हणजे अराजकाला आमंत्रण, हे आंदोलन म्हणजे फॅसिस्ट प्रवृत्ती ! रॉय यांच्या मताने फॅसिझम म्हणजे मक्तेदारी भांडवलशाहीचे अपत्य. शेतकरी आंदोलन हे मक्तेदारांच्या मगरमिठीतून सुटण्याचा ग्रामीण जनतेचा एक प्रयत्न आहे. फॅसिझमला खरोखरच विरोध करायचा असेल तर औद्योगिक क्षेत्रात वाढत चाललेल्या मक्तेदारीवर खरे पाहता म. टा. कारांनी हल्ला चढवायला पाहिजे. ते न करता उगाचच बिचाऱ्या शेतकऱ्याला बडवणे म्हणजे चोर सोडून संन्याशाला सुळी देण्याचाच प्रकार आहे; आणि तसे पाहिले तर अगदी रॉय सुद्धा शेतकरी क्रांतीकडेच शेवटी शेवटी वळले नव्हते का ? मग स्वतःला रॉयवादी म्हणवणारे आपल्याकडील पहिल्या यशस्वी व शांततापूर्ण मार्गाने लढल्या गेलेल्या शेतकरी क्रांतीचा व तिच्या नेत्याचा इतका दुस्वास का करीत आहेत ?

¤

'राजकीय पक्ष नकोत याचा अर्थ प्रत्येक राज्यात कोणाचाच अंकुश नसलेले, संघटना, तिची घटना, नियम यांचे बंधन नसलेले पुढारी उभे राहणे आणि ते म्हणतील ते प्रमाण असे लोकांनी मानणे. राज्यवार असे सर्वतंत्र स्वतंत्र पुढारी निर्माण होऊन ते त्याना वाटेल त्या प्रश्नावर व वाटेल त्या वेळी लोकाना आंदोलनासाठी चिथावणी देऊ लागले तर अराजक माजेल; पण अशा पुढाऱ्यातही जो जबरदस्त ठरेल तो सर्वांच्या डोक्यावर मिरे वाटून येथे त्याची एकतंत्री राजवट सुरू होईल.' 'अशी राजकीय पक्ष बरखास्त केल्यावर देशाची स्थिती होईल....' असे म. टा. कार आपल्या वरील लेखात सांगतात. राजकीय पक्ष आज देशात मौजूद आहेत. देशात एका पक्षाची स्थिर राजवट चालू आहे. सर्वांवर अंकुश ठेवणारी इंदिरा गांधीसारखी समर्थ व्यक्ती उभी आहे. तरीही देश अराजकाकडे वाटचाल का करतो आहे, याची कारणे जरा खोलात जाऊन तपासली पाहिजेत. शरद जोशींना व त्यांच्या शेतकरी आंदोलनाला त्याबद्दल जबाबदार धरणे हे कार्यकारणभाव उलट लावणे होय. अगोदर राज्यकर्ते, राजकीय पक्ष भ्रष्ट होतात. ही भ्रष्टता मग इतर क्षेत्रात फैलावते व अराजक येते. 'यथा राजा तथा प्रजा' हा व्यासांचा सिद्धान्त महाभारतकाळी जेवढा खरा होता तेवढा आजही आहे. कारण तो सार्वलौकिक व सार्वकालिक आहे. शिवाय जोशींनी राजकीय पक्ष बरखास्त करावेत असे कुठे म्हटलेलेही नाही. शेतकरी आंदोलन पक्षनिरपेक्ष ठेवावे यावर मात्र त्यांचा कटाक्ष आहे. एकीकडे जोशी पक्षनिरपेक्ष नाहीत; जोशींनी इंदिरा कांग्रेसपक्षाशी जमवून घेतले म्हणूनही त्यांना ठोकायचे आणि दुसरीकडे त्यांनी न घेतलेली राजकीय पक्षाच्या बरखास्तीची भूमिकाही त्यांच्या माथी मारून, राजकीय पक्षाचे महत्त्व त्याना सुनवायचे ! विसंगतीचा हा एक छान नमुना आहे !

—श्री. ग. मा.


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना
हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. —डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे
मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

निषेध सभा झाली ....

# आता आमचे साहित्यिक काय करणार?

गेल्याच आठवड्यात पुण्यातल्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सभागृहात साहित्यिकांची एक 'निषेधसभा' झाली. निमित्त होतं राज्य पुरस्कारासाठी नेमलेल्या तज्ज्ञ समितीच्या शिफारसी महाराष्ट्र शासनाने डावलल्याचं. परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. वि. रा. करंदीकर सभेच्या अध्यक्षस्थानी होते.

सुरुवातीला पुणे विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागातील प्राध्यापक व प्रसिद्ध समीक्षक डॉ. य. दि. फडके यानी 'जनाचा प्रवाहो चालिला' (विनय हर्डीकर) 'सिंहासन' (अरुण साधू) व 'जयप्रकाश नारायण' (बा. न. राजहंस) ही तीन तज्ज्ञ–समितीने राज्य पुरस्कारासाठी शिफारस केलेली पुस्तकं शासनाने डावलल्याबद्दल निषेध व्यक्त केला व या संदर्भात साहित्य संस्कृती मंडळाच्या सदस्यत्वाचा राजीनामा देण्यामागील स्वतःची भूमिका स्पष्ट केली. याच मुद्द्यावरून शासनाचा जाहीर निषेध करणाऱ्या साहित्यिक समीक्षकाची यादीही डॉ. फडके यांनी वाचून दाखवली.

त्यानंतर प्रा. प्रभाकर पाध्ये बोलायला उठले. त्यांनी आपल्या भाषणात राज्यपुरस्कारांबाबत अंतिम अधिकार शासनाकडे असले तरी या देशात लोकशाही रुजवायची असेल तर काही क्षेत्राना स्वतंत्रता बहाल केलीच पाहिजे, असं सागितलं. तसंच या प्रकरणी 'ग्रंथाली' किंवा इतर काही गटांमार्फत सुरू होत असलेल्या 'जनपारितोषिके' 'स्वाभिमान पारितोषिक' यासारख्या कल्पनांना स्पष्ट विरोध दर्शवला.

प्रा. गं. बा. सरदार यानीही शासनाच्या या वर्तनाचा निषेध केला; पण त्याच वेळी साहित्यकांनी शासनाशी पूर्णपणे फटकून वागणंही योग्य होणार नाही, असं मत व्यक्त केलं.

सभेचे अध्यक्ष डॉ. वि. रा. करंदीकर यांनीही आधीच्या तीन वक्त्यांच्या विचाराना पाठिंबा दिला आणि शासनाचा निषेध करणारा ठराव संमत केला.

सभा संपली. सुमारे शंभर–दीडशे श्रोते उपस्थित असावेत त्यातल्या अनेकांनी ठरावाच्या कागदावर सह्याही केल्या आणि सर्वजण घरोघर निघून गेले

¤

या सभेनंतर दोनच दिवसानी पुणे विद्यापीठातले राज्यशास्त्राचे प्राध्यापक राम बापट भेटले. तेही म. सा. प. मधल्या साहित्यिकांच्या सभेला उपस्थित होते. त्यामुळे भेटल्यावर प्रथम त्याच विषयावर चर्चा सुरू झाली. या वादाबद्दल निरनिराळ्या साहित्यिकानी मांडलेल्या मतावर प्रतिक्रिया व्यक्त करताना प्रा. राम बापट म्हणाले, "यंदा शासनाने तज्ज्ञ समितीच्या शिफारशी डावलल्यावर सर्व साहित्यिक चवताळून उठले आहेत. पण ही मंडळी अशा तऱ्हेने शासनाकडे पुरस्काराची भीक मागायला जातातच कशाला, हेच मला समजत नाही. जर समजा याच्या पुस्तकाच्या एक हजार प्रती निघाल्या असतील, चार-पाच हजार वाचकानी ते पुस्तक वाचलं असेल आणि लेखकाला पसंतीची पावती दिली असेल तर तेवढ्यावर याचं समाधान का होऊ नये? म्हणजे राज्यपुरस्कारासाठी ही मंडळी ज्या तऱ्हेने प्रयत्न करतात व शासनाने यांना पुरस्कार नाकारल्यावर आज ज्या तऱ्हेने यानी गदारोळ सुरू केला आहे त्यावरून असं वाटतं की आमच्या साहित्यिकाना लोकमान्यतेपेक्षाही राजमान्यतेची ओढ जास्त आहे. अन्यथा चार–पाच हजार वाचकानी शाबासकी देऊन याचं जे समाधान होत नाही. ते सहा जणांच्या समितीने यांच्या पुस्तकाची शिफारस केल्यावर आणि त्यानुसार शासनाने यांना पारितोषिक दिल्यावर कसं काय लाभतं?

"आपला देश हे 'समाजकल्याणकारी राज्य' आहे आणि अशा राज्यात साहित्यिकांना स्वातंत्र्य, स्वायत्तता मिळालीच पाहिजे, त्याचप्रमाणे शासन आमचंच आहे, पुरस्काररूपाने साहित्यिकाना जो पैसा दिला जातो तो सामान्य जनतेच्याच खिशातून कररूपाने गेलेला आहे, तेव्हा शासकीय पुरस्कारासाठी प्रयत्न करण्यात काहीही गैर नाही, असा प्रतिवाद अनेक आघाडीचे साहित्यिक–समीक्षक आज करताना दिसतात; पण मी असं म्हणेन की, विकसनशील देशातील 'समाजकल्याणकारी' शासनाच्या प्रमुख जबाबदाऱ्या अन्न, वस्त्र, निवारा आणि शिक्षण या असल्या पाहिजेत याबद्दल दुमत नाही; परंतु इथल्या सर्जनशीलतेलाही त्यांनी प्रोत्साहन दिलं पाहिजे असा आग्रह आपण का धरावा? बरं, विकसनशील देशातील 'समाजकल्याणकारी' राज्याच्या जबाबदाऱ्यामध्ये आपण याही बाबीचा हट्टाने अंतर्भाव केला तरी मग मी असं म्हणेन की गेल्या तीस वर्षातल्या इथल्या शासनांच्या धोरणावरून आणि कृतीवरून आपण काही बोध घेणार आहोत की नाही?

"अशा तऱ्हेने प्रत्येक गोष्टीसाठी शासनाशीच भाडत बसण्यापेक्षा इथल्या साहित्यिक-समीक्षकानी स्वतःच एक कायमस्वरूपी खाजगी निधी का उभारू नये आणि स्वत.च एक तज्ज्ञ समिती नेमून तिच्यामार्फत या निधीतून पारितोषिकं का देऊ नयेत? शासकीय पुरस्कारापेक्षाही अशा स्वरूपाच्या पारितोषिकाना, मग ती कितीही छोट्या किंवा मोठ्या रकमेची असोत, साहित्यिक-वर्तुळात प्रतिष्ठा लाभावी, यासाठी या निमित्ताने प्रयत्न सुरू करायला काय हरकत आहे?

"अर्थात याचा अर्थ शासनाशी उभा दावा पत्करावा असा मुळीच नाही. उलट हवे तर या निधीमध्ये शासनानेही दरवर्षी विशिष्ट रक्कम द्यावी, असा कोणी आग्रह धरला तरीही ते फारसं गैर ठरणार नाही; पण अशा तऱ्हेने तीच तीच 'losing battle' पुन्हा पुन्हा खेळण्यापेक्षा आमच्या साहित्यिकानी या निमित्ताने एकदा स्वतःच्याही क्षमतेचा कस लावावा आणि दाखवावा असं माझं मत आहे."

गेला जवळजवळ एक महिना या प्रश्नावर महाराष्ट्रातल्या साहित्यवर्तुळात उलटसुलट

चर्चा चालू आहे आणि या शिफारशी डावलल्या गेलेल्या तीन पुस्तकाबाबत शासनाने साहित्य व सस्कृती मंडळाचे नूतन अध्यक्ष डॉ. सुरेंद्र बारलिंगे, पुण्यातल्या पूना कॉलेजचे प्रा. एन. डी. शेख आणि महाराष्ट्राच्या महसूलमंत्री शालिनीताई पाटील यांच्या 'महानोर' इंद्रायणी सावकार या तिघाची मतं विचारून त्याना या वादात ओढलं.

यापैकी प्रा. शेख आणि सौ. सावकार यांच्या खऱ्या–खोटया मताना फारशी किंमत देण्याचं कारण नाही; पण डॉ. बारलिंगे यानी नऊ जानेवारीला मुबईत पत्रकारांशी बोलताना जी मतं व्यक्त केली ती मात्र या संदर्भात विचारात घेण्यासारखी आहेत.

"शासनाने माझं मत जाहीर करून विश्वासघात केला आहे", असं डॉ. बारलिंगे यांनी एकीकडे म्हटलं खरं, पण त्याच वेळी "आपल्यावर टीका करणाऱ्याना बक्षीस कोण देईल ?" अशी पृच्छाही केली. (महाराष्ट्र टाइम्स– १० जानेवारी)

'समाजकल्याणकारी' शासनाच्या वतीने डॉ. बारलिंगे यानी तमाम साहित्यिकाना दिलेली ही चपराक आहे. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत अशाच तऱ्हेची पृच्छा एका कॉंग्रेसी मंत्र्यानं केली होती आणि आमच्या साहित्यिकांनी त्याचं तेवढंच वाक्य उचलून त्याला बिचाऱ्याला भरपूर धोपटलं होतं. आता डॉ. बारलिंगे याच्या या विधानाचीही मराठी साहित्यिकानी गंभीर दखल घेतली पाहिजे व त्याचबरोबर साहित्यकलाबाबत इथल्या शासनाची वृत्ती कशी असावी याबाबत डॉ. बारलिंगे याच्यासारख्या तत्त्वज्ञाची अपेक्षा काय आहे, याचीही दखल घ्यावी.

□

अशा तऱ्हेने काही पुस्तकाना बक्षिसं डावलल्याची कुजबूज लागल्यावर मी तज्ज्ञ समितीचे पुण्यातले सदस्य डॉ. आनद यादव याना भेटलो. त्यांनी त्याबाबत काहीही सागण्यास स्पष्ट नकार दिला आणि नकाराचं स्पष्टीकरणही केलं. डॉ. यादवांसारखा माणूस कोणत्या तरी क्षुल्लक स्वार्थापोटी या वादात स्वत.ची कातडी बचावण्याचा प्रयत्न करत आहे, असं त्यावरून वाटलं नाही. पण त्यानी घेतलेली भूमिका 'एकच प्याला' मधल्या सिंधूसारखी वाटली. शिवाय मराठीतल्या एका ज्येष्ठ साहित्यिकाबद्दल त्यांनी काढलेले अनुदार उद्गारही खटकणारे होते. त्यामुळेच 'हे असं काही ऐकलं की, आणीबाणीपासून आमचे साहित्यिक काही धडा शिकलेच नाहीत की काय, असं वाटायला लागतं,' असे डॉ. यादवाना ऐकवून मी बाहेर पडलो.

दरम्यान, शासनाने ज्यांना बक्षिसं नाकारली त्याना सामान्य जनतेकडून पैसा उभारून 'जनपारितोषिक' देण्याची योजना मुबईला 'ग्रंथाली'च्या एका कार्यक्रमात तयार झाली; पण 'सोबत'चे सपादक बेहरे यानी आपल्या नेहमीच्या ग. वा. शैलीने 'जनपारितोषिका'चं 'स्वाभिमान पारितोषिक' असं काही तरी गद्य नाव ठेवून ती योजना स्वतःच्याच कल्पनेतून निघाल्याच्या थाटात जाहीरही करून टाकली. शिवाय 'जनपारितोषिका'ची योजना ठरवताना 'ग्रंथाली'चे चिटणीस दिनकर गांगल यानी व इतरानी असं ठरवलं होतं की यासाठी प्रत्येकाकडून पाच रुपये घ्यायचे, त्यापेक्षा एक पैसाही जास्त नाही किंवा कमीही नाही; पण बेहऱ्यानी 'किमान पाच रुपये व त्याच्यावर ज्याला जितके वाटेल तितके' अशी योजना जाहीर केली. आता ही काय आफळेबुवाच्या कीर्तनात फिरवली जाणारी पेटी आहे की प्रत्येकानं आपल्या खिशात असेल ते नाणं झटकून मोकळं व्हावं ?

एकंदरीत या सर्व गदारोळात वावरल्यावर आणि बऱ्याचशा गोष्टी प्रत्यक्ष पाहिल्यावर–ऐकल्यावर मला एकच सूचना करावीशी वाटते. आमच्या साहित्यिकानी लेखनस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य, साहित्यक्षेत्रातली स्वायत्तता अशा कल्पना डोक्यातून काढूनच टाकाव्यात. याचं कारण असं की, या कल्पना पेलण्याइतके आमचे व आजचे साहित्यिक बलवान नाहीत. कोणी भीतीपोटी, कोणी स्वार्थापोटी, तर कोणी कशाला उगीच दुखवायचं या तथाकथित उदात्त विचारापोटी अजूनही गप्प बसून आहेत.इथले एक ज्येष्ठतम साहित्यिक ( पु. ल. देशपांडे )आता स्वत.च 'सूक्ष्मात गेले आहेत.' या वादाचा दबाव साहित्य समेलनाचे नवे अध्यक्ष गो. नी. दांडेकर याच्यावर आणण्याचाही प्रयत्न एका गटाकडून चालू आहे; पण गडागडावर हिंडून विविध प्रकारच वारं प्यायलेल्या गोनीदाना कुठलं वारं अंगावर घ्यायचं आणि कुठल्या वाऱ्याला पाठ दाखवायची हे तंत्र उत्तम अवगत आहे. त्यामुळे ते स्वतः याचा निर्णय आयत्या वेळच्या हवेवरूनच घेतील.

तेव्हा एकीकडे साहित्यविषयक खोल तात्त्विक वाद घालताना दुसरीकडे मात्र शासनाशी फटकून चालणार नाही, ( प्रा. सरदार ) साहित्यिकानी चळवळ उभी करूच नये, ( प्रा. पाध्ये ) अशा सूचना इथले धुरंधर साहित्यिक करतात. शासनाच्या या कृत्याचा निषेध म्हणून मी माझं 'चिवारीची फुलं' परत मागवल, असं पाध्यानी जोरात सागितलं; पण आधी शासनाकडे पाठवलंच कशासाठी? याचं उत्तर त्यांनी दिलं नाही. इतरही साहित्यिक देत नाहीत. दिलंच तर लोककल्याणकारी राज्यावरच सगळेजण येऊन आपटतात.

तेव्हा ही मडळी सतत दुसऱ्याकडून अपेक्षा करत राहणार. यांचं स्वातंत्र्य, स्वायत्तता अबाधित राहावी याची दक्षता हे स्वत घेणार नाहीत. इथल्या शासनाने ती घेतली पाहिजे असा याचा आग्रह. म्हणजे त्यासाठी काही किंमत मोजण्याची याची तयारी नाही. यानी कधी काळी काही त्याग केलाच, तर पुढल्या 'प्राप्ती'चा हिशेब मनात ठेवूनच. यातूनच ना. धो. महानोरासारखे 'राजकवी' जन्म पावतात. कारण आमदारकीचा तुकडा फेकून कोणीतरी याचं तोड आधीच गप्प केलेल असतं, त्याना बांधूनही टाकलेलं असतं. काहीजणासमोर सरकारी कमिटयाचे हिशेब असतात, तर अंतुले सरकारनं उभं केलेलं 'इंदिरा प्रतिष्ठान'चं गाजर काही भल्याभल्याना आकर्षित करते आहे आणि एक मोठं पद मिळून थोडा काळ गेला नाही तोच डॉ. बारलिंगेंसारखी माणसं, तेही खातं आपल्याच अखत्यारीत यावं अशी मागणी करत आहेत.

काहीही असलं तरी या निमित्तानं एका चांगल्या वादाला तोड फुटलं आहे. यामध्ये आपले साहित्यिक कृती काय करतात, याला फार महत्त्व आहे. कारण त्यावरूनच या क्षेत्राच्या भविष्यातल्या दिशेचा अंदाज येणार आहे साहित्यिकाच्या सोसायटीत जागा मिळावी म्हणून उपोषणाला बसणारे पुन्हा या प्रश्नाबाबत फारस बोलत किंवा प्रचार करीत नाहीतच. मग अशानी स्वातंत्र्य आणि स्वायत्ततेच्या गप्पा मारून काय उप-

योग ? अशा गोष्टी मागून मिळत नसतात, त्यासाठी लढावं लागतं, पडेल ती किंमत मोजण्याचीही तयारी ठेवावी लागते.

मराठीतील ख्यातनाम साहित्यिक व विचारवंत दुर्गाबाई भागवत यानी साहित्यिकांनी कोणत्याही स्वरूपाचा संबंध शासनाशी ठेवू नये असा आग्रह धरला तेव्हा आपण सर्वांनीच 'एकांगी भूमिका' म्हणून त्या कल्पनेची टर उडवली. काही प्रमाणात ती एकांगी असेलही; पण मग आज आमच्या साहित्यिकानी वेगळं काय सुरू केलं आहे ? आणि उद्या 'पुलोद'चं जरी शासन आलं तरी अशी वेळ येणारच नाही, याची हमी कशी देता येणार ?

याच विचारातून दुर्गाबाईंनी 'वंदे मातरम्' ट्रस्टचीही स्थापना केली. अर्थात त्याला पुरेसा प्रतिसाद न मिळाल्यामुळे त्याचं नावही अनेकजण विसरून गेले आहेत; पण आज निर्माण झालेल्या या वादळाच्या निमित्तानं खरंच काही दीर्घ मुदतीचे उपाय योजावयाचे असतील तर त्यामध्ये या ट्रस्टचं पुनरुज्जीवन करणं किंवा अशा स्वरूपाचा दुसरा कायमस्वरूपी ट्रस्ट निर्माण करणे अपरिहार्य ठरतं. आमच्या साहित्यिकांच्या आज उफाळून येणाऱ्या विद्रोहाला यातूनच विधायकतेची जोड लाभणार आहे. अन्यथा लेखनस्वातंत्र्य आणि स्वायत्तता यांच्याविषयी बोलणं म्हणजे लष्करात नोकरी करणाऱ्यानं न्याय्य हक्कासाठी संघटना उभारण्याच्या विचार करत बसण्यासारखं ठरणार आहे.

—सतीश कामत

## ६१ वे अ. भा. मराठी नाट्यसंमेलन

# अध्यक्ष आत्माराम भेंडेंचा हृद्य सत्कार

नेमेचि येणाऱ्या पावसाळ्याप्रमाणे या वर्षीचे ६१ वे नाट्यसंमेलन (अ. भा. मराठी!) जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात नासिक इथं संपन्न हात आहे. गेल्या वर्षभरात नाट्यसंमेलनाध्यक्ष स्वरराज छोटा गंधर्व यानी केलेल्या कार्याच्या पार्श्वभूमीवर या वर्षीचे नियोजित अध्यक्ष श्री. आत्माराम भेंडे याच्याकडून वाढत्या अपेक्षा ठेवण्यात वावगे काही नाही; पण अ. भा. मराठी नाट्य परिषदेच्या पुणे शाखेच्या वतीने रविवार दि. ११ रोजी श्री. भेंडे याचा सत्कार करण्यात आला, त्या वेळी भेंडेंनी केलेल्या भाषणात त्याची डिफेन्सिव्ह भूमिका खटकणारी वाटली.

अ. भा. म. ना. प. (सर्व संस्था 'अभा' असल्याने शॉर्ट फॉर्म बरा) तर्फे हा सत्कार करण्यात आला. त्या वेळी अध्यक्षस्थानी सा. सोबतचे संपादक श्री. ग. वा. बेहरे होते. श्री. भेंडे याच्याबरोबरच षष्ठ्यब्दिपूर्तीनिमित्त माजी संमेलनाध्यक्ष प्रा. भालबा केळकर व श्री. चंद्रकात गोखले आणि ८१ व्या वर्षात पदार्पण केल्यानिमित्त श्री चंद्रकात गोखले यांच्या मातुश्री व मराठी संगीत रंगभूमीवरील पहिल्या स्त्री कलाकार श्रीमती कमलाबाई गोखले याचाही सत्कार करण्यात आला. या सर्व सत्कारित व्यक्तीच्या कार्याचा गौरव करणारी श्री. दाजी भाटवडेकर, प्रा. माधव वझे, डॉ. वि. भा. देशपाडे, श्री. गो. रा. जोशी, डॉ. ए. डी. जोशी याची भाषणे झाली.

आत्माराम भेंडे नाट्यसंमेलनाध्यक्ष झाले त्या वेळची पहिली प्रतिक्रिया 'योग्य व्यक्ती' अशीच होती. सावंतवाडीच्या नाट्यसंमेलनात प्रा. भालबांनी त्यांच्या नावाचे सूतोवाच करून ठेवलंच होतं, ते आता फलद्रूप झालं आहे. संगीत रंगभूमीच्या शताब्दी वर्षात स्वरराज छोटा गंधर्वांसारखा यथोचित अध्यक्ष मिळाला. संमेलनाध्यक्षानी काय 'कार्य' करावे (काय बोलावे यापेक्षाही) याचा वस्तुपाठच स्वरराजानी घालून दिला.

आता भेंडे अध्यक्ष झालेत. संगीत रंगभूमीवर स्त्रीपार्टीची भूमिका करण्यापासून व्यावसायिक रंगभूमीवर आपले स्वत:चे स्थान निर्माण करून प्रायोगिक रंगभूमीवरही काही करायची जिद्द आणि इच्छा असलेला हा 'दिग्दर्शक नट' म्हणून श्री. भेंडे यांची ख्याती आहे. फार्स या नाट्यप्रकारावर 'कमाड' असलेले श्री. भेंडे गेली कित्येक वर्षे रंगभूमीसाठी आपले आयुष्य खर्ची घालताहेत. त्यामध्ये नुसती व्यावसायिक भावना नाही तर रंगभूमीबद्दलची आच आहे. श्री. भेंडे रंगभूमीवर अजूनही कार्यमग्न आहेत, त्यामुळे संमेलनाध्यक्ष म्हणजे कार्य संपलेली व्यक्ती असा संकेत मोडला गेला आहे. या वर्षभरातही भेंडे नाट्यकलेची सेवा करतीलच; पण आता मराठी नाटकाचा एक सार्वत्रिक प्रतिनिधी म्हणूनही त्याना जबाबदारी पार पाडायची आहे, ती ते मनापासून पार पाडतील अशी आशा आपण व्यक्त करू या.

श्री. दाजी भाटवडेकर यानी आपल्या भाषणात 'मानवतेची जोपासना करणारा मोठा माणूस' या शब्दात श्री भेंडे यांचा गौरव केला. नाट्यसृष्टीतील मत्सर, कारवाया, राजकारण या सर्वांपासून अलिप्त असणाऱ्या श्री. भेंडे यानी अध्यक्षपदावरून विधायक कार्य करावे अशी अपेक्षाही त्यानी व्यक्त केली.

प्रा. माधव वझे म्हणाले, 'समीक्षा, दिग्दर्शन, अभिनय, सूत्रधार या सर्व स्तरावरून श्री. भेंडे वावरलेले आहेत. आता या सर्वांवरचं त्यांचं चिंतन हवं आहे. भेंडे याच्याकडून ही अपेक्षा ठेवण्यात वावगेपणा होणार नाही.'

सर्व आघाड्यावर आलबेल असलेला दुर्मिळ कलावंत अशा शब्दात सुरुवात करून डॉ. वि. भा. देशपाडे म्हणाले, 'श्री. भेंडे सृजनशील कलावंत आहेत. रंगभूमीवर शरीराचा उत्कृष्ट वापर कसा करावा याचा वस्तुपाठ म्हणजे त्यांचा अभिनय. त्याचा वावर सर्व प्रकारच्या रंगभूमीवर असल्याने या सर्वांशी निगडित असलेल्या प्रश्नांबाबत श्री. भेंडे काही करतील अशी सर्वांची अपेक्षा आहे.'

प्रायोगिक रंगभूमीची पताका महाराष्ट्रात प्रथमतः खांद्यावर घेणारे श्री. भेंडे यानी रंगभूमीवर आपले कर्तृत्व समर्थपणे अभिव्यक्त केले आहे. संपूर्ण नवी अशी किमान पन्नास नाटके बसवलेल्या श्री. भेंडे यांना

मलपृष्ठ २ वर

# इंदिरा काँग्रेस
## राज्याराज्यातील गटस्पर्धा

वा. दा. रानडे

राज्यपातळीवरल्या गटस्पर्धेत मुख्यमंत्र्यांची बाजू घ्यावयाची असे धोरण इंदिरा काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाने म्हणजेच इंदिरा गांधींनी ठरविले असल्याचे दिसते. वास्तविक राज्यातील विधिमंडळ पक्षातल्या घडामोडीवर, मंत्रिमंडळाच्या रचनेवर व पुनर्रचनेवर केंद्रीय संसदीयमंडळाचे नियंत्रण असायला हवे; पण अलीकडच्या काही आठवड्यातील घडामोडीवरून असे दिसते की, संसदीय मंडळाची मुख्यमंत्र्यांवर पकड राहिलेली नाही, महत्त्वाच्या प्रश्नांवर ते संसदीय मंडळाचा सल्ला घेत नाहीत. त्यांना निर्णय कळविण्याचे सौजन्य सुद्धा दाखवीत नाहीत, मग त्यांचा सल्ला मानणे बाजूलाच राहिले. आंध्रप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी मंत्र्यांची संख्या ६१ पर्यंत वाढविली. मध्यप्रदेश, हरियाना व कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी एकेका मंत्र्याचे राजिनामे मागितले; पण याबाबत केंद्रीय संसदीय मंडळाचा सल्ला घ्यावा, निदान त्याच्या कानावर या गोष्टी घालाव्यात असे एकाही मुख्यमंत्र्यास वाटले नाही ! याचाच अर्थ मुख्यमंत्र्यांवर संसदीय मंडळाची पकड राहिलेली नाही. पक्षाची शिस्तबद्ध उभारणी करण्याच्या दृष्टीने ज्या समित्या किंवा मंडळे महत्त्वाची तीच याप्रमाणे डावलली जात आहेत, मग शिस्तबद्ध पक्षबांधणी होणार कशी ? पण शिस्तबद्ध पक्ष हवा आहे कोणाला ? इंदिरा गांधींना हवा आहे त्यांच्याशी एकनिष्ठ असणारांचा पक्ष. त्यांना शिस्त हवी आहे ती तेवढ्यापुरतीच आणि मुख्यमंत्री तेवढी शिस्त पाळीत आहेत संसदीय मंडळाचा त्यांनी सल्ला घेतला नसला तरी पंतप्रधानांची भेट घेऊन त्यांचा सल्ला व संमती घेतली होती. पंतप्रधानांची संमती घेणे पुरेसे आहे, संसदीय मंडळाचा सल्ला घेण्याची आवश्यकता नाही अशी त्यांची समजूत झालेली दिसते. यातून असा प्रश्न उपस्थित होतो की, राज्याच्या मंत्रिमंडळ पुनर्रचनेबाबत सर्व निर्णय पंतप्रधान घेणार असतील तर संसदीय मंडळ ठेवण्याचा देखावा हवा कशाला ? दुसरी अनिष्ट गोष्ट म्हणजे केवळ केंद्र सरकारची नव्हे तर राज्यसरकारची सूत्रे एकाच व्यक्तीच्या हाती केंद्रित होत आहेत.

एवढेच नव्हे तर पक्षसंघटनाही इंदिरा गांधींनी आपल्या नियंत्रणाखाली ठेवली आहे. पंतप्रधानपद आणि पक्षाचे अध्यक्षपद ही दोन्ही पदे त्यांनी आपल्याकडेच ठेवली आहेत. पंडित नेहरूंकडेही काही काळ ही दोन्ही पदे होती; पण पक्षाचे अध्यक्षपद त्यांनी नंतर सोडले. कामराजांचा अपवाद वगळता नेहरूंच्या काळापासूनच काँग्रेसमध्ये अध्यक्षाचे महत्त्व कमी झाले होते. केवळ सरकारच्या दृष्टीने नव्हे तर पक्षसंघटनेच्याही दृष्टीने पंतप्रधानपद हेच मुख्य सत्ताकेंद्र झाले. इंदिरा गांधींच्या काळात तर ही प्रवृत्ती अधिकच बळावली. १९७५ पर्यंतच्या आपल्या पहिल्या कारकीर्दीत नामधारी अध्यक्ष नेमण्याचा देखावा त्यांनी चालू ठेवला होता. १९७८ मध्ये इंदिरा काँग्रेस स्थापन केल्यानंतर आता हा नामधारी देखावाही त्यांनी संपविला आहे पंतप्रधान झाल्यानंतर काँग्रेसचा हंगामी अध्यक्ष म्हणून दुसऱ्या एखाद्या नेत्याची नेमणूक त्यांना करता आली असती; पण तसे त्यांनी केले नाही. राज्य सरकाराप्रमाणेच प्रदेश काँग्रेस कमिट्यात जबाबदारीच्या जागांवर आपल्याशी एकनिष्ठ असलेली माणसेच राहतील अशी योजना त्यांना करावयाची असून ती आपल्या मनासारखी झाल्याशिवाय त्या अध्यक्षपद सोडतील अशी शक्यता दिसत नाही.

राज्यशाखांवर त्या कसे नियंत्रण ठेवू पाहतात हे महाराष्ट्राच्या बाबतीत नुकतेच दिसून आले आहे. अंतुले मंत्रिमंडळ अधिकारावर आल्यापासूनच प्रेमलाकाकींना प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून दूर करण्याची मागणी होत होती. अर्थमंत्री रामराव आदिक यांनी ही मागणी जाहीरपणे केली. अंतुलेगट आणि वसंतदादागट यांच्यात संघर्ष असला तरी या दोन्ही गटांना प्रेमलाकाकी अध्यक्षपदी नको होत्या, पण त्यांना हलवायचे कसे ? अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत इंदिरा गांधींची साथ करून महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेसची उभारणी त्यांनी केली होती. त्यांना हलवायचे कसे हा इंदिरा गांधींपुढेही पेच होता; पण बहुसंख्य सभासदांना त्या अध्यक्षपदी नको आहेत हे स्पष्ट झाल्यावर त्यांना दुसरा अध्यक्ष निवडणे भागच पडले. गुलाबराव पाटील यांना अध्यक्ष नेमण्यात आले. ते अंतुलेगटाचे आहेत. प्रदेश काँग्रेस आपल्या नियंत्रणाखाली आणून मग अंतुलेगटाला शह द्यावयाचा व नेतृत्वबदलाची मागणी करावयाची या सूत्रानुसार दादागटाच्या हालचाली चालू होत्या; पण आता गुलाबराव पाटील प्रदेश इंदिरा काँग्रेसचे अध्यक्ष झाल्याने त्यांना आपले बेत सिद्धीस नेणे कठीण जाणार आहे. गुलाबरावांची अध्यक्षपदी नेमणूक जाहीर झाल्याबरोबर त्यांनी आपण दिल्लीस जाऊन कार्यकारिणीच्या निवडीबाबत इंदिरा गांधींचा सल्ला घेणार आहोत असे जाहीर केले व त्याप्रमाणे दिल्लीत जाऊन अध्यक्ष इंदिरा गांधी आणि सरचिटणीस मोजनार यांच्याशी चर्चा केली. गुलाबरावांच्या नेमणुकीची घोषणा झाली त्या वेळी वास्तविक दुसरे सरचिटणीस वसंतदादा पाटील महाराष्ट्रातच दौऱ्यावर होते; पण गुलाबराव त्यांना भेटले नाहीत. सरचिटणिसांनी कामाच्या आपसात केलेल्या वाटणीनुसार महाराष्ट्राचे प्रश्न वसंतदादाकडे नसतील. तरीही गुलाबरावांनी त्यांची अनौपचारिक भेट का घेऊ नये असा प्रश्न मनात येतो. गटसंघर्षाने संबंध एवढे दुरावले आहेत काय ? नव्या प्रदेश कार्यकारिणीत अंतुले गटाचाच अधिक प्रभाव राहण्याची शक्यता दिसते ! हा लेख प्रसिद्ध होईपर्यंत कदाचित कार्यकारिणी जाहीरही झालेली असेल. आतापर्यंत राज्यमंत्रिमंडळाची निवड इंदिरा गांधींच्या सल्ल्याने होत असे. आता प्रदेश कार्यकारिणीचीही निवड त्यांच्या सल्ल्याने होत आहे आणि त्यासाठी अध्यक्षांना दिल्लीवारी करावी लागत आहे, हा अनिष्ट पायंडा आहे. महाराष्ट्रातील सरकारप्रमाणेच पक्षसंघटनेवर त्यांना आपली पकड ठेवावयाची आहे हे त्यावरून स्पष्ट होते.

राज्यपातळीवरल्या गटसंघर्षावरून असे दिसते की, जुन्याच भांडणांनी पुन: डोके वर काढले आहे आणि जुन्या पद्धतीनेच हे संघर्ष लढविले जात आहेत. हरयानामध्ये अर्थमंत्री

तयाल यांना राजिनामा द्यावा लागला यात काही आश्चर्य नाही. मुख्यमंत्री भजनलाल व तयाल अठरा महिने एकत्र कसे राहिले हेच आश्चर्य आहे तयाल याचा आतापर्यंतचा राजकीय इतिहास पाहिला तर ते नेहमी सत्तारूढ गटाच्या विरोधातच होते असे दिसून येईल. भजनलाल मंत्रिमंडळात त्यानी सह-भागी होणे हेच त्याच्या प्रवृत्तीविरुद्ध होते. चोरट्या दारूभट्टीच्या दारूचे सेवनामुळे जे बळी नुकतेच पडले ते या दोघांमधील मत-भेदाचे अलीकडचे कारण. दारूबंदीखाते. तयाल याच्याकडे असल्याने या प्रकरणी नैतिक जबाबदारी त्यानी स्वीकारायला हवी असे मुख्यमंत्री भजनलाल याचे म्हणणे, तर या प्रकरणी न्यायालयीन चौकशी व्हावी असे तयाल यांना वाटते. सत्तारूढ पक्षाच्या काही नेत्याचे चोरट्या दारुभट्टीचे धंद्याशी सबंध आहेत असे आरोप करण्यात आलेले आहेत. न्यायालयीन चौकशीतून या गोष्टी बाहेर येतील म्हणून भजनलालना अशी चौकशी नको आहे. तयाल यांच्या राजिनाम्याने गटसंघर्ष संपला असे मानण्याचे कारण नाही. त्यांचा गट बन्सीलाल गटास पाठिंबा देण्याच्या संभव आहे. पुनः मुख्यमंत्रीपद मिळविण्यासाठी बन्सीलालाचे प्रयत्न चालू आहेतच.

मध्यप्रदेशात मुख्यमंत्री अर्जुनसिंग आणि त्यानी ज्यांचा राजिनामा मागितला ते तिवारी अनेक वर्षे एकमेकाचे राजकीय प्रतिस्पर्धी होते. मंत्रिपद दिल्याने तरी तिवारीच्या आपल्या विरुद्ध हालचाली थाबतील या हिशेबाने अर्जुनसिंगानी त्याना मंत्रिमंडळात घेतले व आता त्याचा राजिनामा मागतानाही मंत्रिपद गेल्याने तरी ते गप्प बसतील असा त्यांचा आडाखा होता, पण पहिल्या आडाख्याप्रमाणेच हा दुसरा आडाखाही चुकण्याचा संभव आहे. तिवारी आता शुक्ला गटाशी संधान बाधून मुख्यमंत्र्याविरुद्ध हालचाली करण्याची शक्यता आहे.

कर्नाटकात मुख्यमंत्री गुंडुराव व शेतीमंत्री बंगारप्पा यानी मिळते घ्यावे असे प्रयत्न इंदिरा गाधीनी केले व त्यासाठीच बंगारप्पांचा राजिनामा त्यानी थोपवून धरला होता. अर्स याच्या बंडखोरीनंतर कर्नाटकात इंदिरा काग्रेसची उभारणी करण्यात बगारप्पा यांची कामगिरी महत्वाची होती. त्याची किंमत म्हणून वास्तविक मुख्यमंत्रिपदच आपणास मिळायला हवे असा बगारप्पाचा प्रयत्न होता; पण संजय गटाला गुडुराव हवे होते आणि तो गट प्रभावी ठरून गुडुराव मुख्यमंत्री झाले. बंगारप्पाना त्यानी मंत्रिमंडळात सुरुवातीला क्रमाक दोनचे स्थान दिले; पण नंतर शेतीखात्यासारखे दुय्यम खाते त्याच्याकडे सोपविले. गुडुराव याच्या कार्यपद्धतीवर बंगारप्पा यानी उघड टीका सुरू केली तेव्हा गुडुरावानी त्यांचा राजिनामा मागितला. इंदिरा गाधींच्या सल्ल्याप्रमाणे मी वागेन असे बंगारप्पांनी त्याना उत्तर दिले; पण अखेर इंदिराजीनी गुंडुरावानाच पाठिंबा देण्याचे ठरविल्याने बंगारप्पाना राजिनामा द्यावा लागला.

असे हे निरनिराळ्या राज्यांतील इंदिरा काग्रेस अंतर्गत गट-स्पर्धेचे चित्र आहे. □

कथा

# शेवट

श्रीधर रघुनाथ दीक्षित

रेणू घरी एकटीच होती. लक्ष्मी गिरणीवर आली होती. लक्ष्मी गिरणीवर यायला निघाली तर मोडक रस्त्यातच दिसले. मोडक आता आपल्या घरीच गेले असणार. त्यांना 'बसा' म्हणूनही म्हणायची आवश्यकता नसते. ते स्वत च बसून घेतात. मोडक घरी पोचले देखील असतील ! आपण आता लवकरात लवकर घरी पोचायला हवे ही जाणीव तिला झाली मात्र, अंग भरून जणू काटयाच्याच लाटा उसळल्या.

आता तिला क्षणभरही धीर धरवेना.

ती तशीच आल्या पावली परतली. गिरणीचा मालक आणि नोकर अवाक् होऊन पहातच राहिले. त्यांच्या नजरातून तिला ते कळलेही; पण त्याच्या नजरातून जे काय निर्माण होतंय त्याचा आपल्या मनावर होणारा परिणाम तिने एखाद्या झुरळाला झटकावं तसा झटकून टाकला.

कारण—

कारण रेणू घरी एकटीच होती. लक्ष्मीच्या संसारातील रेणूच्या पदार्पणाने लक्ष्मी बदलून गेली. रेणू चागली उंच होती. वय अठराच्या घरात. त्यामुळे शरीर पूर्ण भरून आलेलं होतं. रंगाने गोरी होती. नाक धारदार होतं. हनुवटी नाजुक होती सारं काही ठाकठीक; पण जीभ जड होती. ती जडच राहिली. कमरेखालील भाग अत्यंत अधु होता. ती तोडाने कसलासा च्यक्च्यक् आवाज काढायची आणि तोडातून लाळ गळत असायची. हवे-नको हेही नीट सांगायची नाही. बसल्या ठिकाणीच बसून असायची. उठून चालणे शक्यच नव्हते. मग कशी तरी खुरडत खुरडत रखडायची... लक्ष्मीने प्रथम कर्तव्य म्हणून, अविची ती बहीण म्हणून किंवा रेणूची तिला अपार करुणा आली म्हणून किंवा तशाच कोणत्या तरी कारणाने तिला आपल्याकडे आणायला अविला संमती दिली होती...

पण तिला सगळीच्या सगळी साभाळायची म्हणजे एकंदरीत कठीणच होऊन बसले होते ! तशातच आपल्या शरीराचे भानही राहू शकत नव्हते रेणूला. शरीराखाली कसली घाण झालीय हे तरी माणसाला कळायला हवे ! माणसाला स्वतःचं शरीर तरी स्वस्थ नि स्वच्छ ठेवता यायला नको का ?

परिस्थिति ही अशी !

त्यामुळे लक्ष्मी गिरणीवर दळण ठेवून तात्काळ परतली.

पायातील चपला एका बाजूस सरकवत असताना लक्ष्मीने पाहिले. मोडक बसले होते. पेपर वाचत होते. त्याच्या डोळ्यापुढे पेपर होता त्यामुळे त्याचा चेहेरा दिसत नव्हता. पण रेणू ! रेणूची मुद्रा बावळट असायची नेहमी तशी ती नव्हती. आंब्याला मोहर येऊन आम्र्याचं झाड डवरून उठावं, तसं रेणूला पाहून लक्ष्मीला वाटलं. हल्ली असं बऱ्याच वेळा तरी झालेलं लक्ष्मीला जाणवलं होतं...

आपली ही नंणद अशी कशी ?

हिला पाहून, हिच्या विचाराने, हिच्या साध्या हालचालीनी देखील आपण विझून जातो, तर ही अशी कशी मोहरून उठते ?

हे असे विचार सुरू झाले म्हणजे लक्ष्मी शरीरानेच काय, मनानेही हरवून जायची.

मग तिला काहीच सुचायचे नाही.

अवि यायची वेळ झाली होती. तिने स्टोव्ह पेटवला. स्टोव्हची फुरफुर सुरू झाली. स्टोव्हवर चहासाठी आधण ठेवले, चहा-साखर टाकली. घड्याळाकडे पाहिले, पाच वाजले होते. अवि आता येईलच.

अविच्या आठवणीबरोबर एक तरळ नाट्य तिच्या नजरेसमोर उभे राहिले... मधुचंद्र, सुखासीन रात्र अन् रोमांचित झालेली गात्र न् गात्र .. तसल्या रात्रीची आता आठवणच फक्त...

अवि आला.

नंतरच्या साऱ्या कृती अगदी भावनाशून्य यांत्रिकतेने झाल्या. म्हणजे तेवढ्यापुरते सारे विचार बाजूस सारले गेले. चहाचे भांडे उतरवले गेले. चहा गाळला गेला. कप भरले. बैठकीत दिले गेले.

मग मात्र ती पुन्हा रिकामीच झाली. काही काळ स्वस्थ बसली. अचानक आठवल्यासारखी सुपारीची खाडं नि अडकित्ता शोधू लागली. रेणूच्या डोक्यावरल्या रॅकमधे शोधा-शोध करताना तिचे सहज म्हणून रेणूच्या चेहेऱ्याकडे लक्ष गेले नि ती दचकलीच !

रेणूची मुद्रा तशीच होती !

तिच्या चेहेऱ्यावर जणु मोहोरच फुलत लाय !!

काहीच न कळणाऱ्या देहाला हे कसं समजावं ?

सुपारीची खांडं नि अडकित्ता तिने कसेबसे बैठकीत सरकवले. एका कल्पनानाट्याने ती आता झपाटली गेली...सशयाच्या गाळात खोल खोल रुतू लागली...

लक्ष्मीचे लग्न होऊन दुसरे वर्ष लागले होते. त्याच्या ससाराला .. पहिले वर्ष तर साधनाच्या वापरातच गेले होते. दुसरे वर्ष सुरू व्हायला नि रेणूचा प्रवेश व्हायला एकच गाठ पडली होती. दीड रूमच्या ब्लॉकमध्ये लक्ष्मी फुलत नव्हती. मोहरून उठत नव्हती....

आणि इकडे रेणूच्या मुद्रेवरील भाव असा की जणु काही तिला सर्वस्वच गवसलय !

आपण ज्या कल्पनेच्या, संशयाच्या गाळात खोलवर रुततोय ते तसंच खरं झाल तर ?

आपल्या नणंदेला कुणापासून, समजा मोडकापासूनच मूल झालं तर ?

तर ?

तर त्याचं देखील आपण करायचं की काय ? आणि तो होईपर्यंत नि नंतरही रेणूचं देखील ?

मोडक गेले.

मोडक केव्हा गेले तेदेखील कळले नाही लक्ष्मीला. जेव्हा कळले तेव्हा तिला राहवले नाही.

बैठकीतल्या खुर्चीवर ती बसली बसता बसता म्हणाली,

'आता नाही हं मी धीर धरायची-'

अविला प्रथम कळलेच नाही. मग कळले तसा तो तिची मुद्रा निर्विकार मुद्रेने पाहतच राहिला.

तो तरी काय बोलणार होता ? तिचे नक्की दुखणे त्याला ठाऊक होते. दीड रूमच्या ब्लॉकमध्ये ती खुलत नव्हती... एका सायंकाळी थोरला भाऊ रेणूला घेऊन अविकडे हजर झाला होता. 'अपंगांच्या आश्रमात रेणूला नेऊन ठेवण्यापेक्षा तू तिला माझ्याकडे का आणीत नाहीस ?' असे अविने कळवले मात्र, तो पत्र मिळताच बहिणीला घेऊन हजर झाला हे पाहून अवि केवढ्यांदा दचकला होता !

थोरला आल्या पावली परतला. 'थाब' म्हणूनही थाबला नाही, न जाणो कदाचित् ह्याचा अगर लक्ष्मीचा विचार पालटायचा रात्रीच !

त्या रात्री नि नंतरच्या प्रत्येक रात्री रेणूच्या बसल्या जागी होणाऱ्या हालचालीमुळे लक्ष्मीचा शिंपला कधी मुक्तपणे उघडलाच नाही-

-अवि काही बोलत नव्हता. निर्विकार होता. मध्यंतरीच्या अनेक वेळा तिने रेणूची दुसरीकडे काही तरी व्यवस्था करा असे सांगून पाहिले होते...

तो काहीच बोलत नाही असे पाहून ती फणत्कारली,

'आता मी पक्का निश्चय केलाय-'

'काय ?'

'तुम्ही त्याना आश्रमात नेऊन ठेवा किंवा काय करायचे ते करा; पण त्या इथे नकोयत मला...हे होत नसेल तर मात्र मीच निघून जाईन माझ्या माहेराला-'

लक्ष्मीच्या चेहेऱ्यावरच्या सथपणातही करारी भाव स्पष्टपणे दिसत होते.

ते पाहून तो गडबडलाच.

ती उठली. उठता उठता पुन्हा म्हणाली, 'काय ते आठवडाभरात ठरवा !'

मग ती कामाला लागली.

भानरहित अवस्थेत काही काळ गेल्यावर अवि भानावर आला. त्याला जाणवले ते इतकेच की, काही तरी करायला हवे व तेही त्वरितच-

मग तो ताडकन उठला. त्याने तोंडभरून रेणूकडे पाहिले. रेणूची ती मूर्ती बघून त्याचे डोळे भरून आले. आसवाच्या लाटांमध्ये बहीण दिसेनाशी झाली. क्षणभर वाटले, मी हिच्यासाठी या अशा अवस्थेत काय करावे ? काय करू नये ? काय योग्य ठरेल ? रेणू त्याला लग्न होईपर्यंत तरी बहीण म्हणून आणि अपंग म्हणूनही जीव की प्राण होती. लग्नानंतर आताच्या काही महिन्यांनी मात्र-

परिस्थिती माणसाला देव बनवते, तीच परिस्थिती माणसाला राक्षसही बनवते-

मोठा तिला आश्रमात ठेवणार होता. ती कल्पनाच अविला असह्य झाली होती... आणि आताच्या गोंधळाला तोच जबाबदार होता . थोरल्याचा निर्णय बरोबरच होता...

अवि मग बाहेर पडला. भावाला नि आश्रमाला त्याने रिप्लाय पेड टेलिग्रॅम्स केले. रात्रीचा उशीराच आला. तसाच झोपला. अस्वस्थपणे वाट पाहू लागला.

दुसऱ्या दिवशी सकाळी प्रत्यक्ष थोरलाच येऊन उभा राहिला !

बुटाचे बंद सोडताना म्हणाला,

'उगाच नेऊन ठेवणार नव्हतो मी... मला का ती-बहीण म्हणून-नको होती ? काळजी करू नकोस ! मी तिची चागली व्यवस्था केली आहे...आश्रमाचे सचालक माझ्या ओळखीचे आहेत...ते जातीने तिच्याकडे लक्ष देतील...शिवाय माझी बदलीही प्रमोशनवर त्याच गावी झाल्याची ऑर्डर आलीय. मीही मधून मधून भेट देत जाईन आश्रमाला-'.

लक्ष्मीने हे शब्द ऐकले. अंगावरून एक मोरपीस फिरले तिच्या

-मात्र असा काही शेवट होईल हे तिने स्वप्नात देखील अपेक्षिले नव्हते !

□

# योद्धा शेतकरी

**लेखांक सातवा**

लेखन आणि संकलन

**विजय परुळकर**

ठाण्याच्या कारागृहातून सुटका झाल्यानंतर शरद जोशीनी पुण्याला दोन तीन दिवस विश्रांती घेतली आणि विदर्भाच्या दौऱ्याची तयारी केली. विदर्भात कपाशीच्या भावासाठी मोठ्या प्रमाणात 'चक्का जाम' आदोलन उभं करण्यात आलं होतं. शरद जोशीच्या बरोबर विदर्भ फिरण्याची माझी खूप इच्छा होती; पण लिखाणात अडकून पडल्यामुळं जाणं अशक्य होतं.

विदर्भाचा दौरा आटोपून शरद जोशी दहा डिसेंबरच्या सुमारास नाशकात दाखल झाले. अकरा डिसेंबर रोजी मी आणि बायकोनं पिंपळगाव बसवंत गाठलं. १४ डिसेंबरला पिंपळगाव येथे शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला होता; पण जिल्ह्यात तर सभाबंदी, जमावबंदी, भाषणबंदी असे आदेश जारी होते ! मग हा मेळावा कसा काय पार पडणार ? नासिक येथील एका महाविद्यालयाने शरद जोशीचे अर्थशास्त्रीय विचार समजून घेण्यासाठी आयोजित केलेले व्याख्यान देखील पोलिसानी परवानगी नाकारल्यामुळं रद्द करावं लागलं होतं. नासिक शहरात ठरवलेली त्यांची जाहीर सभा देखील रद्द करावी लागली होती. शासनानं कायद्याच्या आधारानं चोहो-बाजूनं नाकेबंदी केली होती. अशा परिस्थितीत पिंपळगाव बसवंतचा मेळावा कसा काय पार पडणार ? मेळावा झाला तरी मोठ्या प्रमा-णात शेतकरी जमणार का ? संपूर्ण जिल्ह्यात संचारबंदी लागू करण्यात आली तर माणसं पिंपळगाव बसवंतला कशी काय येणार ? एकदा स्थगित केलेलं हे आदोलन पुन्हा खरोखरीच चालू करता येणार का ? अनेक प्रश्न ! !

बारा डिसेंबरला पहाटे प्रल्हाद पाटील कराड आले. त्यांच्या-बरोबर शरद जोशी मालेगाव तालुक्यातील माळमाथ्यावरील १८ गावाना भेटी देणार होते. आंदोलनात भाग घेतलेल्या शेतकऱ्या-बरोबर बातचीत करणार होते. माळमाथ्याचा हा दौरा श्री. दौलत-राव देवरेनी आयोजित केला होता. निवडक अठरा गावांना भेटी देण्याच्या निमित्तानं संपूर्ण मालेगाव तालुका शरद जोशी पालथा घालणार होते. शेतकऱ्याशी बातचीत करताना ह्या सर्व भागात त्याच्या सभा आपोआपच पार पडणार होत्या.

बागलाण कळवण भागातल्यासारखंच चित्र माळमाथ्यावर दिसत होतं. कुठल्याही गावात शरद जोशीची जीप शिरताच हजारोच्या संख्येनं शेतकरी जमत होते आणि पहाता पहाता भेटीचं रूपातर सभेत होत होतं. गावातील मैदानावरील एखाद्या पारावर बसून शरद जोशी शेतकऱ्यांना सागत –

'कोणत्याही गावात आल्यानंतर आपण मित्रमंडळीबरोबर गप्पा मारायला जसे बसतो तसेच आता देखील बसलो आहोत. आता आपले मित्रच इतके जास्त आहेत त्याला आपण तरी काय करणार ? ज्याना मित्र नसतात त्याना अशी अडचण पडत नाही; पण आपले मित्र इतके आहेत की, कुठं तरी घरात किंवा पडवीवर बसून सर्वांशी गप्पा मारणं केवळ अशक्य आहे म्हणूनच आपल्याला असं मोठ्या पटांगणात किंवा मैदानावर जमावं लागतं. त्यामुळं आपल्या साध्या गप्पागोष्टीना देखील एखाद्या सभेच स्वरूप येतं, त्याला अर्थातच आपला नाइलाज आहे. आता मी तुमच्याशी ज्या गप्पागोष्टी करणार

आहे त्याला भाषण म्हणता येणार नाही. कारण सभा भरवून भाषण करण्याचा माझा आज उद्देशच नाही. मी फक्त तुमच्याशी जिव्हाळ्याच्या गोष्टी करायला आलोय.

'सौदाण्याला पोलिसानी जबर लाठीहल्ला केला. त्या वेळी लगेच न येता आज महिना उलटल्यावर मी का आलो असा प्रश्न तुमच्यापैकी अनेकाच्या मनात असणं साहजिकच आहे. मी त्याचं कारण सांगतो. जी पुढारीमंडळी आंदोलनामध्ये कधीही नव्हती त्यानी नाशकात उतरताच खेरवाडी आणि सौदाण्याला भेटी दिल्या. माझ्या दृष्टीनं त्या वेळी आंदोलन व्यवस्थित चालवणं, जिथं आपलं सैन्य कमी पडत होतं तिथं जाऊन ते उभं करणं, ह्या गोष्टी जास्त महत्त्वाच्या होत्या. ह्या आंदोलनात जे सहभागी झाले त्याच्याकडून पोलिसाची कमीत कमी एक लाठी खाण्याची वर्गणी माधवराव खंडेराव मोरेनी मागितली होती. तुम्ही ती वर्गणी पुरेपूर दिलीत. आपण लाठ्या खाल्ल्या ह्याचं दु:ख न करता त्याचा सर्वांनी अभिमान बाळगायचा आहे. ह्या आंदोलनात आपल्यावर लाठ्या पडणार ह्याची आपणाला सुरुवातीपासूनच स्पष्ट कल्पना होती.

'येत्या चौदा डिसेंबरपासून आपण सर्व एकत्र जमून आंदोलनाची दिशा, नवा कार्यक्रम ठरवणार आहोत. चौदा तारखेच्या सभेत मी एक महत्त्वाची घोषणा करणार आहे त्याबद्दल थोडी पूर्वकल्पना तुम्हाला मी आज देतो. जेव्हा पोलीस किंवा एस्. आर. पी. चे शिपाई हे केवळ गणवेष घातलेल्या दरवडेखोरासारखे वागतात, घराघरामध्ये घुसतात, चीजवस्तू मोडतात, वस्तू चोरून नेतात, आंदोलनाशी संबंध नसलेल्या निरपराध लोकावर लाठी चालवतात तेव्हा ते पोलीस असत नाहीत. ते सामान्य गुन्हेगार असतात. त्यांनी फक्त पोलिसांचा गणवेष घातलेला असतो एव्हढाच फरक. अशा परिस्थितीमध्ये आपल्या देशातील इंडियन पीनल कोड किंवा भारतीय दंड विधान ह्यानुसार प्रत्येक नागरिकाला स्वत:च्या शरीराला इजा पोहचू नये, आपल्या मालमत्तेचं रक्षण व्हावं म्हणून स्वसंरक्षणार्थ जे काही करावं लागेल ते करण्याचा कायदेशीर अधिकार दिला आहे. तसंच केवळ आपल्या स्वत:च्याच शरीराचं किंवा मालमत्तेचं रक्षण एव्हढ्यापुरताच हा अधिकार मर्यादित नसून आपल्या शेजाऱ्याच्या किंवा इतर कुठल्याही नागरिकाच्या शरीराचं किंवा मालमत्तेचं रक्षण करण्यासाठी बचाव करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. स्वसंरक्षण हा आपला कायदेशीर हक्क आहे ही गोष्ट नीट ध्यानात घ्या !

'सौदाणे, उम्राणे आणि इतर अनेक ठिकाणी शेतकऱ्यानी मोठ्या संख्येनं रस्त्यावर येऊन जे धैर्य दाखवलं त्याचा विचार करता तुम्हाला आणखी काही उपदेश करावा अशी खास पात्रता माझ्या अंगी नाही. आज ह्या भागाचा मी जो दौरा करतो आहे तो केवळ तुम्हा सर्वांना वंदन करण्यासाठी.

'मी फक्त एक विचार तुमच्यापुढं मांडला आणि त्या विचाराला पाठिंबा म्हणून तुम्ही तळहातावर शीर घेऊन इतक्या मोठ्या प्रमाणात रस्त्यावर आलात, सत्याग्रह करून स्वत.ला अटक करवून घेतलीत. तुम्हाला मी त्रिवार वंदन करतो आणि माझ्या सदसद्विवेक बुद्धीला स्मरून सांगतो की, शेतकरी संघटनेचा हा जो मार्ग आपण स्वीकारला आहे तो निश्चितपणे आपली दु:खं दूर करणारा आहे. त्याकरता कष्ट सोसून, वेदना सहन करून तुम्ही ह्या देशामध्ये एक इतिहास निर्माण केला आहे. आजपर्यंत कधीही कुठंही झाली नव्हती इतकी चर्चा आपल्या आंदोलनाविषयी चालू आहे. फक्त भारतातच नव्हे तर परदेशात देखील तेथील वृत्तपत्रं, आकाशवाणी आणि दूरदर्शनवर नासिक आंदोलनाविषयी चर्चा सुरू झाल्या आहेत.

'येत्या चौदा डिसेंबरपासून आपल्याला अजून मोठ्या प्रमाणात आंदोलनाची तयारी करायची आहे. ज्यांना ज्याना शक्य आहे त्यानी त्यानी चौदा तारखेच्या मेळाव्यासाठी पिंपळगाव बसवंत येथे अवश्य यावं. तिथं आपण सगळे मिळून निर्णय घेऊ आणि अत्यंत शांतपणे आणि मोठ्या प्रमाणात आपण हे आंदोलन सुरू ठेवू.

'एक गोष्ट लक्षात ठेवा, आंदोलनाच्या शेवटच्या क्षणी दोन्ही बाजू एकमेकाना तोलून-मापून पहाण्याचा प्रयत्न नेहमीच करतात. आपली तयारी खरोखरी किती आहे ह्याचा शासन अंदाज घेत असतं. आपली आणि सरकारची, दोघाचीही ही कसोटीची वेळ असते. आपण पहिली स्थगिती जाहीर केली तेव्हा लगेच सरकारला जोर चढला. कृषीमंत्री राव बिरेंद्रसिंग म्हणाले— उसाला १३० रुपयांच्यावर काहीही देणार नाही ! त्याचबरोबर आतून मात्र त्यांनी राज्यशासनाला आदेश दिला असणार 'लढा कितपत जोरात उभा रहातोय ते पहा आणि त्यानुसार निर्णय घ्या !'

ह्या अखेरच्या क्षणी काही तडजोड करण्याचा आपल्याला मोह होण्याचा संभव आहे; पण आपण हे जे इतके कष्ट सोसले ते अशा मोहापायी फुकट जाऊ द्यायचे नाहीत. जरूर पडल्यास शासनाशी आम्ही वाटाघाटी करू, वाटाघाटी करण्याची तयारी आम्ही सुरुवातीपासूनच दाखविली आहे; पण शेतकऱ्याचं नुकसान होईल अशा प्रकारची कोणतीही तडजोड आम्ही करणार नाही ह्याची तुम्ही खात्री बाळगा !

'हा ऊस—कांद्याचा लढा तर आपल्याला जिंकायचा आहेच, पण सर्व शेतकऱ्याच्या सर्व शेतमालाला रास्त भाव हे आपलं अंतिम उद्दिष्ट आहे. त्यासाठी अनेक इतर लढे आपल्याला उभे करायचे आहेत ह्या पहिल्या लढ्याच्या वेळी जितका प्रखर निश्चय आपण दाखवू तितके आपले पुढचे लढे सोपे होणार आहेत. हा लढा जर आपण यशस्वी करून दाखवला तर इथून पुढं शेतकरी संघटनेनं नुसती मागणी केली आहे असं कळताच शासन वाटाघाटीला तयार होईल ! हा पहिला लढा म्हणूनच अतिशय महत्त्वाचा आहे. डोकं अतिशय शांत ठेवायची ही वेळ आहे. हा लढा नुसता ताकदीनंच जिंकता येणार नाही. डावपेचाची देखील गरज पडणार आहे.

'अनेक प्रकारच्या भुलवण्या देण्याचा सरकार प्रयत्न करील. आपण गाफील रहाता कामा नये. ह्या भुलवण्याना फसता कामा नये. नेतृत्व हरविल्यामुळं पोटदुखी सुरू झालेले राजकारणी पुढारी आपल्या आंदोलनाविषयी नाना प्रकारचे गैरसमज पसरविण्याचा प्रयत्न करतील, आपल्यात फूट पाडण्याचा प्रयत्न करतील. आपण ह्या मंडळीपासून सावध असायचं. वर्तमानपत्रातून देखील आपल्याबद्दल उलटसुलट चर्चा सुरू होईल, अनेक वावड्या उठविण्यात येतील. आपण त्याकडे अजिबात लक्ष द्यायचं नाही!

'आपली मागणी एकच आहे, शेतमालाला रास्त भाव ! ही मागणी पुरी होईपर्यंत आपण आपल्याला सोयिस्कर अशा मार्गानं आणि तंत्रानं हे आंदोलन चालूच ठेवणार ! आपला लढा राजकीय

नाही. हे आर्थिक आंदोलन आहे. राजकारण्यांना त्याचं तंत्र उमगणार नाही. त्यांना फक्त मोर्चे, निवेदनं हेच मार्ग माहीत आहेत. त्यांना त्यांच्या मार्गानं जाऊ द्या. आपलं त्यात काहीच नुकसान नाही. आपण शेतकरी सघटनेच्या तंत्रानं आपला लढा लढवू या– आपला विजय निश्चित आहे !

' शेतकरी संघटनेचा कार्यक्रम फक्त एक कलमी आहे. राजकारणी पक्षांप्रमाणे चाळीस कलमी किंवा वीस कलमी कार्यक्रम आमचा नाही. शेतकरी संघटना निवडणूक लढवीत नाही, भविष्यात लढविणार नाही! आमच्यापैकी कुणी निवडणुकीच्या वेळी येऊन मत मागू लागले तर पायातलं खेटर काढा आणि बडवा !

' हे पुढारी निवडणुकीच्या वेळी येतात, वेगवेगळ्या धर्मादाय योजनांची आश्वासनं देतात, मतं मिळाली, निवडून आले की पुन्हा पाच वर्षं तोंड दाखवीत नाहीत ! गेली तेहतीस वर्षं असंच चाललंय ! शेतकरी मात्र आहे तिथंच आहे, दिवसेंदिवस त्याची स्थिती खालावतच चालली आहे. गाव सोडून पोट भरण्यासाठी शहरात गेलेल्या आणि झोपडपट्टीत रहाणाऱ्या शेतकऱ्याच्या मुलाची स्थिती तर अत्यंत बिकट होत चालली आहे. हे असं का ?

' निवडणुका कशासाठी असतात ? आपण एखाद्या माणसाला किंवा पक्षाला का निवडून देतो ? आपल्याला वाटत असतं की, ह्याचं राज्य आलं म्हणजे सर्वांना दोन वेळ पोटभर जेवायला मिळेल, सर्वांची परिस्थिती सुधारेल ! पण उपाशी लोकाबद्दल कळवळा व्यक्त करणारी भाषणं झोडणारे हे पुढारी फक्त खुर्ची मिळविण्याच्या मागं असतात ह्याचा आता आपल्या सर्वांना पुरेपूर अनुभव आला आहे. कुठल्याही पक्षाचा पुढारी असो, त्याचं धोरण एकच– खुर्ची मिळविणं ! ती मिळवण्यासाठी भाषणातून हे पुढारी तुम्हां-आम्हाला सांगत असतात– ' गावाला रस्ता बांधून देतो, पाण्याची सोय करतो, शाळा देतो, दवाखाना काढून देतो ! '

' त्यांना विचारावंसं वाटतं शहरामध्ये निवडणुकीची भाषणं ठोकता तेव्हा त्या लोकांना असल्या धर्मादाय योजना देतो म्हणून सांगता का ? शहरामध्ये धर्मादाय दवाखाने आणि शाळा आहेत, पण कुणासाठी ? झोपडपट्टीत रहाणाऱ्या शेतकऱ्याच्या मुलासाठीच ! फक्त शेतकऱ्यालाच धर्मादाय का ? ग्रामीण भागातील शेतकऱ्यानं किंवा भारताचा निर्वासित म्हणून ' इंडिया ' च्या झोपडपट्टीत रहाणाऱ्या शेतकऱ्याच्या मुलानं सदा भिकेच्या तुकड्यावर जगावं, सरकारच्या दयेवर अवलंबून आयुष्य कंठावं अशी अवस्था का ?

' निवडणुकीच्या वेळी मतं मागत फिरणाऱ्या एका आमदाराची गोष्ट आहे. एका गावातील मंडळींनी ह्या आमदारमहाशयांना विनंती केली की, पाण्याचा प्रश्न सोडवा गावाजवळून जाणारा पाट गावच्या दिशेनं वळवून घ्या ! आमदार म्हणाले, काळजी करू नका, ताबडतोब पाट वळवून देतो. त्यावर गावकरी कुरकूर करत सांगू लागले की, नुसता पाट वळवून उपयोग नाही, पाटात पाणीच नाही! पाणी येण्यासाठी वरच्या बाजूला अगोदर धरण बांधावं लागेल ! आमदार म्हणाले, त्यात काय अवघड ? आपण लगेच तिथे धरण बांधून टाकू. तरीदेखील गावकऱ्याची कुरकुर थांबेना; ते चाचरत सांगू लागले की, अहो, धरण बांधाल; पण तिथे नदीच नाही ! तेव्हा आमदार हसत म्हणाले, हात्तीच्या, एवढंच ना ? काळजी करू नका. मी तुम्हाला नदी आणून देतो ! अशी ह्या पुढारीमंडळींची आश्वासनं देण्याची पद्धत !

' शेतकरी संघटना असली कुठलीच आश्वासनं तुम्हाला देणार नाही आणि मत मागायला तर मुळीच येणार नाही. आम्ही तुम्हाला फक्त एक विचार देणार, तो विचार पटला तर पुढचं सगळं तुमचं तुम्हीच मिळवायचं आहे आम्ही तुम्हाला काहीच देणार नाही !

' काही निवडक शेतमालाचे लढे उभे करून शेतकरी संघटना बांधण्याचं काम आपण सध्या हाती घेतलं आहे कुठच्या शेतमालासाठी केव्हा, कुठे आणि कशा प्रकारचं आंदोलन उभं करायचं ह्याचं शास्त्रशुद्ध नियोजन आपण करणार आहोत. ही संघटना केवळ ऊस आणि कांदा पिकविणाऱ्या शेतकऱ्यांची नाही ही गोष्ट मी स्पष्ट करू इच्छितो. प्राथमिक लढे देण्यास सोयिस्कर म्हणून ही पिके निवडण्यात आली. तुम्ही जर म्हणाल आजच ज्वारीचा किंवा भाताचा लढा हाती घ्या तर तो यशस्वी होणार नाही. जोपर्यंत शेतकरी संघटनेचा विचार आंध्रप्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, गुजराथ आणि मध्यप्रदेश या राज्यांमध्ये रुजत नाही तोपर्यंत ज्वारी, बाजरी किंवा भात ह्याचा यशस्वी लढा उभारता येणार नाही !

' ज्या शेतकरी संघटनेचं काम दहा महिन्यांपूर्वी कांद्याच्या लढ्यानं चाकण तालुक्यात सुरू झालं तीच सघटना ऊस आणि कांदा यांचा लढा उभा करण्यासाठी महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यांत पसरली. कपाशीचा लढा देणारे विदर्भातील पाच जिल्हे आता शेतकरी संघटनेला साथ देण्यास तयार आहेत. तालुका पातळीवर सुरू झालेली ही शेतकरी संघटना केवळ दहा महिन्यात महाराष्ट्रातील दहाबारा जिल्ह्यात पसरली. भविष्यात ती देशव्यापी होईल आणि तेव्हा सर्व शेतकऱ्याच्या सर्व शेतमालाविषयीचे लढे उभारण्यात येतील. आपण लवकरच दुधाचा लढा उभारणार आहोत. त्या वेळी संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी त्यात सहभागी होतील. गुजराथमधील दूधउत्पादक शेतकरी महाराष्ट्रातील शेतकऱ्याला साथ देतील. दुधाच्या ताकदीवर भारताचा लढादेखील देण्यात येईल ! अशा रीतीने निवडक शेतमालाचे लढे उभे करून शेतकरी संघटना बांधायची आहे आणि कोरडवाहू शेतकऱ्यांच्या समस्या सोडवायच्या आहेत !

' केवळ भावनेच्या आहारी जाऊन आजच गडबड करून कोरडवाहू पिकाचे लढे हाती घेतले तर पदरामध्ये केवळ अपयशच येईल. त्याचप्रमाणे केवळ अस्तित्व टिकविण्यासाठी आणि वर्तमानपत्रात रोज नाव छापून यावं म्हणून शेतकऱ्यांच्या नावानं भलतेच कसले तरी कार्यक्रम हाती घेऊन तात्पुरती खळबळ माजविण्याच्या प्रयत्नांनाही फारसा अर्थ नाही. आतापर्यंत तुम्ही अनेक वेगवेगळ्या कारणांसाठी आंदोलनं केली असतील. ही आंदोलनं कुठल्या ना कुठल्या राजकीय प्रश्नाच्या चिथावणीनं किंवा सहाय्यानंच झाली असतील. शेतमालाच्या भावाविषयीच हे आपलं आंदोलन संपूर्णपणे पक्षविरहित आहे आणि ते आर्थिक आंदोलन आहे हा मोठा फरक ध्यानात ठेवा! आपलं आंदोलन दीर्घ मुदतीचं आहे. ह्यापूर्वी अशा प्रकारनं आंदोलन आपल्या देशात झालं नाही !

' ज्यांना कोणतीही व्यक्तिगत अभिलाषा नाही त्यांनाच ही दीर्घ मुदतीची लढाई खेळण्याइतका धीर असणार आहे. ज्यांना निवड-

णुकीची वेळापत्रकं सांभाळायची असतात त्यांना असा धीर धरवणार नाही. त्याना सारखे मोर्चे काढण्याची घाई होणार ! ज्या कार्यकर्त्यांना ह्या आदोलनातून कसलंही राजकीय भांडवल करायचं नाही, वैय-क्तिक स्वार्थ साधायचा नाही त्यानाच आदोलनाचं हे तंत्र पटणार, इतराना नाही. राजकारणापासून अलिप्तता हीच शेतकरी आदोलनाची गुरुकिल्ली आहे !

'आपल्या आंदोलनाची पुढची एक महत्त्वाची पायरी सागून ठेवतो. २५ मे १९८१ ही तारीख पक्की लक्षात ठेवा ! सपूर्ण महाराष्ट्रभर ह्या तारखेपासून दुधाचा लढा सुरू होणार आहे. दुधाला किती भाव मिळाला पाहिजे ह्याचा अभ्यास चालू आहे. तो अभ्यास पूर्ण होताच आम्ही भाव जाहीर करू. शेतकरी संघटना दुधाचा लढा हाती घेणार असं कळताच काही पुढारी मंडळीना ह्या लढ्याचं नेतेपण करण्याची घाई झाली आहे. ही पुढारी मंडळी गडबड करून दुधाचा भाव तीन रुपये, चार रुपये, सहा रुपये अशा काय वाटेल त्या घोषणा देत दुधाचा लढा भलत्याच कुठल्या तरी वेळी जाहीर करण्याची शक्यता आहे. दुधाला योग्य भाव मिळतो का नाही ह्यापेक्षा आपलं नेतेपण टिकतं का नाही ह्याचीच ह्या मंडळीना खरं म्हणजे जास्त चिंता पडली आहे. तूर्त त्याच्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करा ! राजकारणी लोक दुसरी कुठली तरी तारीख जाहीर करतील, त्याच्यामागं ज्यांना जायचं त्याना जाऊ द्या ! दुधाच्या लढ्याची आपली तारीख २५ मे १९८१. ही तारीख आपण सपूर्ण विचाराअंती ठरविली आहे. त्याचप्रमाणे आपण जो भाव मागू तो देखील संपूर्ण अभ्यास करूनच ठरविलेला असेल ! दुधाच्या किंवा इतर शेतमालाच्या लढ्यातून आपल्याला आमदारकी, खासदारकी किंवा 'खुर्ची' मिळवायची किंवा टिकवायची नाही–आपल्याला फक्त योग्य भाव पाहिजे आणि तो मिळविण्यासाठी प्रभावी लढा उभारावयाचा असेल तर २५ मे हीच तारीख योग्य आहे. नेमकी ही तारीखच का निवडली हे तुमच्यापैकी अनेकाना माहीत आहे. त्याबद्दल आज जाहीर चर्चा करण्याचं कारण नाही.

'शेतकऱ्याच्या काही निवडक अशा सात–आठ शेतमालाचे लढे यशस्वी झाले की ग्रामीण भागाचं संपूर्ण स्वरूपच पालटू लागणार आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे शेतकरी कर्जमुक्त होणार आहे. सोसायटी, बँका ह्याचा तो थकबाकीदार असणार नाही. मुलीच्या लग्नासाठी किंवा इतर काही कारणासाठी खाजगी कर्ज काढल्यामुळं शेतकऱ्याच्या ज्या जमिनी सावकारांच्याकडे गहाण पडल्या आहेत त्या तो परत मिळवणार आहे. त्याला कुणाच्याही भिकेची, धर्मादायाची गरज उरणार नाही आणि हे सर्व पुढील एकदोन वर्षात घडणं शक्य आहे.

'हे जर घडावं अशी प्रामाणिक इच्छा असेल तर 'शेतकरी तितका एक एक' हे आपण लक्षात ठेवलं पाहिजे ! शेतकरी संघटित होऊ नये, त्यांच्यात एकी होऊ नये म्हणून सरकार आणि इतर राजकारणी हितसंबधी वडा शेतकरी–छोटा शेतकरी-असे भेद निर्माण करून ग्रामीण भागात वाद निर्माण करणाचा आटोकाट प्रयत्न करणार हे निश्चित ! अनेक ठिकाणी शेतकरी–शेतमजूर हा भेद अस्तित्वात आहे हे देखील सत्य आहे; पण हा भेद मिटवला पाहिजे. कुणी जर शेतकरी आणि शेतमजूर अशी फूट पाडण्याचा प्रयत्न केला तर तो हाणून पाडला पाहिजे. जो शेतावर राबतो, शेतीव्यवसयावर पोट भरतो तो शेतकरी, हे ध्यानात ठेवून आपली एकी कायम ठेवली पाहिजे !

'एका रानात दोन बैल नेहमी जोडीनं चरायचे, जोडीनं रहायचे. त्यामुळं सिंहाला त्याच्यावर हल्ला करून त्याना खाणं जमत नव्हतं. सिंहानं एका कोल्ह्याच्या मदतीनं दोन्ही बैलात फूट पाडली–भाडणं लावून दिली. दोघे दोन दिशेला तोड करून एकमेकांपासून दूर चरू लागले आणि सिंहानं दोघाचाही फडशा पाडला ! त्याचप्रमाणे राजकारण्यांच्या भूलथापाना बळी पडून शेतकरी आणि शेतमजूर जर आपआपसात भाडून वेगळे राहिले तर दोघाचाही सत्यनाश अटळ आहे. त्यांचा असा नाश व्हावा हीच तर राजकारण्यांची खरी इच्छा आहे आणि त्याचा भरपूर पुरावा आपल्याला गेल्या तेहेतीस वर्षांत मिळाला आहे.

'ह्याच मुद्दयावरून आपल्या आंदोलनात एक दोष मला दिसून आला तो मी स्पष्टपणे आपल्याला दाखवू इच्छितो. ह्या आंदोलनात शेतमजुरानी जेव्हढ्या मोठ्या प्रमाणात भाग घ्यावयास हवा होता तितक्या प्रमाणात त्यानी घेतला नाही ही वस्तुस्थिती आहे. याचा अर्थ असा की, शेतकरी ह्या शब्दामध्ये मोठा शेतकरी, छोटा–अल्प भूधारक, शेतमजूर ह्या सर्वांचा समावेश आहे आणि शेतमालाला भाव मिळाला तरच ह्या सर्वांचं कल्याण होणार हा विचार मी जो सतत प्रथमपासून मांडत आलो आहे तो आपल्या शेतमजूर बाधवापर्यंत अजून पुरेसा पसरला नाही.

'आपला विचार वास्तविक सोपा जाहे. जोपर्यंत आडात पाणी नाही तोपर्यंत पोहऱ्यात येऊ शकत नाही. गायीला दूध नसेल तर वासरानं कितीही ढुश्या दिल्या तरी त्याचा काही उपयोग नाही. आपण प्रथम आडात पाणी यावं म्हणून प्रयत्न करतोय, गायीला दूध यावं म्हणून प्रयत्न करतोय ! शेतमजूर–बाधवाना मी हमी देतो की, शेतमालाचा उत्पादनखर्च काढताना आम्ही जो मजुरीचा खर्च धरलेला असेल तो तर शेतमजुरांना मिळेलच; पण नंतर त्याहीपेक्षा जास्त मिळवून देऊ माझं तर असं स्पष्ट मत आहे की, एखाद्या बँकेत इकडचे कागद नुसते तिकडे करण्यासाठी एखाद्या शिपायाला बोनस धरून दिवसाला तीस रुपये मिळतात तर घाम गाळणाऱ्या शेतमजुराला दिवसाला वीस रुपये मजुरी का मिळू नये ? शेतकऱ्याच्या शेतमालाला रास्त भाव मिळाला तर शेतमजुराला अशी मजुरी मिळवून देणं सहज शक्य आहे; पण त्यासाठी शेतकरी आणि शेतमजूर यानी आपआपसात एकी टिकवून धरणं महत्त्वाचं आहे.

'तुमच्या घामाला दाम मिळाला, तुमच्या कष्टाला मोल मिळालं की दुसऱ्या कुणाची तरी बिगरकष्टाची मौजमजा थांबणार आहे. त्यामुळं तुमच्या कष्टान पिकविलेल्या मालाला घामाइतका दाम

**दुधाच्या लढ्याची आपली तारीख २५ मे १९८१ !**

मागितला तर घाम न काढता चैन करायची सवय लागलेले इंडिया-वाले तुम्हाला सहजासहजी भाव देणार नाहीत. ही लढाई सहजा-सहजी जिंकता येणार नाही. ह्या आंदोलनात लाठीहल्ला, अश्रुधूर, गोळीबार ह्याचा अनुभव तुम्हाला ह्याच कारणासाठी मिळाला. तुम्हाला अतोनात कष्ट सोसावे लागले, वेदना सहन कराव्या लागल्या !

'शेतकरी संघटनेचे तुम्ही सर्व कार्यकर्ते बाहेर अतोनात कष्ट आणि यातना सहन करत असताना मी तुरुंगात असल्यामुळं तुमचं दु:ख वाटून घेण्याचा कोणताच मार्ग माझ्यासमोर शिल्लक नव्हता. म्हणून मी उपोषण सुरू केलं. सरकारनं शेतमालाच्या भावाविषयीची आमची मागणी मान्य करावी म्हणून दबाव आणण्यासाठी मी उपोषण केलं नाही. आपण निदान थोडचा तरी यातना सहन करून शेतकऱ्याच्या दु:खात सहभागी होण्याचं समाधान मिळवावं एव्हढचा एकाच हेतूनं मी उपोषण केलं. बाहेर हजारो माणस लाठ्या-काठ्यांचा मार खाऊन वेदना सहन करत आहेत तेव्हा आपण उपोषणाच्या वेदना तरी सहन केल्या पाहिजेत असं माझं मन मला बजावत होतं.

'इथून पुढं आदोलनाचं स्वरूप कशा प्रकारचं असेल ते अजून ठरायचं आहे. पिंपळगाव बसवंतला १४ डिसेंबरच्या मेळाव्यात तो निर्णय घेण्यात येईल. हिंदुस्थानात ह्यापूर्वी कधीही झाला नाही असा अभूतपूर्व मेळावा पिंपळगाव बसवंतला भरणार आहे. दिल्लीला भरणाऱ्या किसान मेळाव्याप्रमाणं त्याचं स्वरूप असणार नाही. कुणी तरी पैसे खर्चून, माणसं गोळा करून आणणार नाही. शेतकरी स्वयंस्फूर्तीनं, स्वत:च्या इच्छेनं, स्वत:च्या खर्चानं, जे मिळेल त्या साधनानं पिंपळगाव बसवंताला येणार आहे. तिथं येऊन तो नुसती भाषणं ऐकणार नाही तर आपल्या सगळ्या भविष्याचा विचार करणार आहे. ह्या मेळाव्यात आंदोलनाची पुढची दिशा ठरविण्यात येणार आहे !

¤

माळमाथ्यावरील अठरा गावाचा झंझावाती दौरा शरद जोशी पार पाडीत होते. तेव्हा जिथं संधी आणि वेळ मिळेल तिथं मी शेतकऱ्यांच्या मुलाखती घेत होतो. सौदाण्याचे माधवराव सदाशिव पाटील संतापानं लालबुंद होत सांगत होते—

'जगातल्या सगळ्या कारखानदारीचा हिशोब करा. त्याच्या पदरात किती पडतं ते बघा. त्याच पद्धतीनं शेतकऱ्याच्या शेतीचा हिशोब करा आणि त्याच्या पदरात काय पडतं बघा. काय पडलं पाहिजे ते ठरवा ! आम्ही दुसरं काहीही मागत नाही. कारखानदारांच्या मात्र माडयावर माडया चढतात आणि इथं शेतकरी मात्र पार गाळात रुतत चाललाय ! तेव्हा हा हिशोब योग्य असणं शक्य आहे का तुम्हीच सागा !

'आणि आम्ही आमच्या मालाला भाव मागायला लागलो तर हे भोसडीचे घरात घुसून हाणायलाच लागले! ही काय लोकशाही राजवट का हिटलरशाही ?'

वयोवृद्ध माधवराव पाटील रागानं थरथर कापत होते. मी त्यांना विचारलं, 'तुम्ही असं काय मागत होता म्हणून तुम्हाला मारलं सरकारनं ?' माझ्याकडे जळजळीत नजरेनं पहात ते म्हणाले—

'काय मागत होतो ? अहो, फक्त पोटापुरत मागत होतो ! आणि असं मागणं काही गुन्हा आहे का ? पूर्वापार आम्हाला का भरडणं चाललंय असं विचार होतो ! असं विचारणं गुन्हा आहे का ? पण हे सरळ घरात घुसूनच हाणायला लागले ! बेसुमार मारल लोकास्नी. सगळे तिथरबिथर होऊन गेले. रात्रभर धुमाकूळ घातला, अत्याचार केला. घराचे दरवाजे मोडले, खिडक्या उखडल्या, गाद्या–अंथरुणं पेटवून दिली, कपडे जाळले, जनावराच्या शेपटचा कापल्या, भाकरी तुडवून जाळात टाकल्या! ह्याना काय माणसं म्हणायचं का सैतान ? स्वराज्य मिळून तेहतीस वर्षं झाली; पण सगळा फायदा कारखानदाराना ! मग शेतकऱ्याला का नको ?— नुसतं मागून हे देणार नाहीत, लढावंच लागणार !'

'तेहतीस वर्षं मुकाटयानं तुम्ही सहन का केलंत ?'

'झालं ते सोडून द्या ! आता आम्ही जागे झालोय. शरद जोशीनं आमच्या डोक्यात लाइट पेटवलाय. आता मात्र आम्ही सगळ्यानी एकत्र येऊन मोठं आदोलन उभारलं पाहिजे तरच उपयोग होणार, एरवी नाही ! आम्ही फक्त पोटासाठी मागतोय आणि ते देखील हिशोबानं. आमच्यातल्या काही माणसाच्याजवळ मोटारी, ट्रॅक्टर, फटफटचा आहेत; पण हा सगळा कर्जबाजारीपणाचा खेळ आहे ! आल्ल्या सौदाण्यात एक तरी सिमेंटकाँक्रीटची इमारत दिसते का तुम्हाला ? इथं कुणापाशीच पैसा नाही. सगळे कर्जात बुडालेले ! शहरच्या लोकांना वाटतं आम्ही ऊसवाले पांढरेफेक कपडे घालून फिरणारे बडे बागायतदार! अहो, उसाची शोभा फक्त दिसायला गोड. इथं शेतकऱ्याच्या गांडीतून लेंडूक देखील पडत नाही, पोटातच नाही त्याच्या तर पडणार काय ? कारखानदारांचं आमच्यासारखं नाही. दोन रुपये किलोच्या हिशोबानं चोवीस रुपयाचं लोखंड घ्यायचं, त्याच्यावर प्रक्रिया करून अर्ध्या रात्रीत त्याची इलेक्ट्रिक मोटार बनवायची आणि तिचे दोन हजार रुपये घ्यायचे शेतकऱ्याकडून, हा काय न्याय झाला ? मी घातलंय ह्या धोतराला लागणारा कापूस विकून शेतकऱ्याला पाच रुपये सुद्धा मिळाले नसतील, त्याच कापसाचं धोतर मात्र पन्नास रुपयाला विकत घ्यावं लागतं ! हा काय हिशोब झाला ? हे असं लुबाडणं का ? सगळ्याना एकाच पद्धतीनं हिशोब करून रास्त भाव का मिळत नाही ?'

'आतापर्यंत ज्याना तुम्ही निवडून दिलंत त्यांनी तुमच्या शेतमालाला भाव का मिळवून दिले नाहीत ?'

'त्यांच्यातले काही बाराबोडचाचे निघाले ! आमच्या इकडचाच मंत्री झाला तरी त्यानं आमच्याबाबतीतच खोट काम केलं. इथं पाट आणायचं ठरलं होतं, आखणी झाली होती. त्या आखणीप्रमाणं पाणी आलं असतं तर चाळीस खेडचाचं कल्याण झालं असतं ! ह्या माळमाथ्यावर प्यायच्या पाण्याची पण सोय झाली असती; पण सगळी लबाडी चालू आहे. ही मंडळी आमच्या शेतमालाला भाव कधीच मिळू देणार नाहीत. त्यासाठी आम्हाला लढावंच लागणार !

सौंदाण्यामध्ये रात्रीच्या वेळी गावात शिरून पोलीस आणि एस्. आर. पीनं घराघरात शिरून लोकाना मारहाण केली होती. हरिजनवाडयात घुसून देखील मारहाण केली होती. त्या लाठीहल्ल्यात माधव हरी अहिरे याचा हात मोडला होता. त्यांच्या पत्नी यशोदाबाई हुंदके आवरत सांगत होत्या—

'दार मोडून ते घरात घुसले. मी म्हटलं आम्ही हरिजन आहोत,

बुद्ध आहोत ; पण त्यांनी बुद्धाला मोडून टाकलं, बाबाचा फोटो फोडला, माझ्या मुलाला मारलं ! आम्ही काय अन्याय केला होता ? दोन रुपये कमावून खाणारे आम्ही ते देखील धड खाऊ देईनात! कुणाला सांगायच आम्ही ?—त्यापेक्षा गोळी घालून आम्हाला मारून का टाकीत नाहीत ? कशाला ठेवलंत जिवंत ?'

घरात घुसून ते म्हणाले— तुमच्या आयला तुम्ही मातलेत, तीनशे रुपये भाव मागता ! आणि लागले मारायला. मी पाया पडून विनवलं पण ऐकेनात. आमच्या माणसाचा हात तुटोस्तवर त्याला मारलं ! आता तो बसून आहे घरामध्ये. आम्ही कुणाला सांगावं ? आता कार्य रोजगार कमवावा आणि पोरास्नी काय खायला घालावं ? महिना झाला, आमचा माणूस असा घरात बसून आहे— कुणाला आमचे हाल सांगावेत ?'

यशोदाबाईंना पुढं बोलवत नव्हतं. त्या मूकपणे आपलं दुःख गिळीत राहिल्या माझं मस्तक सैरभैर झालं. डोक्यात शरद जोशींचे शब्द घुमु लागले—'पोलीस जर गणवेष घातलेल्या दरवडेखोरांसारखे वागू लागले तर स्वतःच्या शरीराचं आणि मालमत्तेच रक्षण करण्याचा, स्वसंरक्षणाचा हक्क प्रत्येक नागरिकाला भारतीय दंडविधानानं दिलेला आहे !'

माळमाथ्याचा दौरा आटोपून आम्ही पिंपळगाव बसवंतला परतलो तेव्हा मध्यरात्र उलटून गेली होती. प्रचंड दमलो होतो; पण झोप येत नव्हती. सौंदाण्याच्या यशोदाबाईंचा दबलेला हुंदका कानात घुमत होता— 'शेतकरी म्हणजे दोन पायाचं जनावर असं समजून त्याला लाठीनं गुरासारख बडवलं जातंय—' हे शरद जोशींचं वाक्य मनात पिंगा घालत होतं. मी अतिशय अस्वस्थ झालो होतो...

¤

१३ डिसेंबरला सकाळी आम्ही माधवराव खंडेराव मोरेचं घर सोडलं आणि नाशिकाची वाट धरली. माधवराव गाडी चालवत होते, शरद जोशी कसल्या तरी विचारात गढले होते. आमच्यामागं ओळखीची वायरलेस जीप होती.

नाशिकातील एका महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी 'शेतकरी आंदोलनामागचा अर्थशास्त्रीय विचार' या विषयावर शरद जोशींचं व्याख्यान ठेवलं होतं. परवानगी अर्थातच मिळाली नव्हती; पण अखेरच्या क्षणी मिळाली.

विद्यार्थ्यांना शरद जोशींकडून आंदोलनाविषयी आदेश हवा होता; पण त्याची निराशा झाली. शरद जोशींनी अतिशय स्वच्छ आणि सोप्या भाषेत अर्थशास्त्रीय विचार विद्यार्थ्यांपुढं मांडला. अनेकांना अर्थातच अर्थशास्त्रीय विचारामध्ये विशेष रस नव्हता. त्यांना 'आंदोलनात विद्यार्थ्यांनी काय करावं ?' ह्याबद्दल नेमक्या सूचना हव्या होत्या. प्रश्नोत्तराच्या निमित्तानं अशा सूचना मिळविण्याचा विद्यार्थ्यांनी प्रयत्न करून पाहिला; पण आंदोलनाविषयी काहीही बोलण्यास शरद जोशींनी विनम्रपणे नकार दिला. पिंपळगाव बसवंतच्या मेळाव्याला विद्यार्थ्यांनी हजर रहावं असं आग्रहाचं आमंत्रण मात्र त्यांनी दिलं.

¤

१४ डिसेंबर १९८०. पहाटेपासूच पिंपळगाव बसवंतला शेतकरी जमू लागले. एरवी शांत असणाऱ्या ह्या गावाला एकाएकी जत्रेचं स्वरूप आलं होतं. सकाळी आठच्या सुमारास एक पोलीसअधिकारी आला. कलेक्टरांनी सभेला परवानगी दिली असल्याचा त्यानं निरोप आणला होता. 'सभा संपूर्ण शांततेनं पार पडली पाहिजे, तसच सभेचं विसर्जन देखील शांततेनं झालं पाहिजे' अशा शासनानं अटी घातल्या होत्या.

जरूर पडल्यास शांतता आणि सुव्यवस्था राखता यावी म्हणून लाठ्या-बंदुका धारण केलेल्या एस्. आर. पी. नं पिंपळगावला तळ ठोकला होता. नाशिकचे डी. एस्. पी. ग्यानचंद वर्मा ह्यांची बदली करण्यात आली होती. त्यांच्या जागी धुळ्याच्या पुरीसाहेबांची नेमणूक करण्यात आली होती. कडक आणि शिस्तप्रिय अशी ख्याती असलेले पुरीसाहेब जातीनं शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पिंपळगाव बसवंत इथं हजर होते.

दुपारी दोनच्या सुमारास मी गळ्यात कॅमेरा अडकवून मोरेंच्या घरातून बाहेर पडलो. शरद जोशी पण निघण्याच्या तयारीत होते. माधवराव खंडेराव मोरे, प्रल्हाद पाटील कराड, माधवराव बोरस्ते एकमेकांची चेष्टामस्करी करीत होते. इतक्यात एक पोलीसअधिकारी जीपमधून आला. तातडीनं घरात गेला. त्याच्या हाती कसला तरी लखोटा होता. काही वेळात माधवरावांच्या घरातून 'झिंदाबाद'च्या घोषणा ऐकू आल्या. माझी बायको सरोजा धावत-पळत मला गाठत म्हणाली, 'मुंबईहून मुख्यमंत्र्यांची तार आली आहे— वाटाघाटीला तयार आहेत. शरद जोशींना बोलावलंय !'

मी काहीच बोललो नाही. आम्ही झपझप पावलं टाकत सभेचं मैदान गाठलं. शेतकरी प्रचंड संख्येनं उपस्थित होते. पन्नास हजाराच्या आसपास नक्कीच-जास्तच असतील; पण कमी नाही! आज जर मुख्यमंत्र्यांची तार आली नसती तर ? — तर शरद जोशींचा आदेश ऐकून ही पन्नास हजार माणसं सरळ सत्याग्रहात उतरली असती ! पण मग शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी तत्पर असलेल्या डी. एस्. पी. पुरीसाहेबांनी एस्. आर. पी ना कसले आदेश दिले असते ? —तार आल्यामुळं शरद जोशी आंदोलन पुन्हा स्थगित करणार का चालू करण्याचा आदेश देणार ? आदेशाचा मसुदा आणि आंदोलनाचा पुढील कार्यक्रम काल रात्रीच निश्चित करण्यात आला होता. तारखा देखील ठरल्या होत्या; पण मुख्यमंत्र्यांच्या तारेनं नेमकी वेळ साधली होती अर्थात हा प्रश्न जर वाटाघाटीनं सुटणार असेल तर विनाकारण हट्टानं आंदोलन करायचं नाही अशी भूमिका शरद जोशींनी सुरुवातीपासूनच स्पष्ट केली होती. शासनानं वाटाघाटीला तयार व्हावं म्हणून त्यांनी ह्यापूर्वी अनेक वेळा प्रयत्न देखील केले होते. शासनच अडून बसलं होतं. शासनाला शरद जोशींची ताकद अजमावून पहायची असावी ! एकदा स्थगित केलेलं आंदोलन पुन्हा खरोखरच मोठ्या प्रमाणात सुरू होऊ शकेल का ह्याचा शासन अंदाज घेत असणार ! आज पिंपळगावला अर्धा लाख लोक जमलेले पाहून शासनाचे डोळे उघडले असणार आणि म्हणूनच वाटाघाटीची तार ! — साधारण तीन-सव्वातीनच्या सुमारास

## त्यांनी बाबाचा फोटो फोडला, माझ्या मुलाला मारलं. हे कुणाला सांगायचं ?

माधवराव खंडेराव मोरे प्रास्ताविक भाषण करण्यासाठी उभे राहिले.

'मित्रहो, आज तुम्ही सगळे इतक्या मोठ्या सख्येनं उपस्थित आहात, आदोलन इतक्या ताकतीनं तुम्ही उभं केलंत, सगळा हिंदुस्थान त्यामुळं हादरला! तुम्हाला मी पहिला मानाचा मुजरा करून आपल्या मेळाव्याच्या कामकाजाची सुरुवात करतो.

'एक गोष्ट मी सुरुवातीलाच स्पष्ट करू इच्छितो, आपण फार दुर्दैवी माणसं आहोत ! आपली लढाई लाबणार अशी चिन्हं स्पष्ट दिसू लागली आहेत. त्यामुळं कधीकधी माझ्या मनाला वाटतं की आपल्या दुर्दैवाला अत नसावा !

'आतापर्यंत झालेल्या आदोलनाचा आणि कार्याचा आढावा घेऊन पुढे येणाऱ्या संकटाबद्दल आपले नेते आपल्याला मार्गदर्शन करतील. पुढे आपण काय करायचं ह्याबद्दल आदेश देतील. मला मात्र एका गोष्टीचं फार दुःख होतं, ज्या ज्या वेळेला आपण पिंपळगाव बसवंतला मेळावा भरवला त्याअगोदर कुठं तरी शेतकऱ्याचं रक्त साडलेलं असतं. आपल हे फार मोठं दुर्दैव आहे !

'आपले जे बाधव ह्या आदोलनात धारातीर्थी पडले, त्यांच्या साडलेल्या रक्ताला आपण विसरलो नाही त्याची साक्ष आज ह्या मेळाव्यानं दिली आहे. त्या शूर शेतकऱ्याच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून आपण सर्वांनी उठून, दोन मिनिट स्तब्धता पाळून त्याना श्रद्धाजली अर्पण करू या !'

सारा शेतकरीसमुदाय भारावल्याप्रमाणं उठून उभा राहिला. लोकांनी डोक्यावरच्या टोप्या काढल्या आणि सगळे न हलता, माना खाली घालून, डोळे मिटून उभे राहिले. अनेकानी भक्तिभावानं हात जोडले होते. श्रद्धाजली अर्पण करून झाल्यावर सगळेजण शातपणे खाली बसले. कसली गडबड नाही, गोधळ नाही. शेतकरी संघटनेच्या मेळाव्यामधील ही शिस्त खरोखर वाखाणण्यासारखी आहे. माधवराव खंडेराव शेतकऱ्याना सागत होते–

'मित्रहो, आजची आपली ही सभा, हा भव्य मेळावा म्हणजे शेतकरी आदोलनाच्या लढाईच्या तिसऱ्या टप्प्याची सुरुवात आहे. जी किंमत मोजून तुम्ही एव्हढ्या मोठ्या सख्येनं इथं जमलात त्याला हिशोब नाही ! पण एव्हढ्यानं भागणार नाही हे ध्यानात ठेवा ! आपल्या रामायणातील राम आता कुठं नुसता अयोध्येच्या बाहेर पडला आहे, त्याचा वनवास इथून पुढं सुरू व्हायचा आहे. म्हणून सांगतो हुरळून जाऊ नका, सावध रहा !

'आपले नेते शरद जोशी जे मार्गदर्शन करणार आहेत ते जिवाचे कान करून ऐका ! शरद जोशी जे सांगणार आहेत ते आपण आचरणात किती आणू शकतो इथं आपली खरी परीक्षा असणार आहे. ह्या परीक्षेत आपल्याला पंचाण्णव टक्के मार्क पडून उपयोग नाही. शंभरपैकी शंभर मार्क पडायला पाहिजेत तरच आपण जगणार आहोत– एरवी नाही! म्हणून सागतो, जिवाचे कान करून ऐका ! शेतकरी संघटनेच्या नेत्याच्या मार्गदर्शनाकडे लक्षपूर्वक ध्यान द्या अशी मी तुम्हाला विनंती करतो.

माधवराव खंडेराव मोरेच्या नंतर प्रल्हाद पाटील कराड बोलायला उभे राहिले. समोरचा जनसमुदाय पाहून प्रल्हाद पाटलांचा चेहरा अभिमानानं फुलून उठला होता सर्वप्रथम त्यानी विदर्भातील पाच जिल्ह्यामधून आलेले शेतकरी, उस्मानाबाद, धुळे, अहमदनगर, कोल्हापूर वगैरे जिल्ह्यातील शेतकरी प्रतिनिधी आणि देशभरचे वार्ताहर ह्याचं हार्दिक स्वागत केलं आणि भाषणाला सुरुवात केली–

'सात–आठशे वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील आणि भारतामधील शेतकरी गुण्यागोविंदानं आणि समाधानानं रहात होता. त्यानंतर सुलतानशाही सुरू झाली आणि शेतकऱ्याच्या शोषणाला सुरुवात झाली. तीनशे वर्षांपूर्वी शिवछत्रपतींनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली आणि शेतकऱ्याला काही काळ सुखाचे दिवस अनुभवता आले. त्यानंतर परकीयाच्या आक्रमणाखाली हा देश गुलाम झाला आणि शेतकऱ्यांचं दैन्य वाढत गेलं. शिवछत्रपतींच्याकाळात शेतकऱ्याला श्वास घ्यायला संधी मिळाली; पण त्यानंतरच्या तीनशे वर्षांच्या काळात पुन्हा एकदा त्याच्या गळ्याभोवतीचा फास आवळण्यात आला.

'भारतामधील शेतकरी–कामकरी, जो राब राब–राबतो, थंडीऊन, वारा ह्यामध्ये कष्ट उपसतो, त्याला न्याय मिळायचा असेल तर परकीयांची सत्ता गेली पाहिजे म्हणून महात्मा गाधींनी स्वातंत्र्याचा लढा उभारला. चोवीस वर्षांपूर्वी भारतवासीयांनी एक दिव्य केलं, गाधीजीना साथ दिली आणि इंग्रजाची सत्ता सपविली. आपणा सर्वांना समाधानानं जगता यावं म्हणून हा स्वातंत्र्यलढा देण्यात आला; पण दुर्दैवानं गेल्या तेहतीस वर्षांत अनेक राजकीय पक्षाच्या सत्ता आल्या आणि गेल्या, पण शेतीव्यवसायाला न्याय मिळालाच नाही ! सत्तेवर आलेल्या मूठभर भारतवासीयांनी बहुसंख्य भारतीयाचं स्वराज्य चोरलं आणि आपली फार मोठी फसवणूक केली !

'आपल्यावर राज्य करणाऱ्या आपल्याच लोकानी आपल्याला लुबाडण्याचा धंदा सुरू केला. स्वातंत्र्यानंतर आज प्रथमच शेतीव्यावसायिकाना पक्षविरहित आणि सत्तेची अभिलाषा न बाळगणारं, संपूर्णपणे प्रामाणिक आणि निःस्वार्थी असं नेतृत्व शरद जोशींच्या रूपानं मिळालं. शरद जोशी हा शेतीव्यावसायिकाचा धन्वंतरी आहे. शेतीव्यवसायावर जीवन कंठणारा समाज आज त्याच्यामागं उभा आहे ह्याचं राजकारण्यांना फार मोठं दुःख होऊन राहिलंय !

हे राजकारणी आता जागोजागी वीष ओकू लागले आहेत. ही मंडळी शरद जोशीवर वाटेल तशी टीका करणार आहेत; पण त्यांच्या टीकेला भीक घालू नका ! ते फक्त टीकाच करणार, दुसरं करणार तरी काय हे लोक ? टीका करणारे हे राजकारणी शेतकऱ्याविषयीचा कळवळा व्यक्त करीत नसून स्वतःची पोटदुखी सांगत आहेत हे ध्यानात घ्या ! चौतीस वर्षं आपण त्याच्या भूलथापाना बळी पडलो, इथून पुढं आपण फसणार नाही हयाचंच त्याना दुःख वाटून राहिलय. शरद जोशीनं आपल्याला जागं केलंय इथून पुढं आम्ही सावध असणार !

'आपलं आदोलन सुरू झालं तेव्हापासून हे राजकारणी आपली कुचेष्टा करीत आहेत. आपल्याबद्दल आणि आपल्या नेतृत्वाबद्दल अनेकानी अनेक उद्गार काढले. भरकटलेलं नेतृत्व, भाबावलेलं नेतृत्व, पळपुटं नेतृत्व, काय तोंडाला येईल ते बडबडले ! काहीजणांनी आपल्याला सत्ताधाऱ्यांचे भाट असंही म्हटलं ! आपण त्याच्या बडबडीकडे लक्ष देत नाही त्याचा देखील हया राजकारण्यांना राग येतो !

'मागील आठवड्यात नगर जिल्ह्यातील एका सभेत मी म्हणालो की शरद पवारानी काढलेला लाँग मार्च ही 'दिंडी' नसून आंधळ्या सोयऱ्यांनी मुक्या-बहिऱ्याच्या घराकडे काढलेली वरात आहे. तेव्हा मात्र ही राजकारणी माणसं फार दुखावली. हे बोलायची मला देखील हौस नाही. ह्या डाव्या आघाडीचं नेतृत्व आपले माजी मुख्यमंत्री करताहेत ह्याची मला पूर्ण जाणीव आहे.

'एक गोष्ट मात्र मला कळत नाही, सत्तेवर असताना उजवी असणारी ही मंडळी सत्तेवरून घसरताच एकदम डावी कशी काय होतात ?

'आपले माजी पंतप्रधान मोरारजीभाई देखील आता डाव्या आघाडीतर्फे नेतृत्व करू पहातात ही महदाश्चर्याची गोष्ट नाही का ? सत्ता असली की 'उजवे' सत्ता गेली की 'डावे' अशा पुढाऱ्यांनी शेतकरी आंदोलनाच्या पक्षविरहित नेतृत्वावर टीका करावी ह्याहून दुसरा मोठा विनोद कुठला असू शकेल ?

'मोरारजीभाई पंतप्रधान असताना किंवा आता शेतकऱ्यांविषयी काय बोलले त्यावर चर्चा केली नाही तरी चालेल. मोरारजीभाईंना शेतकरी कळलाच नाही. आता दुसरे एक महाभाग स्वतःला अर्थशास्त्रज्ञ म्हणवणारे आपले सुब्रह्मण्यम स्वामी म्हणतात—उसापासून एक क्विंटल साखर होण्यासाठी फक्त दीडशे रुपये खर्च येतो, त्यापैकी कारखान्याचा खर्च एकशेवीस रुपये असतो. म्हणजेच शेतकऱ्याला एक टन उसाला तीस रुपये मिळाले तरी खूप झाले, असं हा स्वामी जेव्हा म्हणतो तेव्हा मला त्याला विचारावसं वाटतं की तुझ्या बापानं तरी कधी शेती पाहिली होती का ?

'आपले चालू मुख्यमंत्री—चालू म्हणजे सध्याचे, हे भवानी तलवार आणायला गेले ! ते आणि त्यांचे मंत्री विचारतात—हा शरद जोशी कोण ? आम्ही त्याच्याशी काय म्हणून बोलणी करायची ? ह्या सरकारला आम्ही सांगू इच्छितो की, शरद जोशी आम्हा शेतकऱ्यांचा नेता आहे आणि त्याच्याशीच तुम्हाला बोलणी करावी लागतील ! बोलणी करायची तयारी नसेल तर शासनाला आंदोलनाचा आणखी एक सणसणीत दणका द्यायची आमची तयारी आहे !

'आपल्या आंदोलनावर अकारण टीका करणारे अनेक आहेत चांगलं तापलेलं आंदोलन का थांबवलं ?— असा प्रश्न विचारणारे अनेक आहेत. एकदा थांबवलेलं आंदोलन पुन्हा सुरू करता येणार नाही अशी शंका देखील अनेकजण व्यक्त करतात. त्यांना मोटरगाड्याची एक गोष्ट मी सांगू इच्छितो. आतापर्यंत चौतीस वर्षं ज्यांनी ज्यांनी वेगवेगळी आंदोलनं केली, मोर्चे काढले, निवेदनं सादर केली खास त्यांच्यासाठी ही गोष्ट आहे !

'राजकीय हेतूनं आंदोलनं करण्याची गाडी धक्का मारल्याशिवाय कधीच स्टार्ट होत नव्हती. धक्का मारून सुरू झालेली ही गाडी एखाद्या वेळेस एखाद्या विशिष्ट ठिकाणी थांबविण्याची गरज पडली तर ब्रेक मारून देखील ती थांबत नसे! चुकून थांबलीच तर तिचं इंजिन बंद केलं जायचं नाही, ते नुसतच पेट्रोल खात घरघरत रहायचं. कारण गाडी बंद केली तर पुन्हा सुरू करण्यासाठी धक्का मारावा लागणार! आणि त्या वेळी धक्का मारायला माणसं मिळाली नाहीत तर ? म्हणून इंजिन एकदा धक्का मारून सुरू झालं की पेट्रोल संपेपर्यंत चालूच अशी ह्या राजकारणी मंडळींच्या आंदोलनाची रीत !

'शेतकरी संघटनेच्या आंदोलनाची मोटारगाडी मात्र अशी नाही. चावी फिरवली की स्टार्ट, ब्रेक मारला की उभी, चावी काढली की इंजिन बंद ! आणि पुन्हा स्टार्ट करायची असली तर नुसती चावी फिरवली की सुरू !!

'ज्यांची गाडी धक्का मारल्याशिवाय सुरू होत नाही, ब्रेक मारला तरी थांबत नाही, स्टिअरिंग डावीकडे वळवलं तर गाडी उजवीकडे वळते त्यांनी कृपा करून आम्हाला शेतकरी आंदोलन कसं चालवायचं ह्याबद्दल उपदेश करू नये— आपल्या गाडीचा स्टार्टर, ब्रेक स्टिअरिंग हे अगोदर ठीक करून घ्यावं !

'सरकारला आंदोलन बघायची इच्छा आहे का ? आत्ता इथं जी पन्नाससाठ हजार माणसं मेळाव्याला जमली आहेत त्यांना नुसता आदेश दिला तर सगळे उठून दोन मिनिटात आग्रारोड अडवून धरतील, दिल्लीचा रस्ता बंद पाडतील ! करा साठ हजार सत्याग्रहींना अटक !!— आमच्या गाडीला स्टार्ट होण्यासाठी धक्का द्यावा लागत नाही. तेव्हा कृपा करून राजकारण्यांनी किंवा पुण्यामुंबईच्या वृत्तपत्राच्या संपादकानी आम्हाला फालतू उपदेश करू नये !

'आणि शेवटी माझं भाषण संपविण्याअगोदर मी अत्यंत आनंदानं एक खुलासा करू इच्छितो, ह्या सभेच्या एकच तास अगोदर सरकारची मुंबईहून तार आली आहे, शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी ह्यांच्याशी बोलणी करायला मंत्रिमंडळ तयार आहे ! ...'

प्रल्हाद पाटील कराडाचे शब्द हवेत विरतात न विरतात तोच पिंपळगाव बसवंतच मैदान 'शरद जोशी झिंदाबाद'च्या घोषणानी थरारून उठलं. प्रल्हाद पाटलाना श्रोत्यांनी वेळोवेळी उत्स्फूर्त दाद दिलीच होती— त्याच्या ह्या अखेरच्या खुलाशानं सगळे शेतकरी एकमुखानं शेतकरी संघटनेचा जयजयकार करू लागले. त्या जयघोषातच शरद जोशी उठून माईकपाशी आले. श्रोत्याना त्यांनी नेहमीप्रमाणे हात जोडून अभिवादन केलं. क्षणार्धात सभेत गंभीर शांतता पसरली आणि तितक्याच गंभीर आणि शांत आवाजात शरद जोशी बोलू लागले—

'माझ्या शेतकरी बांधवांनो आणि मायबहिणीनो, शेतकरी आंदोलनाच्या दुसऱ्या पर्वाच्या शेवटी आणि तिसऱ्या पर्वाच्या सुरुवातीला शेतकऱ्यांचा हा जो प्रचंड मेळावा भरला आहे, त्या मेळाव्यानं सर्व टीकाकाराना उत्तर दिलं आहे, जे टीकाकार म्हणत होते की, आंदोलन एकदा बंद केलं की पुन्हा चालू करता येत नाही त्याना तुम्ही सर्वांनी आपोआपच उत्तर दिलं आहे. माझी अशी खात्री आहे की, आंदोलनाच्या तिसऱ्या पर्वाचा जो कार्यक्रम मी जाहीर करणार आहे तो, वेळ येताच, मागच्यापेक्षाही खूप मोठ्या प्रमाणात पार पाडला जाईल !

'दहा नोव्हेंबरला नासिक जिल्ह्यात शेतकरी संघटनेचं रस्ता

## सत्ता असली की 'उजवे', सत्ता गेली की 'डावे !'....

रोको, रेल रोको आंदोलन सुरू झालं तेव्हापासून आजपर्यंत अनेक गोष्टी घडल्या. अनेक शूराच्या कथा लिहिता येतील, नवा इतिहास लिहिता येईल अशा घटना घडल्या. त्या सर्वांचा उल्लेख, शेतकरी जेव्हा खरोखर विजयी होईल, ह्या लढ्याचा शेवट होईल तेव्हाच करणं योग्य ठरेल! आज आत्ता ह्या मेळाव्यात कुणाचाही गुणगौरव करण्याची किंवा कौतुक करण्याची वेळ नाही ! परवा मालेगाव तालुक्यामध्ये माळमाथ्यावरील खेड्यामधून फिरत असताना तेथील मंडळींची मला फेटा बांधावा अशी इच्छा होती. त्यांच्या भावनेचा मी आदर केला; पण त्यांना सांगितलं की अजून आंदोलन चालू आहे, फेटे बांधण्याची घाई करू नका ! आंदोलन सफल्यानंतर फेटे बांधण्याची वेळ येईल तेव्हा ज्या ज्या शेतकऱ्यांनी कौतुकास्पद कामगिरी केली त्या सर्वांना फेटे बांधायचं ठरलं तर एकट्या नासिक जिल्ह्यातच कमीत कमी पन्नास हजार फेटे बांधावे लागतील !

'जे पुढारी, जे राजकारणी नेहमी म्हणत की शेतकऱ्यांची संघटना होणं शक्य नाही, शेतकरी कधीच एकी करून उभा रहाणार नाही, शेतकऱ्यांची संघटना म्हणजे कुत्र्याच्या शेपटीसारखी वाकडीती कधीही सरळ होणार नाही, त्या सगळ्या तथाकथित पुढाऱ्यांना आणि राजकारण्यांना नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी दाखवून दिलं की, पक्षविरहित नेतृत्व मिळालं तर शेतकरी एक होऊन उभा राहू शकतो !

'शेतकरी मरगळलेला नाही, आळशी नाही, अडाणी नाही ! गेल्या तेहतीस वर्षांत अनेक मंडळी शेतकऱ्यांसमोर आली. वेगवेगळे विचार त्यांनी शेतकऱ्यांपुढे मांडले; पण शेतकऱ्यांची संघटना उभी राहू शकली नाही, त्या विचारांना कधी ओघ आला नाही, आंदोलन झालं नाही ज्या मंडळींनी असे प्रयत्न केले त्यांना वाटायचं की, आपले विचार बरोबर आहेत; पण शेतकरीच आळशी आणि अडाणी असल्यामुळं संघटित होत नाही. ह्या मंडळींनी स्वत:चे विचार मात्र कधीच तपासून बघितले नाहीत. शेतकऱ्याला अडाणी म्हणून ते मोकळे झाले !

'संत तुकाराम आणि ज्ञानोबारायाच्या शिकवणीनं ज्याचा पिंड पोसला गेला त्या शेतकऱ्याला ह्या मंडळींनी ओळलं नव्हतं ! त्याला अडाणी समजणं हीच त्यांची सर्वांत मोठी चूक होती ! स्वत:ला हुशार समजणाऱ्या ह्या पुढारी लोकांनी, विचारवंतांनी, नेत्यांनी शेतकऱ्यांना अनेक प्रकारची आकडेवारी ऐकवली, इतर अनेक गप्पा ऐकवल्या, प्रलोभनं दाखवली; पण शेतकरी काही त्यांच्यामागं गेला नाही.

'शेतकरी संघटनेनं फक्त एक साधा विचार सांगितला; शेतकरी संघटनेनं शेतकऱ्याला सांगितलं— आम्ही तुम्हाला काही देत नाही आणि तुमच्याकडून काही मागतदेखील नाही. आम्ही तुम्हाला फक्त तुमच्या शेतमालाला योग्य भाव काय मिळाला पाहिजे तेवढंच सांगतो. दुसरं काही मागत नाही. मी आणि माधवराव खंडेराव मोरेंनी प्रत्येक सभेत तुम्हाला एक गोष्ट मात्र नेहमी सांगितली आहे— आम्ही जर कधी तुमच्याकडे मतं मागायला आलो तर तुम्ही पायातील खेटरं काढून आम्हाला बडवा, इतका आम्ही राजकारणाचा संबंध सुरुवातीपासूनच तोडला आहे !

'सर्व सभामधून शेतकऱ्यांना आम्ही एकच आदेश दिला, एकच संदेश दिला— ह्यापुढे शेतकऱ्यांनी लाचार होऊन जगायचं नाही !'

'शेतकरी म्हणजे दोन पायांचं जनावर नाही. शेतकरी हा सर्वांत जास्त कष्ट करणारा आहे आणि इतके कष्ट करून अखेरीस त्याला जर लाचारीत जगावं लागत असेल तर आपल्या देशाच्या योजनेमध्येच कुठं तरी दोष असला पाहिजे अशी आमची खात्री आहे. इथून पुढं ह्या योजना वेगळ्या तऱ्हेनं आखण्याची गरज आहे. इथून पुढं शेतकऱ्याला लाचारीनं, भिकेच्या तुकड्यावर, धर्मादाय म्हणून जगायची वेळ येऊ नये अशी आमची इच्छा आहे !

'आम्ही शेतकऱ्याला एकच सांगतो, जो माल पिकविण्यासाठी तू जितका खर्च करतोस तितके पैसे जरी तुला मिळाले तरी तुला, तुझ्या पत्नीला किंवा मुलाबाळांना मोफत शाळा, मोफत दवाखाना, कर्जमाफी, निराधार अनुदान योजना असल्या कुठल्याही धर्मदायावर जगण्याची गरज नाही !

'जिल्हा परिषदेची ही मोफत शाळा गळक्या छताच्या पडक्या देवळात भरणारी आमच्या मुलासाठी कशाला हवी ? इथं जिल्हा परिषदेनं नेमलेला शिक्षक महिन्यातून एकदा येऊन हजेरीपट भरून जातो ! असलं धर्मादाय शिक्षण आमच्या मुलांना काय कामाचं ?

'काय करायचेत आम्हाला हे जिल्हा परिषदेचे मोफत दवाखाने? आणि प्राथमिक आरोग्यकेंद्रे? जिथं रोग कुठलाही असला तरी एकच औषध मिळतं आणि दरवाज्यावरचा साधा शिपाई रांगेत उभ्या असलेल्या आम्हा शेतकऱ्यांना हिडिसफिडिस करतो ! काय करायच्या आहेत असल्या मोफत सवलती आणि धर्मादाय औषधोपचार ज्यामुळं आमचं जिणं आणखीनच लाचार बनत जातं !

'काय करायचे आहेत आम्हाला हे शेतकरी सल्लागार ? त्यांच्याकडे जाऊन आम्हाला दरवेळेस भाऊसाहेब, रावसाहेब करावं लागतं आणि जर ते आमच्या खेड्यात चुकून आलेच तर, आमच्या मुलांना आम्ही दिवाळीच्या सणाला देखील जे खाऊ घालू शकत नाही असं त्यांना खाऊ घालावं लागतं !— इतकंच नव्हे तर काहींना प्यायला देखील द्यावं लागतं ! आणि त्यांच्या सल्ल्याचा आम्हाला उपयोग शून्य असतो !

'आम्हाला फक्त आमच्या शेतमालाला रास्त भाव द्या! शेतकऱ्याजवळ थोडा पैसा साठू द्या ! तो स्वत:च्या गावात चांगली शाळा काढून, चांगला शिक्षक नेमून अभिमानानं आपली मुलं तिथं शिकवायला पाठवेल ! शेतकऱ्याजवळ पैसा आला तर एम्. बी बी. एस्. झालेले डॉक्टर आपण होऊन गावोगाव दवाखाने काढतील आणि जेव्हा कधी आजारी शेतकरी त्यांच्याकडे येईल तेव्हा 'फी' मिळणार ही खात्री असल्यामुळं तत्परतेनं त्याची सेवा करतील ! शेतकऱ्याकडे पैसा असला तर बी. एस्. सी. आणि एम. एस्. सी. झालेले ॲग्रिकलचरल तज्ज्ञ शेतकऱ्यांच्या बांधबांधावर फिरून काही एका ठराविक 'फी'साठी त्याला योग्य तो सल्ला देण्यासाठी प्रयत्नशील रहातील !

'आज एखाद्या बँकेचं किंवा सोसायटीचं कर्ज मिळावं म्हणून शेतकऱ्याला लाचारीनं फिरावं लागतं. एकदा त्याच्या शेतमालाला भाव मिळू लागला, त्याच्या हाती पैसा आला की ह्याच बँकांचे अधिकारी शेतकऱ्यांच्या मागं धावतील, कर्ज घ्या म्हणून आग्रह करू लागतील !

'हा असा एकच संदेश आम्ही शेतकऱ्यांना दिला. शेतकऱ्यांचा विकास करणं म्हणजे त्याला सतत भाकरीचे तुकडे टाकून धर्मादाय करणं अशीच आजपर्यंत सर्वांची कल्पना होती आणि अजूनही आहे. आम्ही शेतकऱ्याना सांगतो की, विकासाच्या ह्या कल्पनेवर विश्वास ठेवू नका ! तुम्ही कष्ट करता त्याचा मोबदला संघटितपणे, हक्कानं मागून घ्या ! धर्मदायावर जगू नका !

'आम्ही शेतकऱ्याला सांगतो, शेतमालाला रास्त भाव मिळवून घ्या, त्यामुळं तुमचा कर्जबाजारीपणा थांबेल, शेतमजुरांचं कल्याण होईल आणि खऱ्या अर्थानं ग्रामीण भागात उद्योगधंद्याची वाढ होऊ लागेल फक्त संघटित होऊन शेतमालाचा भाव मागा ! हे सर्व आपोआप घडू लागेल ! पण हे सर्व तुमचं तुम्हाला, स्वतःच्या पायावर उभं राहून, स्वतःच्या संघटित ताकतीवरच मिळवायचं आहे. कुणीही नेता किंवा पुढारी तुम्हाला हे ' मिळवून देणार नाही !

'स्वत चं हित स्वत' जाणून शेतकऱ्यानी आता राजकारण विसरून संघटित होण्याची वेळ आली आहे.

'आम्ही हा विचार जेव्हा गावोगाव माडला तेव्हा त्या विचारामागची स्वच्छ प्रामाणिकता शेतकऱ्यांना पटली. विचाराच्या शुद्धतेची ओळख पटली आणि केवळ दहा महिन्यांच्या कालावधीत महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील शेतकरी जागा झाला !'

'शेकडो वर्षांत जमणार नाही असं जे म्हणत होते त्यानी केवळ दहा महिन्यात हा चमत्कार घडलेला पाहिला ! हा केवळ शेतकरी संघटनेनं मांडलेल्या विचाराच्या ताकतीचा प्रश्न नाही तर शेतकऱ्याच्या मनात तेवत असलेल्या स्वातंत्र्यज्योतीचा हा पुरावा आहे !'

'नाशिकमध्ये एकोणीस दिवस शेतकरी संघटनेचं आंदोलन उभं राहिलं आणि महाराष्ट्रातच नव्हे तर हिंदुस्थानमधील सर्व राज्यात एकच खळबळ माजली. शेतकरी आता जागा झाला आहे. जागं व्हायला त्यानं खूप अवधी घेतला; पण आता जाग आल्यावर त्याची ताकद प्रचंड वेगानं फोफावू लागली आहे. हा वेग असाच टिकला तर केवळ तीन वर्षात सपूर्ण हिंदुस्थानातील शेतकरी आपल्या घामाचा दाम मिळविल्याशिवाय रहाणार नाही !

'आपण शेतकरी आंदोलन स्थगित केलं तेव्हा सर्व राजकारणी मंडळीनी आणि काही वृत्तपत्रांनी माझ्यावर टीकेची झोड उठवली. मी ह्या टीकेकडे अजिबात लक्ष देत नाही. शेतकरी आदोलन कसं उभं करायचं हे ह्या टीकाकाराना खरंच माहीत आहे का ? शहरातील अनुभवावर ही मंडळी जर ग्रामीण भारतातील शेतकऱ्यांचं आदोलन उभं करण्याचा प्रयत्न करतील तर तो कधीच यशस्वी होणार नाही !

'बारा नोव्हेंबरला आम्ही आदोलकाना अठ्ठेचाळीस तासाची सुट्टी जाहीर केली त्याला अनेक कारणं होती. शेतकरी ज्याची आतुरतेनं वाट पहात होता तो पाऊस त्या सुमारास झाला. पेरणीसाठी शेतकऱ्याना आदोलनातून मोकळं करणं तेव्हा जरूर होतं ह्याची जाणीव किती राजकारणी पुढाऱ्यांना होती ते त्यांनीच आता प्रामाणिकपणे सागावं ! एक डिसेंबरपर्यंत गव्हाची पेरणी झाली. नाही तर नाशिक आणि इतर जिल्ह्यातील शेतकऱ्याची काय स्थिती होते ह्याची जाणीव किती राजकीय पुढाऱ्यांना आहे ? म्हणूनच ही मंडळी जेव्हा तापलेलं आदोलन आम्ही स्थगित केल म्हणून आमच्यावर वेडीवाकडी टीका करतात तेव्हा त्यांना काय उत्तर द्यावं हेच आम्हाला कळत नाही, हे आंदोलन राजकीय नाही आर्थिक आहे एवढंच मी त्याना नम्रपणे सागू इच्छितो.

'स्थगितीनंतर मी गावोगाव फिरून शेतकऱ्यांना विचारलं, पेरण्या झाल्या का ? विश्राती झाली का ? आदोलन पुन्हा सुरू करायला काही हरकत आहे का ? ह्या सर्व प्रश्नाना शेतकऱ्याकडून समाधानकारक उत्तरं मिळाली तेव्हाच आदोलनाचा पुढील कार्यक्रम आम्ही ठरवला !

'फक्त शहरात आदोलनं करण्याचा अनुभव असणाऱ्यांना हे बारकावे समजणं केवळ अशक्य आहे. हे शेतकरी आंदोलन आहे आणि त्या आंदोलनाची दिशा आणि तंत्र शेतकऱ्याच्या सोयीनुसार ठरवलं जाणार. राजकारणी पुढाऱ्याच्या सोयीनुसार नाही !

'शेतकऱ्यांच्या सोयीनुसार आम्ही पुन्हा जेव्हा आदोलन सुरू करण्याचा आदेश देऊ तेव्हा पहिल्यापेक्षा दुप्पट सख्येनं शेतकरी सत्याग्रहात उतरतील अशी आम्हाला खात्री आहे.

'शेतकरी संघटनेचं हे आदोलन आता केवळ नासिक किंवा अहमदनगर–धुळं जिल्ह्यापुरतं मर्यादित राहिलं नाही. आजच्या ह्या मेळाव्याला महाराष्ट्रातील बहुतेक सर्व जिल्ह्यांमधील शेतकरी-प्रतिनिधी हजर आहेत. इथून पुढं आदोलनाची व्याप्ती वाढणार आहे. नाशिक जिल्ह्यात सत्याग्रह करणाऱ्या शेतकऱ्यांना आता इतर जिल्ह्यातील तुरुगात पाठवणं सरकारला शक्य होणार नाही. कारण प्रत्येक जिल्ह्यातील तुरुंग त्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांनीच भरलेले असतील !

'शेतकरी संघटनेच्या ह्या आदोलनामुळं शेतकऱ्यांचा एक फार मोठा फायदा झाला. आतापर्यंत शेतकऱ्याची अशी कल्पना होती की, तुरुंगात फक्त खुनी, दरोडेखोर आणि चोरच जातात. शेतकऱ्याला तुरुंगाची भीती होती. तुरुंगात जाणं म्हणजे बेअब्रू असं मानणारा शेतकरी स्वातंत्र्यलढ्यात देखील मोठ्या प्रमाणात तेवढ्याच कारणासाठी सामील झाला नाही. शेतकरी म्हणायचा, मी गरीब आहे, अर्धपोटी आहे. पण माझी अब्रू महत्त्वाची; मी तुरुंगात जाणार नाही !

ह्या आंदोलनानी शेतकऱ्याची तुरुंगाची भीती संपूर्णपणे नाहीशी केली. जे शेतकरी-सत्याग्रही प्रथम तुरुंगात गेले त्याच्या मनात धाकधुक झाली. तुरुंगाच्या दरवाजापाशी गेल्यानंतर त्या दगडी भिंती, ते गजाचे दरवाजे हे पाहूनच विचारा हैराण व्हायचा. त्यानंतर आतमध्ये गेलं की पहिल्यादा जवळचे पैसे काढून घेतले जायचे, नाव नोदवलं जायचं. त्यानंतर घोगड्याची एक वळकटी, ॲल्युमिनियमची थाळी, वाडगा आणि लोटा ! शेतकऱ्याला वाटायचं, ह्या जोशीचं ऐकून आपण कुठं भलत्याच ठिकाणी येऊन अडकलो ! पहिल्या रात्री त्याला झोप यायची नाही.

**आंदोलनाने शेतकऱ्याची तुरुंगाची भीती संपूर्णपणे नाहीशी केली.**

'दुसऱ्या दिवशी सकाळी चहा आणि पाव किंवा भाताची काजी झाली की मग तुरुंगात आपल्याच गावची, तालुक्याची ओळखीची माणसं भेटायची सगळ्यांची सभा भरायची. कुणी भाषण द्यायचा. बाकी सगळे आरामात बसून असाचे.

'दुपारी जेवणाची वेळ झाली की सगळे ओळीनं जायचे. भाकऱ्या, दोन भाज्या, डाळ असं मस्त जेवण असायचं. त्यानंतर दुपारची झोप! मग संध्याकाळी खेळ आणि ढोल-बाजा घेऊन कीर्तन किंवा भजन आणि भारूड. त्यानंतर रात्रीचं जेवण आणि झोप असं सगळं आनंदात पार पडायचं!

'तुरुंगात जाताना घाबरणारे अनेक सत्याग्रही बाहेर पडताना म्हणायचे— तुरुंग सोडून जाताना वाईट वाटलं! एकजण म्हणाला, घरी मिळत नाही इतकं मस्त जेवण तुरुंगात मिळालं! अठ्ठ्याहत्तर वर्षांचा एक म्हातारा म्हणाला, सात दिवस तुरुंगात होतो. खूप आराम केला, आयुष्यात असा आराम आणि फुकटच खायाला कधीच मिळालं नाही!

'तुरुंगात जाऊन आलेल्या ज्या ज्या शेतकऱ्याबरोबर मी बोललो ते म्हणाले, पुन्हा तुरुंगात जाण्यासाठी आम्ही एका पायावर तयार आहोत! काही वृद्ध शेतकरी म्हणाले की आम्ही तर आनंदानं तुरुंगात जाऊ. आम्हाला तुरुंगातून बाहेर काढायला तुम्हाला वेगळं आंदोलन उभारावं लागेल!

'शेतकऱ्याला आराम, सुट्टी आणि दोन वेळचं फुकटचं खायला फक्त तुरुंगातच मिळणार असेल तर बाहेर राहून, उन्हातान्हात राबून, मरमरेस्तोवर कष्ट उपसून अर्धपोटी रहाण्यात काय अर्थ आहे? बाहेर कष्ट उपसून उपाशी मरण्यापेक्षा तुरुंगात जाऊन आरामपणे दोन वेळची भाकरी मिळाली तर काय वाईट आहे?

'ह्याचा अर्थ इतकाच की स्वतंत्र भारताचा नागरिक म्हणून शेतकऱ्याची परिस्थिती इतकी हलाखीची झाली आहे की त्याला तुरुंगातील भाकरी देखील गोड लागते. आपल्या देशाच्या विकास-योजना आखणाऱ्यांनी आणि अर्थशास्त्रज्ञांनी ह्या गोष्टीचा जरूर विचार करावा!

'तुरुंगाबाहेर स्वतंत्रपणे जगण्यापेक्षा तुरुंगातील जीवन जर जास्त सुसह्य असेल तर पुढील आंदोलनाच्या वेळी सर्व शेतकऱ्यांना आपआपल्या कुटुंबासह, लेकराबाळांना घेऊन, घराला कुलुप घालून तुरुंगाची वाट धरणं जास्त सोयीस्कर ठरेल!'

'शेतकरी संघटनेच्या एकोणीस दिवसाच्या शेतकरी आंदोलनात नासिक जिल्ह्यातील वीस हजार शेतकरी, अहमदनगरचे पाच हजार आणि धुळे जिल्ह्यातील फक्त दीड तालुक्यामधून पाच हजार असे एकूण तीस हजार शेतकरी तुरुंगात जाऊन आराम करून आले! त्या सर्वांची तुरुंगाची भीती नाहीशी झाली आहे. तुरुंगात गेलेले हे सत्याग्रही आपआपल्या गावी जेव्हा परत गेले तेव्हा त्यांचे अनुभव ऐकून इतर लाखो शेतकऱ्यांची ती भीतीदेखील गेली आहे.'

'त्यामुळे शेतकरी संघटनेच्या आंदोलनाचं तिसरं पर्व जेव्हा सुरू होईल तेव्हा संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी त्यात सहभागी होतील त्याबद्दल आता वादच नाही. कमीत कमी दहा लाख शेतकरी सविनय सत्याग्रह करून स्वतःला अटक करून घेण्यास तयार होतील हे आता निश्चित आहे!

'नासिक जिल्ह्यात ह्या आंदोलनाचे वेळी दीड लाख शेतकरी रस्त्यावर सत्याग्रहासाठी उतरले. सगळे शेतकरी अटक करून घेण्यास तयार होते; पण पोलिसांची साधनं अपुरी पडली. शासनाकडे तुरुंगात जागा नव्हती म्हणून सत्याग्रहीवर लाठीहल्ला करून त्यांना पांगवण्यात आलं. जवळजवळ नऊ हजार शेतकऱ्यांनी लाठीचा मार खाल्ला!

'लाठीहल्ल्याचा प्रश्न निघाला म्हणून मी एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करतो. इथून पुढं आपण एक काळजी घ्यायची. रस्ता रोको आंदोलनाचे वेळी आपण काही ठिकाणी झाडे तोडून, टेलिफोनचे खांब उखडून रस्ता अडविण्याचा प्रयत्न केला. पोलिसांचा गणवेश घातलेले हे दरोडेखोर रात्रीच्या वेळी अचानक येऊन आपल्यावर हल्ला करतील ह्या भीतीपोटी सहाजिकच आपण अडथळे उभारून रस्ता अडविण्याचा प्रयत्न केला. यापुढे सत्याग्रहाचा जो काही कार्यक्रम आपण हाती घेऊ त्या वेळी सार्वजनिक मालमत्तेला तुम्ही चुकून सुद्धा हात लावू नका, शांततेचा भंग होईल असं कोणतही कृत्य करू नका असे मी तुम्हाला माझी शपथ घालून सांगतो!'

'त्याचबरोबर पोलिसांनी जर दडपशाही करायचा प्रयत्न केला, निष्कारण लाठीहल्ला केला तरी सुद्धा शांत रहाण्याचा प्रयत्न करा! पोलीस हे कर्मचारी आहेत, हुकुमाचे ताबेदार आहेत, सरकारचे नोकर आहेत. सर्व राजकारणी पक्ष सत्तेवर असलेले आणि नसलेले, हे चोरांचे आहेत आणि पोलीस हे अशा चोरांचे नोकर आहेत. सहाजिकच ते देखील चोरासारखे वागतील, लाठ्या चालवतील, घरातील वस्तू चोरून पळवून नेतील. एक गोष्ट लक्षात ठेवा, पोलीस हे चोरांचे नोकर असले तरी शेतकरी हा देशाचा मालक आहे!'

'ह्या देशाच्या भवितव्याची जबाबदारी शेतकऱ्यावर आहे, पोलिसांवर नाही! आपण जो एक संपन्न आणि सुखी समाज तयार करण्याचा प्रयत्न करत आहोत त्याचा पाया आपण हिंसाचार करून रचू शकत नाही. तो पाया फक्त शांततेच्या मार्गानं, कष्ट सहन करून, देहदंड सोसूनच घालता येईल!

'आपल्या आंदोलनाच्या वेळी वापरण्यात आलेलं दडपशाहीतंत्र लक्षात घेता मी एक महत्त्वाची घोषणा करू इच्छितो. शेतकरी शांततेनं सत्याग्रह करील; पण दहा लाख सत्याग्रहींना अटक करता येत नाही म्हणून पोलीस जर हल्ला करू लागले, चोऱ्या करू लागले, मालमत्तेची नासधूस करू लागले, तर आपल्याच देशातील कायद्याप्रमाणे, भारतीय दंडविधानाप्रमाणे प्रत्येक नागरिकाला स्वतःचं आणि स्वतःच्या मालमत्तेचं, स्वतःच्या शेजाऱ्याचं आणि त्याच्या मालमत्तेचं संरक्षण करण्याचा अधिकार दिलेला आहे. हा अधिकार सत्याग्रहीपासून कोणीही काढून घेऊ शकत नाही.

'पोलिसांना मी जाहीर विनंती करतो, तुम्ही तुमचं कर्तव्य बजावा. आम्ही जाहीरपणे सविनय सत्याग्रह करून कायदेभंग करणार आहोत. आम्हाला अटक करून कोर्टापुढं उभं करून शिक्षा देवविण्याची सत्ता तुमच्यापाशी आहे ती वापरा; पण त्यापलीकडे जर का पुन्हा छातीवर हाताच्या घड्या घालून शांतपणे बसलेल्या सत्याग्रहीवर तुम्ही लाठीहल्ला कराल, गोळीबार कराल— तर शेतकरी स्वतःचं संरक्षण करण्यासाठी त्याला जे आवश्यक वाटेल ते करेल!

शरद जोशींनी ही घोषणा केली आणि पन्नास हजार शेतकऱ्यांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट करून स्वसंरक्षणाच्या ह्या आदेशाचं स्वागत केलं शरद जोशींच्या नावाच्या जयघोषानं पिंपळगाव बसवंतचा परिसर दुमदुमून गेला! शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी लाठ्या-बंदुका घेऊन पहाऱ्यावर असणाऱ्या पोलिसांच्या काळजाचं ह्या जयघोष ऐकून पाणी पाणी झालं असणार! शरद जोशी पुढं सांगत होते–

'ह्या सभेच्या आधी जो निरोप मिळाला त्यावरून सरकारची आता आपल्याशी बोलण्याची तयारी आहे असं कळतं. शासनाकडून आलेली तार वाटते तितकी आशादायक नाही– तरी आम्ही वाटाघाटीला जाण्यास तयार आहोत!

'शरणागत आलेल्या शत्रूला त्याची लाज वाचविण्याइतकी तरी सवलत द्यावी असा युद्धशास्त्राचा नियम आहे. त्यामुळं शासनाची मिजास दाखविणाऱ्या ह्या तारेतील शब्दांकडे फार लक्ष न देता आम्ही वाटाघाटी करायला तयार आहोत; परंतु आम्ही सत्याग्रहाची तलवार म्यान केलेली नाही, हे शासनानं ध्यानात ठेवावं!

'शिवाजीमहाराज अफझुलखानाला भेटावयास ज्या तयारीनं गेले त्याच तयारीनं आम्ही शासनाशी बोलणी करायला जाणार आहोत. *खानाकडून जर कट्यार वापरली गेली नाही तर शेतकरी संघटना* देखील वाघनखं वापरणार नाही! आंदोलनाची संपूर्ण तयारी ठेवूनच आम्ही बोलणी करायला जाणार!

'आपल्या शेतकरी आंदोलनाचं एक महत्त्वाचं तंत्र असं आहे की, ज्यामुळं एरवी सतत कष्टच उपसणाऱ्या शेतकऱ्याला आंदोलनाचे कमीत कमी कष्ट पडले पाहिजेत! शेतकरी तळहातावर शीर घेऊन तयार आहे; पण त्याची बलिदानाची ही ताकद व्यर्थ उधळली जाणार नाही ह्याची काळजी घेतली पाहिजे. आयुष्यभर श्रम करणाऱ्या शेतकऱ्याला आंदोलनाच्या काळात कमीत कमी कष्ट सोसायला लागावे; पण सरकावर त्याचा जास्तीत जास्त परिणाम व्हावा अशी योजना आखण्यात येणार आहे. पुढील आंदोलनाची तारीख योग्य वेळ येताच जाहीर करण्यात येईल! त्या आंदोलनाचा कार्यक्रम थोडक्यात असा आहे–

'मध्यवर्ती सरकारच्या आणि केंद्र सरकारच्या सर्व कचेऱ्या व केंद्रे याची कामे सत्याग्रहींनी त्या केंद्रांमध्ये प्रवेश करून, रात्रंदिवस ठाण मांडून बंद पाडावीत. टपाल व तारकचेऱ्या, टेलिफोन केंद्रे, राष्ट्रीकृत बँका, तहसीलकचेरी, कलेक्टरकचेरी, सार्वजनिक बांधकामखात्याच्या कचेऱ्या, जंगलखात्याच्या कचेऱ्या, पंचायत समिती आणि जिल्हापरिषदेच्या कचेऱ्या ह्या सर्व केंद्रामधून वरीलप्रमाणे सत्याग्रह करावा. जाहीर केलेल्या तारखेला सत्याग्रहींनी ह्या कचेऱ्यामध्ये प्रवेश करायचा आणि तिथं बसून रहायचं. आता हिवाळा चालू आहे तेव्हा रस्त्यावर बसून आपण सत्याग्रह करायचा नाही, आपल्या गावापासून लांब देखील जायचं नाही. गावातील किंवा गावाजवळच्या कचेरीत ठाण मांडून बसायचं आणि घरून आलेल्या ताज्या भाकरी आरामात बसून खायच्या! एका नासिक जिल्ह्यातच साडेतीनशे ठिकाणी असा सत्याग्रह होईल!'

'ह्या सत्याग्रहातून केंद्रसरकारचे उद्योगधंदे, आकाशवाणीकेन्द्रे, न्यायालये, पोलीसकचेऱ्या, शेती व पाणीपुरवठाखाते, विद्युतमंडळाची केन्द्रे आणि आरोग्यसेवा ह्यांना वगळण्यात आले आहे.

'शासकीय केन्द्रात आणि कचेऱ्यात सत्याग्रहासाठी बसलेल्या आंदोलकांना अटक करण्यात आल्यावर त्यांनी शांतपणे पोलिसांच्या सूचनेप्रमाणे गाडीत अथवा बसमध्ये जाऊन बसावे त्याची जागा सत्याग्रहींच्या दुसऱ्या गटाने घ्यावी आणि अटकसत्र सुरू ठेवावे.

'शासकीय कचेऱ्यात सत्याग्रहासाठी बसले असता तेथील कोणत्याही वस्तूस किंवा कागदपत्रास स्पर्शसुद्धा करू नये! शासनाने सत्याग्रहींशी संयमाने वागावे. पोलिसांनी कोणत्याही प्रकारची दडेली केल्यास त्याच्या परिणामांची जबाबदारी शासनावर राहील!

'शेतकरी संघटनेतर्फे महाराष्ट्रात राज्य साखरसंघाला विनंती *करण्यात येत आहे* की, या आंदोलनास पाठिंबा म्हणून सर्व साखरकारखान्यांनी ठराव करून चालू लेव्ही दरात सरकारला साखर पुरविण्याचे बंद करावे.

'शासनाच्या शेतकरीद्वेष्ट्या धोरणाच्या निषेधार्थ सर्व तालुकापंचायत समित्या, जिल्हा परिषदा, विधानसभा, विधानपरिषद, लोकसभा व राज्यसभा यांवरील लोकप्रतिनिधींनी आपआपले राजीनामे सादर करावेत. जे लोकप्रतिनिधी स्वेच्छेनं राजीनामा देणार नाहीत त्यांच्या घराभोवती सत्याग्रहींनी घेराओ घालून घंटानाद करावा!

'जाहीर केलेल्या *तारखेपासून आंदोलन संपेपर्यंत महाराष्ट्रभर* माध्यमिक शाळा, महाविद्यालये, वैद्यकी, अभियांत्रिकी, शेती आणि विधिमहाविद्यालये, तेथील विद्यार्थी बेमुदत हरताळ पाडून ती बंद ठेवतील. हा आदेश महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थी संघटनांच्या आग्रहावरूनच देण्यात आला आहे'

पुढील आंदोलनाचा तडाखेबाज कार्यक्रम ऐकून श्रोत्यांनी मनपसंत दाद दिली आणि शरद जोशींनी सर्वांचे आभार मानून भाषण संपवलं.

¤

१४ डिसेंबर १९८०. रात्रीचे अकरा. आमची गाडी पुण्याच्या दिशेनं सुसाट पळत होती. नेहमी बरोबर असणारी पोलिसवायरलेस जीप ह्या वेळी मागे नव्हती. काही काळ पोलिसांनी शरद जोशींचा नाद सोडला असावा.

पिंपळगाव बसवंतच्या मेळाव्यानंतर मी अनेक शेतकऱ्यांशी बोललो. अनेकांच्या मुलाखती घेतल्या. सर्वांना आंदोलनाचा नवा कार्यक्रम शंभर टक्के पसंत पडला होता. तारीख जाहीर होण्याचीच सर्वजण आतुरतेनं वाट पहात होते.

शेतकरी संघटनेच्या आंदोलनाच्या तिसऱ्या पर्वाची सुरुवात झाली होती. प्रत्यक्ष लढा कधी सुरू होणार? आंदोलनाची तारीख कोणती असणार?–शरद जोशींना काही प्रश्न विचारावे म्हणून मी तोंड उघडणार होतो, पण गप्प राहिलो. शरद जोशी एकाग्रचित्तानं अतिशय तन्मयतेनं गात होते–

**की घेतले व्रत न हे अम्हि अंधतेने**
**लब्धप्रकाश इतिहास निसर्ग माने**
**जे दिव्य दाहक म्हणोनि असावयाचे**
**बुध्याचि वाण धरिले करि हे सतीचे.**

□

# समाप्त

पुस्तके

# ' माणसं ! ' पारदर्शक समाजचित्रे

' माणसं !' अनिल अवचटानी रेखाटलेल्या समाजचित्राचा हा संग्रह आहे. पुस्तकाचं शीर्षक लक्षणीय आहे. ' माणसं ' या शब्दापुढं उद्गारचिन्ह आहे. सर्वत्र हाकललं जाण हेच ज्यांच्या जीवनाचं सूत्र आहे, बेवारशी जिणं हेच ज्याचं जीवनमूल्य आहे, अशी मेलेली मनं घेऊन जनवरांसारखी जगणारी माणसं वाचून, ' ही माणसं ! ' असा सहजोद्गार बाहेर पडतो.

समाजानं ज्याना भटकंती बहाल केली आहे, त्या सर्व उपऱ्यांना अवचटांनी हे पुस्तक अर्पण केलं आहे. माणूस असूनही माणूसपण हरवलेल्या माणसाचं जग एका भटक्यानं जिवत डोळ्यांनी शोधून घेतल आहे. काच, लोखंड, धातूचा एखादा तुकडा असं भंगार मिळवण्याकरिता मातीचे ढीग उपसणाऱ्या माणसाप्रमाणे अनिल अवचटानी अनेक झोपडपट्ट्या, वस्त्या, रस्ते उपसून या माणसाचे तुकडे–कपटे गोळा केले आहेत.

भंगलेल्या माणसाचा शोध घेताना अवचटानीही त्यांच्याबरोबर भटकंती स्वीकारली आहे. त्याच्या सुख–दुःखाशी समरस होऊन, होरपळलेल्या मनावर सहानुभूतीची फुकर घालून त्याना बोलकं आहे. ही माणस कळवळून आपल्या कहाण्या सांगतात त्यामुळं या समाजचित्रांना संवादाचं स्वरूप लाभलं आहे कलात्मक सुजाणतेनं लेखकानं हे वेगळं जग टिपलं आहे. वाचकांना शब्द, डोळे आणि मन बहाल करून अवचट दूर होतात. त्यांची अलिप्तता या संवादाचं स्वरूप अधिक भेदक करते. ही माणसं सरळ वाचकांशीच बोलतात. भावनात्मक नातं जोडतात. माणसाचं मन असलेल्या कोणत्याही थरातील वाचकाला अस्वस्थ करण्याचं सामर्थ्य या पुस्तकाला लाभलं आहे.

पोट जाळण्याकरिता माणसाला करावी लागणारी वणवण आणि कसंही करून जिवंत ऱ्हाण्याऱ्या उद्देशानं त्याची होणारी फरफट हे या लेखातील अनुभवाचं सूत्र आहे. माणसाच्या वाट्याला येणारी ही भयानक दुर्दशा सामाजिक अन्याय, आर्थिक पिळवणूक, दारिद्र्य, निसर्गकोप, अस्थिर जीवन यातून निर्माण झालेली आहे.

या संग्रहात समाविष्ट केलेल्या पाच समाजचित्रांपैकी ' माणसं ! ' ' कोण माणसं . कोण जनावरं ', ' वस्त्या माणसान्या ' ' अंधेरनगरी निपाणी ' या लेखातून व्यक्त झालेल्या विविध अनुभवांत एक सलगता आहे. आर्थिक पिळवणुकीच्या चरकात सापडलेल्या समाजातील अंतर्बाह्य उद्ध्वस्त झालेल्या माणसाची ही मुक्त रेखाटनं आहेत. दुष्काळात सर्वस्व गमावलेले शेतमजूर, बैलासारखं राबणारे हमाल, गलिच्छ जीवन जगणारी झोपडपट्टीतील माणसं, सगळीकडून ओरबडले जाणारे विडी–कामगार यांच्या जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न इथे डॉ. अवचटांनी केला आहे.

' माणसं ! ' या पहिल्या लेखात ७३ च्या भीषण दुष्काळात देशोधडीला लागलेल्या, हातावर पोटभरणाऱ्या शेतमजुराची ससेहोलपाट चित्रित केली आहे. सुचेल त्या मार्गांनी टिकाव धरण्याचा प्रयत्न करूनही खेड्यापाड्यात जगणं अशक्य झालं, तेव्हा ही माणसं परागंदा झाली. जिवंत राहण्याकरिता पुण्यात आली. शहरी संस्कृतीतही शेळ्या–मेंढ्यांसारखी हाकलली गेली !

निसर्गाप्रमाणंच माणसांकडूनही हाकललं जाणं ज्याच्या वाट्याला आलं आहे, अशा पुण्यातील बाजारपेठांत, गुदामांत कष्ट उपसणाऱ्या हमालांच्या करुण कहाण्या ' कोण माणसं...कोण जनावरं ' या लेखात अवचटानी रंगविल्या आहेत ग्यानबा, पैलवान, कोडिबा, भानुदास बहिरट, हमालांचं निर्मितिशून्य, जनावराचं जिणं पाहून अवचट म्हणतात, ' त्याचा निरोप घेताना कधी न पाणावणारे डोळे पाणावयाला लागले, स्वतःविषयी घृणाच वाटायला लागली. '

हाकलेल जाणाऱ्या, कष्टमय जीवन जगणाऱ्या माणसांप्रमाणेच, सर्वत्र ओरबडली जाणारी शोषित माणसं ' अंधेरनगरी निपाणी ' या लेखात बोलकी केली आहेत. निपाणीतील तंबाखूच्या गुदामात काम करणाऱ्या स्त्रियांवरील अन्याय, अत्याचार यांच्या कहाण्या अंगावर शहारे आणतात. अंधारातील वास्तव सत्य अवचटांनी या लेखात प्रकाशात आणलं आहे

अनिल अवचटांचं पाहणं आरपार आहे. त्यानी पाहिलेलं, अनुभवलेलं जग जेव्हा ते शब्दांत मांडतात, तेव्हा शब्द पारदर्शक बनतात. एक संपूर्ण समाज, त्याचं जगणं अवचट अशा सूक्ष्म तपशिलानं उभं करतात की, अंतःचक्षूनी ' क्ष ' किरणांत घेतलेली, कीड लागलेल्या समाजाची पारदर्शक छायाचित्रं वाटतात. आपल्या अवती–भवती असंही एक जग आहे, या वास्तव जाणिवेनं वाचक गुदमरून जातो. सुन्न, बधिर करणारी अनुभूति देण्याचं सामर्थ्य अवचटांच्या लेखनात आहे.

' वस्त्या माणसांच्या ' या लेखात याचा प्रत्यय येतो. पुण्या–मुंबईत वाढणाऱ्या झोपडपट्टी-संस्कृतीचा शोध या लेखात घेतला आहे. ' झोपडपट्टी हा माणसाची जनावरं बनवण्याचा प्रचंड कारखाना आहे. इथे दाखल होणारा किंवा जन्मणारा माणूस हळूहळू या पशुसंस्कृतीचा भाग होऊन जातो. इथे माणसे सांगकाम्ये बैल तरी असतात किंवा हिंस्त्रपशू तरी असतात किंवा घाणीत राहण्यात आनंद वाटणारी डुकरे तरी असतात ' अशी ' पोटंतिडिक ' संवेदनशील कलावंताच्या मनातच निर्माण होऊ शकते.

या संग्रहातील ' अनिकेत ' हा लेख विषयाच्या दृष्टीनं वेगळा आहे. उपेक्षित भटक्याचं जीवनदर्शन अवचटानी सहृदयतेनं घडविलं आहे. दलितांपेक्षाही दलित जीवन जगणाऱ्या कैकाडी, वडारी, डोबारी, फासेपारधी इ० लोकाचे जीवनव्यवहार, देवदेवता, अंधश्रद्धा, चालीरीती यातून जाणवतं ते त्यांचं मागासलेपण नागरी संस्कृती, शिक्षण, राजकीय सवलती यांपासून दूर असलेला माणूसही आता जागा होत आहे.

' उपेक्षितांचं जग ' अवचटानी आंतरिक कळवळ्यानं रेखाटलं आहे. ही फक्त अनुभवाची निवेदनं रेखाटनं नाहीत. समाज-

परिवर्तनाचा आशावाद बाळगून केलेलं हे भावात्मक चिंतन, संशोधन आहे. त्याची भाषा दाहक आहे. भंगार शोधणारांनी उकरलेली माती पाहून अवचट उद्गारतात, ' मला मागं पाहिलेल्या, ऐतिहासिक वस्तूंच्या शोधासाठी केलेल्या उत्खननाची आठवण झाली. तोही शोधच आणि हाही शोधच !' सगळयाच लेखातून येणारी अवचटाची अशी स्वगतं, 'माणसं !' अनिकेत या लेखाचे वैशिष्टयपूर्ण शेवट आणि सुभाष अवचटांची जिवंत रेखाचित्रं भीषण वास्तवातील आशय अधिक संपन्न करतात

–वि. रा. जोशी

'माणसं ! ' (समाजचित्रे)
अनिल अवचट
मौज प्रकाशन, मुंबई
पृष्ठे : १८०, मूल्य : साडेसत्तावीस रुपये

# उकार आणि वेलांटी

श्री. महेश कुलकर्णी या तरुण नवोदित लेखकाचा 'उकार आणि वेलांटी' हा कथासंग्रह नुकताच प्रसिद्ध झाला आहे. हा कथासंग्रह म्हणजे लघुकथा क्षेत्रातील त्याचे पहिले यशस्वी पाऊल म्हणता येईल ! उच्चभ्रू किंवा अगदी खालच्या स्तरातील समस्यांचा विचार न करता, या समाजव्यवस्थेत स्वाभाविकतः मध्यम वर्गाच्या ज्या काही इच्छा–आकांक्षा, दुःखे आणि कैफियती उद्भवतात त्या त्यांनी खूपच जाणीवपूर्वक वास्तवतेच्या पातळीवरून हाताळल्या आहेत.

या कथासंग्रहामध्ये इतर कथासंग्रहापेक्षा आगळे वैशिष्टय जाणवते ते म्हणजे यातील प्रत्येक कथेमधील मध्यवर्ती व्यक्तिरेखा ही समंजस, सखोल बुद्धीची व्यक्ती दाखवण्यात आलेली आहे आणि त्याचबरोबर कथेतील प्रत्येक व्यक्तिरेखा ही स्वतःच्या आयुष्याचा जाणतेपणाने हिशेब करीत असते. जरी या सर्व व्यक्तिरेखा आपल्या मध्यमवर्गीय जीवनात-संसारात रमलेली दिसत असली, तरी ती व्यक्तिरेखा आपल्या आयुष्याकडे डोळसपणे पहात असल्याचे कथेतून जाणवते. महेश कुलकर्णीसारख्या तरुण लेखकाने तारुण्यातल्या स्वाभाविक असलेल्या गुलाबी कथा लिहिण्याऐवजी प्रौढावस्थेतील मध्यमवर्गीयाचा विचार करणे यातच या कथासंग्रहाच्या नाविन्याची झलक दिसते.

सध्याच्या काळातील लघुकथांचा साधारण रोख, कथा अर्धवट सोडणे व त्यायोगे वाचकाच्या निर्णयशक्तीवर विश्वास ठेवून त्याला त्याबाबत विचार करायला भाग पाडणे, असा काहीसा असतो. कथेच्या संपूर्ण रोखाची लेखकाने स्वतः उलगड करून दाखवणे ही गोष्ट या नव्या पद्धतीच्या लघुकथामध्ये क्वचितच सापडते. महेश कुलकर्णीच्या या कथासंग्रहातील लघुकथा देखील याला अपवाद नाहीत. त्यामुळे या कथामध्ये वाचकाला अस्वस्थ करण्याची ताकद खचीतच आहे.

या कथासंग्रहात साधारणतः गडकरीशैलीची रचना जाणवते. त्यामुळे त्याचे लिखाण काहीसे व्याकरणप्रचुर वाटले तरी त्यातल्या उपमा काही प्रमाणात वेगळया जाणिवांच्या शोधात असल्याचे जाणवते. उदाहरणार्थ, आप्पाना वाटायचे मी एक सामान्य माणूस ! कधीकधी जमिनीवर सरपटणारा सापदेखील उंच उडताना दिसतो, पण त्या सापाने हे विसरुन कसं चालेल की, आपण आकाशात उडत असलो तरी आपली मानगूट मात्र घारीच्या चोचीत आहे. मी हे सरपटणं अनुभवलं आहे, तेव्हा मी हे ऐश्वर्यात उडणे शिकणार कोठून ? या उपमेमध्ये त्यानी मध्यमवर्गीयाच्या विदारक वास्तवतेचे जे चित्रण घडविले आहे, ते अस्वस्थ करणारे आहे.

लेखकाने मध्यमवर्गीयाच्या वास्तवतेचे चित्रण करताना, पुष्कळच तोल राखण्याचा प्रयत्न केलेला आहे; पण त्यांच्या या प्रयत्नावरती खूपच मर्यादा पडल्याचे स्पष्ट दिसते. उदा. 'उद्या उशीर नको म्हणून ताकीद मिळावी आणि धुळीने माखलेली पावलं नळाच्या बारीक धारेखाली ओली झाली.' या वाक्यातून मध्यमवर्गाची अगतिकता प्रकर्षाने वाचकाच्या पुढे येते.

परंतु 'वाट ! वाट ! वाट ! या कथेत श्री. कुलकर्णी यानी केलेली मांडणी खूपशी ओढूनताणून केल्यासारखी वाटते. किंबहुना या कथेत अनावश्यक अशा शब्दांच्या कोलाटया व रचना यांची रेलचेल आढळते. उदा. 'बाहेर काळया छत्र्या उघडून काळी डोकी चालली होती.' ही व अशासारखी वाक्ये यांमुळे कथेच्या पूर्ण रचनेलाच वेगळा जोड दिल्याचे वाटून रचनेतील सुसंगती व आकृतिबंधाना धक्का पोचला आहे ही एक प्रकर्षाने खटकणारी गोष्ट आहे.

या सर्व कथामध्ये महेश कुलकर्णी यानी आपल्या कथा 'फ्लॅशबॅक' पद्धतीने मांडल्या आहेत. या फॉर्मच्या स्वतःच्या काही मर्यादा आहेत आणि त्यातून जवळजवळ प्रत्येक कथेमध्ये हाच फॉर्म वापरला गेल्यामुळे त्या फॉर्मचे असणारे वैशिष्टय लोप पावले आहे. कारण, हा एकच फॉर्म त्याच्या कथेतील अनुभवाशी आणि आशयाशी सुसवादी नाते जोडू शकत नाही. तरीही त्यानी तोच फॉर्म कायम वापरला यामुळे प्रत्येक कथेमध्ये थोडयाफार प्रमाणात तोचतोचपणा जाणवतो.

शेवटी महेश कुलकर्णीच्या स्वतःच्या लिखाणाच्या मर्यादाची जाणीव ठेवूनही मध्यमवर्गीयांच्या विविध बाबीना व अंगांना जो सहज रीतीने स्पर्श केला आहे व त्या अनुषगाने जी मांडणी उभी केली आहे ती त्यांच्या लिखाणातील एक नवी दिशा नक्कीच दर्शवते.

–सुजाता देशमुख

उकार आणि वेलांटी
श्री सारस्वत मुद्रण आणि प्रकाशन
पृष्ठे : ५८, मूल्य : सहा रुपये.


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

देवाघरचा पाऊस

लेखक : रवींद्र पिंगे
आवृत्ती : दुसरी
किंमत : दहा रुपये
राजहंस प्रकाशन ,पुणे

फिनिक्स निवड

# The Life of Ian Flaming

By John Pearson
( Jonathan Cape. Pages 352 )

हे पुस्तक तसे जुने आहे; पण आमच्या ग्रंथालयात ते परवाच दाखल झाले.

एक अप्रतिम व वाचनीय पुस्तक आहे हे. काही काही लेखक असे होऊन जातात की, त्याची पात्रेच त्यांना गिळंकृत करून जातात. लेखकाच्या नावापेक्षा ती पात्रेच इतकी प्रख्यात होऊन जातात की, वाचकाच्या लक्षात पात्राचीच नावे राहतात. लेखकाची नावे मात्र तो विसरतो. 'मला पेरी मॅसनची पुस्तकं द्या, मला शेरलॉक होम्सची हवीत, आपल्याकडे जेम्स बॉन्डची पुस्तके आहेत का ?' असे म्हणणारे अनेक वाचक भेटतात. मग आम्ही त्याना पुस्तकाचा नंबर व सेक्शन कॅटलॉगमध्ये बघायला सागतो. मी कैक वेळा असे निरीक्षण केले की, जेम्स बॉन्डची पुस्तके मागणारा वाचक सूचीमध्ये J किंवा B मध्ये बघत बसतो ! मूळ लेखकाचे नाव त्याला आठवतच नसते ! असे झाले की, लेखकाला घवघवीत यश मिळाल्याची ती पावतीच ! शेरलॉक होम्स बेकर स्ट्रीटमध्ये 'राहत' असे. निदान कॉनन डॉइल तरी नेहमी असे म्हणत असे ! आता बेकर स्ट्रीटवरील त्या बिल्डिंगमध्ये एक विमा कपनी आहे. त्या विमा कपनीने शेरलॉक होम्सला आलेल्या पत्राची उत्तरे देण्यासाठी एक इसमच नेमला आहे !

खुद्द इयान फ्लेमिंग यांनी नेव्हल इंटेलिजन्समध्ये उत्कृष्ट कामगिरी केली होती. ऐन युद्धात फ्लेमिंगची नेव्हल इटेलिजन्स खोली न. ३९ ही एक आख्यायिकाच बनली होती. या खोलीतला नेव्ही युनिफॉर्ममधला फ्लेमिंगचा फोटो सर्वांत स्मार्ट आहे. या त्यांच्या अनुभवामुळेच ते उत्कृष्ट हेरकथा लिहू शकले. त्याच्या जेम्स बॉन्ड या कादंबऱ्यात जो जिवंतपणा उतरला आहे तो यामुळेच.

लहान असताना फ्लेमिंग याचे शिक्षण इटन येथे झाले. (इंग्लंडमधील हॅरो व इटन येथे जगातील पंतप्रधान व अध्यक्ष निर्माण होतात असे म्हणतात ) कुमारवयात फ्लेमिंग अगदी काटकुळे होते इतके की, त्या वयातच त्यांना काही वार्धक्यजन्य रोग झाला होता की काय असे फोटो बघून वाटते; परंतु त्याचा कृश देह शारीरिक शर्यतीत नेहमी पहिला नंबर पटकावीत असे, त्यामुळे सर्वांना फार आश्चर्य वाटत असे. त्यांच्या विशीनंतर मात्र फ्लेमिंग स्मार्ट दिसायला लागले आणि तो स्मार्टनेस वाढावा म्हणूनच की काय, ते तुफान सिगरेटी ओढायला लागले. सिगरेट ओढणारे असे म्हणतात की, धुराच्या लोटामुळे मन अगदी स्वच्छ होते व विचारात एक प्रकारची सुसंगती व तंद्री लागते. जगातील कित्येक शोध व कित्येक कलाकृती अशा सिगरेटमधून निघणाऱ्या धुरातून निर्माण झाल्या आहेत असा काही लोकाचा समज आहे. तर आता सिगरेटच्या बॉक्सवर लहान अक्षरात Cigarette smoking is injurious to health व त्याहून थोडचा ठळक अक्षरात However, it helps in clear thinking असा मजकूर छापायला हरकत नाही.

आपण एक मान्यताप्राप्त विचारवंत मानले जावे असे फ्लेमिंग याना फार वाट; परंतु त्याना हे माहीत नसावे की, विचारवंत व लोकप्रियता याचे नेहमीच वावडे असते. एकाचे प्रमाण दुसऱ्याशी व्यस्त असते. जणू त्याच्या लोकप्रियतेमुळे की काय त्यांना इंग्लंडमध्ये कधीच विचारवंताचे स्थान मिळाले नाही. शेवटी फ्लेमिंगनेही तो नाद सोडला. इतकेच नव्हे तर काही विचारवंतांनीच त्याच्यावर टीकास्त्रे सोडली.

एकदा इयान फ्लेमिंग म्हणाले होते, 'I will write a spy story to end all spy stories.' A big war to end all small wars असे काही तरी आणि झालेही तसेच. त्यांच्या हेरकथेमुळे इतर हेरकथा खुज्या वाटायला लागल्या. फार काय, वास्तवतेला धरून पट्टीचे हेरकथा लिहिणारे जॉन ली कॅरी (असेल बाबा ल कार. मान्य.) व हेलन मॅक इनेस याना सुद्धा फ्लेमिंगनी टेरिफिक स्पीडने मागे टाकले. जसजसे ते जास्त सिगरेटी ओढायला लागले, तसतशी हेरकथांची नवी नवी कथानके त्यांना सुचायला लागली.

टॅक्सवाल्याची कुऱ्हाड काय इथे भारतातच कोसळते ? माननीय हेरकथालेखक, जेम्सबॉंड जनक, एक्स नेव्हल इंटेलिजन्स ऑफिसर, माजी इटन विद्यार्थी, 007 वाले, माजी अॅथलेटिक, कै. इयान फ्लेमिंग याना डेथ ड्युटी किती भरावी लागली ? एक लक्ष पौंड ! सुमारे वीस लक्ष रुपये ! जिवंत असताना आपल्याला किती डेथ ड्यूटी भरावी लागेल याची बऱ्याच श्रीमंत लोकाना कल्पना नसते ! टॅक्सवाल्यानी जर आधी कल्पना दिली तर मरणारा श्रीमंत भूत होऊन टॅक्सवाल्यांच्या मानगुटीवरच बसेल !

थंडरबॉलचे प्रकरण कोर्टात गेले होते त्यामुळे इयान फ्लेमिंगना अतोनात यातना झाल्या असा बोलबाला झाला होता. या प्रकरणी कोर्टात झालेला खर्च £ ८०,००० ( जवळजवळ १५ लाख रुपये ) फ्लेमिंगनी सोसायचे होते असा निर्वाळा जज्जसाहेबाने दिला होता. या तापापोटी इयान फ्लेमिंगना हृदयविकाराचा झटका आला असे म्हणतात; परंतु जोनाथन केप हे प्रकाशक असे म्हणतात की यात काही तथ्य नाही.

थडरबॉलचे ओरिजिनल नाव होते जेम्स बॉड, सीक्रेट एजंट.

या पुस्तकाचा जो सिनेमा निघाला होता तो बनवण्यात कॅव्हिन मॅकक्लोरी, जॅक व्हीटिंगहॅम व इयान फ्लेमिंग या तिघाचा वाटा होता. कोर्टाने जेव्हा इंजक्शन दिले त्याच्या आधीच फ्लेमिंगची प्रकृती ढासळली होती असे प्रकाशकाचे म्हणणे होते.

जेम्स बॉंडची पुस्तके K G B मध्ये मोठ्या प्रमाणात वाचली जात असत. कधीकधी इयान फ्लेमिंग आपल्या पुस्तकात खरी पात्रे टाकीत असत. पुष्कळ वेळा ते हेराचे खरे जग कसे असते याचेही चित्रण करीत असत. त्यामुळे रशियन्सना पाश्चात्य देशातील खरी व खोटी हेरगिरी कोणती हे कळत नसे. किंबहुना त्याच इराद्याने फ्लेमिंग तसे करीत असत असे बऱ्याच लोकाचे म्हणणे आहे. जेम्स बॉंडला उत्तर म्हणून रशियाने एका बल्गेरियन लेखकाला हेरकथा लिहिण्यास प्रवृत्त केले. या लेखकाचे कार्य म्हणजे असे एक पात्र निर्माण करणे की, जो जेम्स बॉंडची त्रेधातिरपीट उडवतो; पण रशि-

याच्या बाहेर हे पात्र आल्याचे ऐकिवात नाही. कदाचित रशियन सरकारने प्रत्येक रशियनाला एकेक कादंबरी विकत घ्यायला लावून व्होडकाबरोबर त्याची लज्जत घ्यायला भाग पाडले असेल! खुद्द हिरो जेम्स बाँडनी १९६० च्या सुमारास अँन्टी हीरो निर्माण करावयास सुरुवात केली. ही पात्रे जणू फ्लेमिंगच्या पुढील ब्रीदवाक्यामुळेच 'सर्व हेरकथा संपवणाऱ्या हेरकथा मी लिहीन.' निर्माण झाली. यात The Spy Who Came In From The Cold (जॉन ल कार) चा उल्लेख करायला लागेल.

जेम्स बाँड व Man From uncle सारखे कधीही न मरणारे व नेहमी जिंकणारे हेर यांना थोडे वाचक तरी विटले होते. मग प्रवेश केला तो कां कूं करणाऱ्या, भीती वाटणाऱ्या, डबल क्रॉसिंग, काउंटर स्पाइंग करणाऱ्या अकार्यक्षम हेराने.

जॉन ल कार हेसुद्धा एक उत्कृष्ट हेरकथा लेखक आहेत. त्यांचे खरे नाव आहे डेव्हिड कार्नवेल. त्याच्या हेरकथा इतक्या वास्तवतेस धरून असतात की, एकदा रशियन्सना वाटले होते की ते टोपणनाव धारण करतात म्हणून ते खरोखरीच हेर असतील.

पण प्रखर वास्तवता विसरण्यासाठीच तर सामान्य माणूस हेरकथा वाचीत असतो. म्हणूनच इयान फ्लेमिंगच्या व जॉन ल कारच्या वाचकांमध्ये पुस्तक वाचण्याचे प्रमाण ५०० : १ असे होते काही वर्षांपूर्वी. या घटकेला मात्र उलटे आहे. जॉन ल कार १०० तर जेम्स बाँड १० म्हणजे १०० : १० असे आहे.

—जे. एन पोंडा ९०%

—सौ. माधवी मुकुंद गोखले १०%

□

रंगभूमी



# वळण आणि भिंत

पुण्यामधील एक नामवंत आणि (फॉरेन रिटर्न्ड) अशी नाट्यसंस्था थिएटर अॅकेडमी.पुण्यातील चोखंदळ वगैरे नाट्यरसिकांना नव्या वर्षाची भेट म्हणून दोन नव्या (रूपांतरित का होईना) नाटिका, नव्या कलावंतांच्या संचात या संस्थेने सादर केल्या.

जर्मन भाषेतील प्रसिद्ध नाटककार श्री. टांक्रेड डोर्स्ट यांच्या दोन नाटिका (द वॉल) आणि (द कर्व्ह) या 'भिंत' आणि 'वळण' या नावाने मराठी रंगभूमीवर अवतीर्ण झाल्या आणि मराठी लोकांना एक नवा परकीय लेखक 'सापडला.'

डोर्स्ट यांच्या नाट्यलेखनाच्या अगदी सुरुवातीच्या कालखंडातील या दोन नाटिका. या जेव्हा जर्मन रंगभूमीवर सादर करण्यात आल्या तेव्हा तेथील टीकाकारांनी त्यांची 'अॅबसर्ड' म्हणून संभावना केली, हे श्री. डोर्स्ट यांनीच भाषणात सांगितले.

'वळण' ही नाटिका दोन भावांची (मर्यादित) कथा सांगते. ही दोन भावंडे आहेत राम आणि बलराम. (राम—बलराम या चित्रपटातील हीरोंच्या नावांशी असलेले साम्य केवळ योगायोगच समजू या.) राम हा शिकलेला, बुद्धिजीवी वगैरे आहे, तर बलराम हा नावाप्रमाणेच आडमाप देहयष्टी असलेला एक मोटर-मेकॅनिक आहे. दोन महत्त्वाच्या शहरांना जोडणाऱ्या घाटातील एका अत्यंत अवघड व धोकादायक वळणापाशी हे दोघे राहतात. त्यांच्या घरामागे गॅरेज तर आहेच, पण एक सुंदरशी बाग आणि स्मशानसुद्धा आहे. या वळणावरील अपघातात सापडलेल्या वाहनांची दुरुस्ती बलराम करतो, तर अपघातात मेलेल्या दुर्दैवी जीवांच्या अंत्यसंस्कारासाठी सुरेख भाषेत कलात्मक रीतीने भाषणे बनवण्याचे काम राम करतो. एकंदरीत त्यांचे 'बरे' चाललेले असते.

तरीपण मनामध्ये कुठे तरी हे अपघात, त्यात मरणारे निरपराध जीव, त्यांना अस्वस्थ करत असतात आणि म्हणून ते सातत्याने धोका नाहीसा करण्यासंबंधी सरकारदरबारी तक्रारअर्ज पाठवत असतात; पण अर्थातच काहीच घडत नाही.

एक दिवस एका मोटारीला त्याच वळणावर जोरदार अपघात होतो. त्या वर्षातला हा 'रौप्यमहोत्सवी' अपघात असतो. मात्र गाडी चालवणारा मरत नाही, थोडक्यात वाचतो आणि हा मनुष्य म्हणजे दुसरा तिसरा कोणी नसून तोच सरकारी अधिकारी असतो, ज्याच्याकडे राम—बलराम सतत तक्रार पाठवीत आले आहेत.

या अपघाताने हादरलेला तो अधिकारी ते 'बेकार' वळण लगेच दुरुस्त करण्याचे आश्वासन त्या दोघांना देतो. पण...! या इथे आता राम—बलराम यांच्या जगण्याचा प्रश्न उपस्थित होतो. घाटमाथ्यावरील शिंगरोबाला नारळ फोडावा इतक्या सहजतेने ते एक 'बळी' द्यायलाही कचरत नाहीत. कारण त्यांना ते वळण हवे आहे, त्या वळणामुळेच त्यांचे जीवन उभे आहे आणि त्यांचे जगणे हेच त्यांना जास्त महत्त्वाचे आहे.

अशी ही गोष्ट जास्त अवघडपणे या नाटिकेतून मांडण्यात आली आहे. कथेत किंवा एकांकिकेत पात्रे तीनच, राम (शिरीष लिमये) बलराम (कल्याण किंकर) आणि सरकारी अधिकारी गोविंदराव (श्रीराम पेंडसे). तिघेही या क्षेत्रात पूर्णपणे नवे आहेत. तिघेही आपापल्या भूमिकेत मस्त शोभून दिसले. ही एकांकिका जरा शब्दबंबाळ आहे. त्यामुळे चेहऱ्यावरील भावदर्शन इत्यादी अभिनयाच्या थोड्या सूक्ष्म प्रकारांपासून त्यांची सुटका झाली आहे. श्री. कल्याण किंकर यांची खणखणीत कमावलेली शरीरयष्टी ही बलरामाच्या भूमिकेला योग्य अशीच आहे. ते स्टेजवर मोकळेपणाने, न घाबरता वावरलेही; परंतु त्यांचा अभिनय 'जे शिकवले ते व तेवढेच केले' अशा स्वरूपाचा वाटतो. सतत प्रयोग करूनच सफाई येणार हे खरे असले तरी उणीवा ध्यानात घेणे महत्त्वाचे आहे.

बुद्धिजीवी 'राम' म्हणून शिरीष लिमयेही शोभले वगैरे; पण त्यांचे संवाद दुसऱ्याच्या संवादाला 'टकरतात'. ही चूक सुधारण्यासारखी आहे. त्याने फार रसहानी वगैरेही होत नाही हे जरी खरे असले तरी खटकते एवढे मात्र निश्चित.

सरकारी अधिकारी गोविंदरावच्या मध्यम-

वयीन भूमिकेत श्रीराम पेडसे छाप मारून जातात. त्यांनी 'आपादमस्तक' गोविंदराव अगदी फिट्ट दाखवला. बेशुद्धावस्थेतही कचेरीत असल्यासारखे बडबडणे छान; पण कधी कधी त्याचे ओरडणे, रडणे जरा 'जास्त' वाटले.

या एकांकिकेभर 'महानिर्वाण' इकडून तिकडून डोकावत असल्यासारखे वाटत होते. बलरामाकडून गोविंदरावाना खावा लागलेला मारही जरा जास्तच वाटतो. तीच गोष्ट गोविंदरावला खेळण्याच्या गाडीत जबरदस्तीने बसवतानाची. (त्या प्रत्ययकारी नाटयानुभूतीसाठी हे आवश्यक होते?) मोजकेच नेपथ्य आणि योग्य तेवढीच प्रकाशयोजना यांच्याबरोबरच उल्लेखनीय बाब म्हणजे सुरेख ध्वनिसंयोजन. घाटातील रहदारीचा आवाज अचूक व स्वच्छपणे टिपलेला होता. मोटारीच्या अपघातावेळचा आवाज मात्र एका पाश्चात्य ध्वनिमुद्रिकेवरून उचलल्याचे मला कळले. (अपघात झाल्यानंतर एखादेच चाक वगैरे गरगरत येणे ही पण 'तिकडच्याच' सिनेमातील आयडिया.) ते काही असले तरी प्रेक्षकांपर्यंत ते सर्व आवाज व्यवस्थितपणे पोचवले गेले याचे महत्त्व जास्त आहे.

'वळण' मानाने 'भित' या एकांकिकेची कथा जास्त गुतागुतीची आहे. किंबहुना त्याला 'कथा' अशी नाहीच असे म्हणणे जास्त उचित ठरेल. कारण लेखकाला व्यक्ती आणि समाज याच्या नात्यावर काही भाष्य करायचे आहे. इथे सगळ्या व्यक्तिरेखा प्रतीके म्हणून येतात आणि त्यांच्या वागण्याबोलण्यातून लेखक आपले म्हणणे मांडण्याचा प्रयत्न करतो.

यात तीनपेक्षा जास्त पात्रे असूनही तीनच अभिनेत्यांच्या साहाय्याने संपूर्ण नाटिका सादर करण्यात येते आणि तेच योग्य वाटते.

सुरुवातीलाच ढोलकीच्या तालावर चालत एक सुखरूप गावढळ तरुणी आपल्याला दिसते. ती तिच्या गावापासून लांबची मजल मारून आली आहे एका भिंतीपाशी. तिचा नवरा 'शिरपती' महाराजांचा आदेश आल्यासरशी लढाईवर रुजू झाला आहे. किती तरी दिवस गेले; पण लढाई काही संपेना आणि तिचा नवरा काही घरी येईना शेवटी तीच लढाईच्या ठिकाणी येते. लढाई चालू आहे भिंतीच्या पलीकडे आणि त्या भिंतीवर तर हजारो शिपाई बसले आहेत. आता त्यातून या तरुणीचा नवरा शोधायचा तरी कुठे आणि कसा? हा प्रश्न उभा आहे ती तरुणी 'जाई'. शिपाई व 'शेणापती' या दोन 'इनोदी' पात्रासमोर श्रीपतीच्या गळ्यात असलेल्या लॉकेटची ती खूण सागते. तो मेला असेल ही शक्यताही ती धडकावून लावते. शेवटी महाराज तिला एक संधी देतात. त्या हजारो जवानांमधून तुझा नवरा शोध आणि त्याला खुशाल आपल्या घरी घेऊन जा; पण एक अट आहे. ते दोघे नवरा-बायको आहेत याची खात्री महाराजांना पटायला हवी.

अखरीस ती एका जवानाकडे बोट दाखवते; पण त्या जवानाच्या गळ्यात तर ते खुणेचे लॉकेट नसते. लढाईच्या घाईगर्दीत पडले असेल कुठे तरी अशी ती सेनाधिकाऱ्याची समजूत काढते पण खरं पाहू गेलं तर ते दोघंजण एकमेकाना प्रथमच पहात असतात. 'अनेक वर्षे चालू असलेल्या या लढाईत मरण्यापेक्षा, या बाईचा नवरा म्हणून मेलेलं काय वाईट?' असा सुज्ञ विचार तो जवान करतो आणि 'आता काही श्रीपती येण्याची शक्यता नाही, तेव्हा याच बाबाला बरोबर नेऊन संसार रेटावा हे बरं' असा (प्रॅक्टिकल) विचार ती बाई– जाई – करते.

या दोघाचे हे विचार चालू असताना, तो सेनाधिकारी सारखा या दोघाना 'नवराबायकोचा खेळ एकदम झक्कास व्हायला पायजे, महाराज आणि सगळी सेना भिंतीवरून बघतीय,' असा दम देत असतो. त्या भीतीपायी जाई त्या जवानाला गावाकडच्या आठवणी वगैरे सागत असते आणि तोही घाबरत घाबरत उत्तरे देत असतो.

आणि हे चालू असताना अचानक ते दोघे गावचं वळण सोडून शहरी पद्धतीने शुद्ध भाषेत बोलू लागतात. ती जाई या जवानाला त्याची 'तनू, तनुजा' वाटते. कॉलेजमधले ते रम्य दिवस आठवतात, 'घरचे'ही आठवतात. 'तनू' तर नेहमीच आठवते. कॉलेज संपलं आणि तो लष्करात भरती झाला आणि अगोदर अनेक वर्षे चालू असलेल्या लढाईत लढत राहिला. त्या गडबडीत तनूला 'घरची' बनवायची राहूनच गेलं याची त्याला खंत आहे.

कधी जाई आणि तो जवान एकमेकांना ओळखण्याचा प्रयत्न करताना दिसतात तर कधी तो जवान आणि त्याची प्रेयसी आपल्या समोर वावरताना दिसते. एवढ्यात तो सेनाधिकारी एक कटु सत्य सांगतो की, हा जवान एक कॅप्टन आहे, तिचा नवरा नव्हे, तिचा श्रीपती युद्धात कामी आला आहे आणि तो जवनाला शाबासकी देऊन म्हणतो, 'महाराज तुझ्या अभिनयावर खूष आहेत.' काही काळ कल्पनेत रमलेल्या त्या दोघांना ते सत्य, माहीत असूनही पचवणं जड जातं.

या सगळ्या व्यक्तिरेखा आपल्याला एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आणि बाजूचा समाज याचं दर्शन घडवतात. सगळा समाज एका भिंतीने वेढला गेला आहे. ती भिंत आहे रूढीची, विशिष्ट विचाराची वगैरे आणि ते महाराज किंवा सेनापती, गावातल्या तरुण विवाहितेवर वाईट नजर ठेवणारा पाटील इत्यादी सर्व मंडळी ही त्या समाजव्यवस्थेला चालू ठेवणारी, त्यांना बळकटी देणारी माणसं आहेत. या क्रूर समाजव्यवस्थेची भिंत माणसाना एकमेकांपासून, आणि माणसाला— व्यक्तीला त्याच्याचपासून वेगळे करते.

या सगळ्या प्रकारात ती व्यक्ती स्वत:च 'स्वत:'ला हरवून बसते; असहायपणे त्याच समाजव्यवस्थेचा एक भाग बनते. कारण व्यक्तीमध्ये ही समाजव्यवस्था बदलण्याचं सामर्थ्य कुठलं?

व्यक्तिगत जीवनातल्या काही विरोधाभासांना ही नाटिका स्पर्श करते. कधी विनोदी तर कधी गंभीर अशी वळणे घेत घेत ही नाटिका प्रवास करते.

पण 'भित' काय किंवा 'वळण' काय, 'ठीक झाल्या' एवढेच त्याच्याबद्दल म्हणता येईल, कारण त्या पूर्णपणे प्रेक्षकांच्या मनाला भिडत नाहीत, प्रेक्षक समरस होऊ शकत नाही.

'भित'मधील तीनही कलाकार नवीन असूनही मोकळेपणाने वावरले. पैकी श्रीरंग गोडबोले तर 'कॅफे डिलाइट'वर वावरावे इतके मोकळे झाल्याने त्याच्या काही हालचाली अकारण विनोदी बनल्या. त्याचे बोलणेही कधी कधी हिंदी नटांच्या 'स्टाइल'चे होते.

स्वरूपा खोपकर दिसल्या चागल्या, कामही

छान केले; पण त्या डोळे वटारून प्रेक्षकांकडे का बघतात हे कळू शकले नाही.

प्रसाद पुरंदरे यांनी सुरुवातीचा विनोदी शिपाई व नंतरचा 'तो जवान' उभा केला होता. तब्येत व उंचीने ते जवान म्हणून शोभले खरे; पण 'संवाद झाला की, अमुक हालचाल करून अमुक अॅक्शन आपल्याला करायची आहे' हा यांचा भाव जायला हवा. तसेच अगदी शेवटच्या प्रसंगात 'मी कॅप्टन आहे' हे त्यांच्या तोंडचे वाक्य अधिक परिणामकारक व्हायला हवे. ते वाक्य सतत येते आणि करुणरसप्रधान होण्याऐवजी दुर्दैवाने ते हास्यास्पद, विनोदी होते. कदाचित पूर्वार्धातल्या त्यांच्या विनोदी कामाचाही हा परिणाम असू शकेल.

थिएटर अॅकेडमीच्या प्रस्थापित अशा कलावंतांनंतर नव्या कलावंतांची एक फळी उभी करण्याच्या दिशेने टी. ए. चे हे पाऊल नक्कीच स्वागतार्ह आहे आणि अधिक सुधारणा करून अधिक प्रगतीच्या दिशेने ही पावले सतत पुढे पडतील अशी आपण आशा करू या. ¤

# 'अत्रे वन्समोअर'

'मी अत्रे बोलतोय' याचे काही वर्षे सातत्याने, एकूण हजारच्यावर प्रयोग झाल्यानंतर श्री. सदानंद जोशी यांनी हा 'अत्रे वन्समोअर, हास्यकल्लोळ'चा प्रयोग सादर केलेला आहे.

आचार्य अत्रे यांच्याबरोबर गप्पांच्या व विनोदाच्या मैफिलीत आपण जाणार असल्याचे आपणास अगोदरच सांगण्यात येते आणि सुमारे दोन तास आपली भरपूर करमणूक होते.

ज्यांनी श्री. सदानंद जोशीकथित 'मी अत्रे बोलतोय' पाहिले असेल त्यांच्या बाबतीत 'तेच अत्रे फक्त मजकूर नवा' अशी परिस्थिती होती. मी स्वत: सदानंद जोशी यांनी सादर किंवा उभे केलेले 'अत्रे' प्रथमच पहात असल्याने जरा कौतुक होते.

माझी स्वत.ची कार्यक्रमाबद्दलची अपेक्षा मात्र पूर्णपणे पूर्ण झाली नाही. याचे कारण हा संपूर्ण कार्यक्रम बराचसा आचार्य अत्रे यांच्या 'विनोदगाथा' या पुस्तकावर आधारित आहे आणि ते मी वाचलेले असल्याने हसू येत नाही. फक्त ते सर्व विनोद कै. आचार्य अत्रे यांच्या आवाजात व त्यांच्या स्टाइलमध्ये ऐकायचे एवढेच एक वेगळेपण होते.

आचार्य अत्रे आपल्या मित्रांशी बोलत बसले आहेत या स्वरूपात हा संपूर्ण कार्यक्रम बसवला आहे. अनेक विनोदी प्रसंग, विनोद, विविध लेखकांचे अत्रे यांच्याशी संबंधित व संबंधित नसलेलेही विनोदी किस्से, अत्रे यांच्या जीवनातील अनेक प्रसंग ज त्यांनी स्वत: नमूद करून ठेवलेले आहेत अथवा श्री. सदानंद जोशी यांनी इकडून तिकडून मिळवले असतील ते सर्व विनोद अत्यंत कौशल्यपूर्वक एकमेकांना जोडत गेल्याने एरवी सुटक वाटणाऱ्या कथा व असंबद्ध वाटणारे विनोद या सर्वांना 'एक कार्यक्रम' म्हणून नीट आकार देण्यात श्री. सदानंद जोशी यशस्वी झाले आहेत.

त्या कार्यक्रमातील विनोद सांगणे म्हणजे रहस्यकथेचे रहस्य आधीच उलगडण्यासारखे होईल. अत्र्यांच्या नावावर थोडीफार अश्लील विधानेही खपवलेली सर्वांना माहीत आहेत; पण या कार्यक्रमात खटकणारा विनोद म्हणजे श्री. प्रभाकर पाध्ये यांच्या आवाजाची टिंगल. श्री. पाध्ये यांच्या संबंधीचा हा 'काल्पनिक' विनोद अकरण लावला आहे, त्यांची एवढी टिंगल योग्य नव्हे. श्री. प्रभाकर पाध्ये यांचा आवाज विनोदाचा व नकलेचा विषय नक्कीच आहे; पण त्याला काही मर्यादा ही हवीच. असो.

तर सागावयाचे असे की एकदा या हास्यकल्लोळाचा प्रत्यय घेऊन बघायला हरकत नाही. दोन–अडीच तास करमणूक नक्कीच होईल!

—निखिल गजेंद्रगडकर

## पुणे वार्ता : पृष्ठ ४ वरून

प्रा. भालबांनी शुभेच्छा दिल्या. या पदावरून लोकांच्या जेवढ्या अपेक्षा असतात तेवढं करणं जमतंच असं नाही असा इशाराही त्यांनी दिला. फार्सचा इतका चागला सेन्स असणारा दिग्दर्शक मला तरी दिसला नाही असं सांगून ते म्हणाले, संगीत व गद्य रंगभूमीला वळण देण्याचे कार्य ते करतील.'

एकूण श्री. भेंडे यांच्यावर आशा, अपेक्षांचा अगदी भडिमार झाला. बघू या भेंडे काय करतात ते! (आम्हीही काही आशा-अपेक्षा ठेवायला काय हरकत आहे?)

'मी मितभाषी वगैरे आहे असे यामागील वक्त्यांनी म्हटल्यामुळे माझी सोयच झाली अशी सुरुवात करून श्री. आत्माराम भेंडे म्हणाले, 'दिग्दर्शक वा नट म्हणून एखादी कलाकृती परिपूर्ण करण्याचा प्रयत्न मी करत असतो. कोण काय लिहितं आणि ते वाचून (च) प्रेक्षक येतात असं नाही. लिहिणारे समीक्षक त्यांचं काम करत असतात, मी माझं कामही तेवढंच मन:पूर्वक करत असतो.

'नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद हा एक बहुमान असतो. व्यक्तीने केलेल्या कार्याची ती एक पावती असते. माझ्याबद्दल अनेकांनी अनेक अपेक्षा व्यक्त केल्या वगैरे ठीक आहे; पण वर्षभरात काय करता येईल याची शंका वाटते. माजी संमेलनाध्यक्ष भालबांनी याचं सूतोवाच करून ठेवलंच आहे; पण अध्यक्षीय भाषणात जुन्या व नव्या रंगभूमीचा सेतू म्हणून माझे विचार मी परखडपणे मांडणार आहे.' या सत्काराबरोबरच चंद्रकांत गोखले त्याच्या मातु:श्री श्रीमती कमलाबाई, प्रा. भालबा केळकर यांचेही सत्कार करण्यात आले. श्री. चंद्रकांत गोखले हे एक सव्यसाची नट आहेत. त्याचा रंगभूमीचा मोठा वारसा आहे. संयमित आवाज आणि संयमित अभिनय ही त्यांच्या अभिनयाची खास वैशिष्ट्ये. चित्रपट, नाटक यामध्ये त्यांनी आपलं स्वत.चं स्थान निर्माण केलं. बेबंदशाहीतील कब्जीची भूमिका संस्मरणीय अशीच. त्याच नाटकात खंडोजीची भूमिका करून त्यांनी वाहवा मिळवलेली. 'नटसम्राट' सारख्या अभिनयाचा ऐश्वर्यशाली वारसा असणाऱ्या नाटकात नटसम्राट म्हणून उभं राहण्याचे सामर्थ्य त्यांच्यामध्ये आहे. त्यांच्या–

कडून रंगभूमीवर चित्रपटात अजून खूप कार्य व्हायचं आहे. साठी उलटली तरी अजूनही ते ताजेतवाने राहून भूमिका करताहेत.

त्यांच्या मातुःश्री कमलाबाई या संगीत रंगभूमीवरील पहिल्या स्त्रीकलाकार. वयाच्या पाचव्या वर्षापासून रंगभूमीवर पाऊल ठेवणारी ही स्त्री संगीत नाटकातून संगीत भूमिका करत होती. पुरुष भूमिकाही करत होती. 'धैर्यधराची त्यांची भूमिका जे यश मिळवून गेली ते लक्षात घेतलं तर त्या यशापुढे खऱ्या धैर्यधरानेही मान खाली घालावी. जुने नट आपलं 'युग' निर्माण करू शकत; पण नवे नट आपला 'काळ'च तयार करू शकतात, कमलाबाईंनी आपलं युग निर्माण केलंय म्हणून रंगभूमीवर त्यांचं फार मोठं ऋण आहे. अशा शब्दात भालबांनी त्यांच्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त केली.

श्रीमती कमलाबाई गोखले यांनी उत्तराच्या भाषणात आपल्या आयुष्याचा पट हलकेच उलगडून दाखवला. या बाई फारच जिद्दी! वयाच्या पाचव्या वर्षापासून आपल्या आईबरोबर कमलाबाईंनी रंगभूमीवर पाऊल टाकलेलं. दादासाहेब फाळकेंच्या मूकपटातील सर्व अभिनेत्यांमध्ये या दोघीच स्त्रिया. त्या वेळच्या सामाजिक परिस्थितीचा विचार करता हे किती अवघड असेल याची कल्पना येऊ शकते याची चुणूक त्यांनी आपल्या गहिवरल्या भाषणात दिली.

'मानापमानमध्ये मी भामिनीची भूमिका करत होते, रामभाऊ गुळवणी नावाचे नट धैर्यधर करत होते. एका दिवशी प्रयोगाच्या आधी रामभाऊ चेहऱ्याच्या एकाच बाजूला मिशी, एकाच बाजूला रंग, एकच भिकबाळी अशा पोषाखात उभे ! म्हटलं अहो, प्रयोग सुरू व्हायला आलाय अन् हे काय ? तर ते म्हणाले, 'पगार वाढवून हवाय मला!' मी तडक मालकांकडे गेले म्हटलं ऐन नाटकाच्या वेळी पुरुष जर असे मूर्खासारखे अडून बसत असतील तर त्यांना परत पाठवून द्या. प्रयोगाचं मी बघते. मीच होते धैर्यधर. आणि मी प्रथमच पुरुषभूमिका केली!'

आपला पती मृत्युशय्येवर आहे पण लगोलगच प्रयोग आहे त्या वेळी ही बाई आपल्या पतीला प्रयोग बंद पडू न देण्याचं आश्वासन देते. पती जी भूमिका करायचे ती भूमिका आपण करायला लागली. पतीच्या निधनानंतर नाटक सोडून देणं अशक्य होतं. कारण दोन मुलं होती. त्याच धाडसानं आणि सामर्थ्यानं कमलाबाई रंगभूमीवर उभ्या राहिल्या पण 'पतिदेवाचं नाव घेतल्याशिवाय रंगभूमीवर कधी पाऊल ठेवलं नाही' हे त्यांचं गदगदलेपण भारावून टाकणारं होतं. 'पतीच्या निधनानंतर खूप संकटं आली पण मी कधी पाऊल मागं घेतलं नाही' हे कमलाबाई ज्या जिद्दीनं म्हणू शकतात ती जिद्द रंगभूमीवर क्वचित आढळून येणारी आहे.

तर असा हा सत्कार सोहळा. नाट्यसंमेलने भरायला लागून कित्येक वर्षे झाली. हे ६१ वे संमेलन म्हणजे यामागील कलावंतांनी एक परंपरा घालून दिलेली आहे. अलीकडे या नाट्यसंमेलनांचे स्वरूप काहीसं विस्कळित झाल्यासारखं दिसतं. व्यावसायिक व संगीत रंगभूमीवरील लोकानी या संमेलनाशी आपला काहीच संबंध नसल्याचं ठरवलेलं दिसतं, हौशे, नवशे, गवशे असे कलावंत व रंगभूमीशी निगडित लोक जमतात. खरं तर हे संमेलन 'अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलन' आहे. त्यामध्ये सर्वच कलावंत व रंगभूमीशी निगडित असलेल्या सर्व व्यक्तीनी सहभागी व्हायला हवे. ही उदासीनता दूर करणे श्री. आत्माराम भेंडेंना शक्य आहे.

नाट्यसंमेलनाचा अध्यक्ष हा फक्त उत्सवमूर्ती असता कामा नये; पण गेल्या काही वर्षातील अध्यक्ष पाहता हा समज बळावणे शक्य आहे. वर्षभर मानमरातब घेणे एवढंच अध्यक्षाचं काम नाही. अध्यक्षीय भाषणात हे अध्यक्ष ज्या अभिनिवेशाने अडचणी सोडविण्याचं आश्वासन देतात तो अभिनिवेश नंतर गळून पडलेला दिसतो. या संदर्भात भूतपूर्व अध्यक्ष छोटा गंधर्व यांची कामगिरी लक्षणीय म्हणायला हवी. अध्यक्ष या जबाबदारीच्या नात्याने त्यांनी स्वत: (निवृत्त झाल्याची घोषणा केली असूनही) प्रयोग सादर करून काही लाख रुपये उभे केले. 'घाशीराम'च्या परदेशगमन प्रसंगी मराठी नाटक परदेशी जायलाच हवे हा (त्यांच्याकडून अपेक्षित नसलेला) स्टॅण्ड ह्यानी घेतला व जबाबदारीचे पालन केले.

म्हणूनच अध्यक्षांनी केवळ उत्सवमूर्ती राहता कामा नये. रंगभूमी ही आता नुसती हौस राहिलेली नाही. हौसेला मोल नसतं हे जरी खरं असलं तरी या हौसेला मात्र मोल द्यावं लागतं ही वस्तुस्थिती आहे. पुण्यामुंबईसारखी शहरे वगळता महाराष्ट्रात सुसज्ज नाट्यगृह असणारी गावे हाताच्या बोटावर मोजण्याइतकी आहेत. याबाबत सरकारदरबारी खटपट करून काही अनुदान मिळवून अशी नाट्यगृहे बांधणे ही मोठी गरज आहे. नाटकांचा प्रसार झाला असं म्हणत असताना तो खरंच किती झालाय आणि कुठे अडलाय याचा विचार कुणी तरी केला पाहिजे.

नाटक हे मराठी संस्कृतीचं वारस आहे, मराठी मनाचं प्रतिबिंब आहे; पण त्यावरील निवृत्त कलावंतांना आज मोठ्या कष्टानं जीवन जगावं लागतं आहे याची खंत फार थोड्या जणाना आहे. त्यांच्या उदरनिर्वाहापुरती काही सोय करणं हे ऋण फेडण्यासारखंच आहे. बॅकस्टेज कर्मचाऱ्याच्या आर्थिक अडचणी सोडविण्याची आश्वासने आजवर अनेक अध्यक्षांनी दिली. प्रत्यक्षात फारसं काही घडल्याचं दिसत तरी नाही. अध्यक्ष या सर्वांचा प्रतिनिधी आहे. या सर्वांचं प्रतिनिधित्व करताना जबाबदारीची जाणीव ठेवणं फार महत्त्वाचं आणि आवश्यक आहे. भाषणं ठोकणं हे काम आजवर ३० वर्षं भारतातील अनेक लोक करत आले आहेत. मानमरातबही आता फार स्वस्त झाले आहेत. या सर्वांपेक्षा विधायक कार्यक्रमाची उणीव आता भासते आहे. हे लक्षात घेऊन अध्यक्षाच्या घोषणा फारच लोभसवाण्या असतात; पण प्रत्यक्षात काय ?

नाट्यसंमेलनाध्यक्षपदी श्री. आत्माराम भेंडे यांची निवड झाली याबद्दल त्यांचं अभिनंदन करण्यलाच हवं. ते काही 'निवृत्त नट वा दिग्दर्शक' नाहीत. उलट त्यांचा 'फॉर्म'सारखा वृद्धिंगतच होतोय. आता अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेताना भेंडेंनी तरी ही आपल्या कर्तृत्वाची फक्त पावती आहे असे न मानता आपल्याला चांगलं कार्य करून दाखविण्याचं हे एक आव्हान आहे असं मानायला हवं. श्री. भेंडे यांच्याकडून एवढी अपेक्षा बाळगण्यात मी काही वावगं करतोय असं मला तरी वाटत नाही.

—प्रतिनिधी